# घटक १
# प्रारंभीचा टप्पा (१९५० ते १९६६)

**अनुक्रमणिका**

१.० उद्दिष्ट्ये
१.१ प्रास्ताविक
१.२ विषय विवेचन
१.२.१ भारतीय परराष्ट्र धोरणातील तत्त्वे व उद्दिष्ट्ये
अ) भारतीय परराष्ट्र धोरणातील तत्त्वे
ब) भारतीय परराष्ट्र धोरणाची उद्दिष्ट्ये
१.२.२ भारत–रशिया परराष्ट्र धोरणाचा इतिहास
१.२.३ जागतिकीकरणाच्या काळातील भारताचे परराष्ट्र धोरण
१.३ सारांश
१.४ पारिभाषिक शब्द
१.५ स्वयंअध्ययन प्रश्न व उत्तरे
१.६ सरावासाठी स्वाध्याय
१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## १.० उद्दिष्ट्ये

या अभ्यास घटकाच्या अध्ययनाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१. भारतीय परराष्ट्र धोरणाचे निर्धारक घटक तत्त्वे व उद्दिष्टांची माहिती समजून घेणे.

२. भारताच्या आंतरराष्ट्रीय राजकारणातील स्थानांचे व परराष्ट्र धोरणांतील बदलांचे आकलन होईल.

३. भारताने आपले परराष्ट्र धोरण रशिया चीन अमेरिका या राष्ट्रांबरोबर कसे राबवले याची माहिती घेता येईल.

४. भारतीय परराष्ट्र धोरणावर नेहरू कारकिर्दीचा प्रभाव समजून घेणे.

५. भारतीय परराष्ट्र धोरणाबरोबरच रशिया, अमेरिका, व चीन सोबतच्या परराष्ट्र धोरणाची माहिती समजून घेणे.

## १.१ प्रास्ताविक

एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राबद्दल स्विकारलेले धोरण म्हणजे परराष्ट्र धोरण होय. दुसऱ्या महायुद्धानंतर भारतीय परराष्ट्र धोरणाने संपूर्ण जगाला प्रभावित केले आहे. आधुनिक काळातील लोकशाही व्यवस्थेत परराष्ट्र धोरणाची निर्मिती राज्याच्या शासनकर्त्यामार्फत होत असते. परराष्ट्र धोरणाची निर्मिती ही सर्वोच्च शासनकर्त्यामार्फत होत असते, भारताच्या परराष्ट्रीय धोरणात भारताने जागतिक शांततेच्या पुरस्कार केल्यामुळे भारत सतत जागतिक शांततेसाठी प्रयत्नशील राहिला आहे. परराष्ट्र धोरणाच्या निर्मितीत भौगोलिक, आर्थिक, राजकीय इत्यादी घटकांचाही विचार करावा लागतो. शांततामय सहजीवन आणि सहकार्याला प्राधान्य परराष्ट्र धोरणामध्ये हे महत्त्वपूर्ण तत्त्व असून याद्वारे सर्वांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित केले .

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व रशिया या दोन देशांच्या नेतृत्त्वाखाली जगात भांडवलशाही व साम्यवाद असे दोन गट निर्माण झाले होते. पण या दोन गटाच्या संघर्षाने युद्धाची परिस्थिती निर्माण झाली होती. हे दोन्ही देशांनी नवस्वतंत्र राष्ट्रांना आपल्या गटामध्ये घेण्याची चढाओढ सुरू केली होती, यामुळे नवस्वतंत्र राष्ट्र सुप्त अवस्थेत होते. या राष्ट्रांना विकास करण्यासाठी दोन्ही गटांची आवश्यकता होती. यावेळी पंडित नेहरूंनी अलिप्तता हे धोरण स्विकारले. ज्यामध्ये दोन्ही गटांच्या संघर्षात मध्यम मार्ग मिळू शकेल. हे धोरण भारताच्या परराष्ट्र धोरणात अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले.परराष्ट्र धोरण संकुचित नसून व्यापक हितसंबंधावर आधारित असते. हे हितसंबंध हे फक्त भारतीय नसून जागतिक स्वरूपाचे आहेत.

भारतीय परकीय धोरणाचा मुख्य आधार म्हणजे अलिप्ततेचे धोरण होय, अलिप्ततेच्या धोरणाचे अनेक अर्थ स्पष्ट होतात. अलिप्तता म्हणजे पृथकवाद याचा अर्थ आंतरराष्ट्रीय राजकारणापासून वेगळे राहण्याशी संबंधित आहे. दुसरा अर्थ म्हणजे तटस्थता होय. पं. नेहरूंनी स्पष्ट केले की, ''आमच्या स्वातंत्र्यास धोका निर्माण झाला असेल अशावेळी तटस्थ राहणार नाही. म्हणूनच अलिप्तता म्हणजे निष्क्रीय तटस्थता नव्हे,'' आणखी अर्थ म्हणजे असंबंधतावाद याचा अर्थ म्हणजे विश्वशक्तीच्या तणावापासून वेगळे राहणे होय. पंडित नेहरूंनी भारताच्या परराष्ट्र धोरणाची आदर्शवादी प्रतिमा तयार करून अलिप्ततावादी चळवळीच्या माध्यमातून जागतिक नेतृत्व करण्याचा प्रयत्नही केला, तो काही प्रमाणात यशस्वी झालेला दिसून येतो.

## १.२ विषय विवेचन

भारतीय परराष्ट्र धोरणाची मूलभूत चौकट प्रभावी असून लोकशाही, साम्राज्यवादविरोध, वंशवादाला विरोध, युद्ध प्रवृत्तीला विरोध, आंतरराष्ट्रीय सुरक्षा, शांतता व सहकार्य, अहिंसावाद या तत्त्वांचा प्रभाव भारतीय परराष्ट्र धोरणावर आहे. भारतीय परराष्ट्र धोरणाच्या निर्मिती प्रक्रियेत विविध घटकांचा प्रभाव असून भौगोलिक, सांस्कृतिक व आर्थिक घटकांप्रमाणेच देशांतर्गत राजकीय पक्ष, दबावगट व प्रसार माध्यमाचाही प्रभाव दिसून येतो. या संस्थांमार्फतच परराष्ट्र धोरण ठरवले जाते. याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय राजकारण व व्यापाराचा कमी अधिक प्रमाणात प्रभाव अशा या विविध घटकांच्या प्रभावातूनच देशाचे परराष्ट्र धोरण तयार होत असते.

परराष्ट्र धोरणावर भारतीय पंतप्रधानांच्या कारकिर्दीचा प्रभाव पडला असून त्याच्या व्यक्तित्त्वाचाही प्रभाव यात निदर्शनास येतो. १९४७ ते २०१७ या कालखंडात भारतीय परराष्ट्र धोरणात अनेक बदल झाले. अनेक देशांशी संबंध ताण- तणावाचे राहिले, तसेच व्यवस्थितसुद्धा झाले. पण यात भारताने कधीही साम्राज्यवादी, आक्रमक असे परराष्ट्र धोरण स्विकारले नाही. भारताने नेहमी दुसऱ्या देशाच्या सार्वभौमत्वाचा व अखंडतेचा आदर केला असून परराष्ट्र धोरणामध्ये राष्ट्रांचे संरक्षण करण्याचे उद्दिष्ट समोर असते. नैसर्गिक संपत्ती, त्या राज्याची भूमी यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी परराष्ट्र धोरणाला पार पाडावी लागते आणि त्यासाठी ते सतत प्रयत्नशील असावे लागते. वंश भेदाला विरोध करणे, साम्राज्यवादाला विरोध करणे, निःशस्त्रीकरण हे मूलभूत तत्त्व भारतीय परराष्ट्र धोरणात अंगीकारले आहे .

**परराष्ट्र धोरण**

प्रत्येक राष्ट्र हे दुसऱ्या राष्ट्रावर अवलंबून असते आणि राष्ट्रा-राष्ट्रांना विविध प्रकारचे संबंध प्रस्थापित करावे लागतात. या संबंधाना निश्चित दिशा द्यावी लागते. हे करत असताना त्यांना धोरण ठरवावे लागते. यातूनच परराष्ट्र धोरणाची निर्मिती होते. एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राच्या बाबतीत स्विकारलेले धोरण किंवा व्यवहार म्हणजे परराष्ट्र धोरण होय. परराष्ट्र धोरण ही गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणावर अनेक घटक प्रभाव पाडतात ते निर्धारित घटक पुढीलप्रमाणे ऐतिहासिक व सांस्कृतिक घटक, विचार प्रणाली, नेतृत्त्व, जागतिक महासत्तांमधील संघर्ष, शेजारी देशांची नीती, आंतरराष्ट्रीय संघटना, राजकीय पक्ष, तसेच पर्यावरण संरक्षण, मानवाधिकार, दहशतवाद, अण्वस्त्राचा प्रसार रोखणे या आंतरराष्ट्रीय मुद्यांचाही प्रभाव भारतीय परराष्ट्र धोरणावर झालेला आहे.

भारतीय परराष्ट्र धोरणावर अंतर्गत व बाह्य घटकांचा प्रभाव पडतो. हे घटक परराष्ट्र धोरणाला दिशा देतात. याबरोबर भारतीय परराष्ट्र धोरणावर आंतरराष्ट्रीय राजकीय घडामोडींचा परिणाम होतो. अलिकडे परराष्ट्र धोरणात 'आर्थिक घटक' प्रभावी ठरत असून आंतरराष्ट्रीय व्यापाराची भूमिकाही परराष्ट्र धोरण प्रभावित करते.

**भारतीय परराष्ट्र धोरणाचा विकास**

आधुनिक कालखंडात पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी चीनचे पंतप्रधान चाऊ. एन. लाय यांच्या बरोबर पंचशील तत्त्वांची घोषणा केली. भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचे पंचशील हे महत्त्वाचे तत्त्व म्हणून पं. नेहरूंनी स्वीकारली. १) प्रादेशिक अखंडता २) अनाक्रमण ३) हस्तक्षेप न करणे ४) समानता ५) शांततामय सहजीवन. या पाच तत्त्वांचा परराष्ट्रीय धोरणात समावेश केला गेला. शांततामय सहअस्तित्वासाठी याची आवश्यकता असल्यामुळे ते परराष्ट्रीय धोरणाचे एक महत्त्वाचे तत्त्व मानले जाते. भारताने जातीभेद तसेच रंगभेदाला कडाडून विरोध केला. नोव्हेंबर १९४६ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत पहिल्या अधिवेशनात भारताने दक्षिण आफ्रिकेच्या जातीय भेदभावाच्या धोरणाची निंदा केली.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने संयुक्त राष्ट्राचे सभासदत्व स्विकारले आहे. युनोच्या सामूहिक सुरक्षा पद्धतीवर भारताचा विश्वास आहे व वेळोवेळी भारताने युनोला मदत केली आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने

आशिया व आफ्रिकेतील स्वातंत्र्य आंदोलनाला पाठिंबा दिला. आशिया व आफ्रिकेतील राष्ट्रात मैत्रीभाव तयार व्हावा म्हणून भारताने प्रयत्न केले. भारतीय संविधानाच्या ५१ व्या अनुच्छेदामध्ये आंतरराष्ट्रीय शांतता, सुरक्षा आणि न्यायाच्या अभिवृत्तीची तरतूद केली आहे. संयुक्त राष्ट्राच्या शांतता निर्माण करण्यासाठीच्या सैन्य कारवाईत भारताचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे.

भारतीय परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार म्हणून पं. नेहरूंना ओळखले जाते. पंडित नेहरूंनी भारतीय परराष्ट्र धोरणात आदर्श तत्त्वाचा आधार दिला, त्यांनी नैतिक मूल्यांची जोड परराष्ट्र धोरणाला दिली. पं. नेहरूंचे परराष्ट्र धोरण हे हितसंबंधांपेक्षा विचारसरणीवर भर देणारे होते.

**ब) भारताच्या परराष्ट्र धोरणाची उद्दिष्ट्ये**

**१. राष्ट्रांचे संरक्षण**

भारताने राष्ट्रांच्या संरक्षणाच्या दृष्टीने आपल्या परराष्ट्र धोरणाची आखणी केली आहे.

**२. राष्ट्रीय शक्तीत वाढ**

परराष्ट्र धोरणाची अंमलबजावणी व्यवस्थित होण्यासाठी शक्तीची आवश्यकता असते. भारत आपली राष्ट्रीय शक्ती वाढवण्यावर परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून प्रयत्न करत आहे.

**३. आर्थिक विकास**

भारताने आर्थिक विकासाच्या उद्दिष्टांसाठी जागतिक शांतता व सहकार्याचे आवाहन करून आपले उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करत आहे.

**४. राष्ट्राची प्रतिष्ठा**

भारत परराष्ट्र धोरणातून जागतिक प्रतिष्ठा प्राप्त करण्यासाठी राष्ट्रे सतत प्रयत्नशील आहे.

**५. साम्राज्यवादास विरोध**

साम्राज्यवादी धोरणासाठी युरोपीय राष्ट्रांनी आर्थिक गरजा, राष्ट्रीय प्रतिष्ठा यासाठी मागास प्रदेशांमध्ये आपला प्रभाव वाढवून आपल्या विचारधारांचा प्रचार केला. उदा. इंग्लड, स्पेन, फ्रान्स इत्यादी राष्ट्रांनी आपल्या सीमांचा विस्तार करण्यासाठी प्रयत्न केला. व्यापाराच्या निमित्ताने मागास देशात प्रवेश मिळवून हळूहळू त्या देशांना आपल्या वसाहती बनवले. पण साम्राज्य विस्ताराच्या बाबतीत भारताचे परराष्ट्र धोरण अनुकूल नाही.

**अलिप्ततावादी चळवळ**

अलिप्तता हा शब्दप्रयोग सर्वप्रथम पंडित नेहरूंनी १९५४ मध्ये कोलंबोतील एका भाषणात केला होता. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात लष्करी स्वरूपाच्या व गटातटाच्या राजकारणापासून अलिप्त राहणे म्हणजे अलिप्ततावाद होय. 'अलिप्ततावादाचे उद्गाते' असे नेहरूंना संबोधले जाते. पं. नेहरूंनी आपल्या आचरणातून

अलिप्ततावादाला आंतरराष्ट्रीय पातळीवर महत्त्वाचे स्थान प्राप्त करून दिले. विधायक क्रियाशील व निश्चित स्वरूपाचा नीतीप्रवाह म्हणून अलिप्ततावादी धोरणास महत्त्व आहे.

'होकारात्मक तटस्थता', असा अलिप्ततेचा अर्थ आहे. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू भारताच्या अलिप्ततावादी धोरणाचे स्पष्टीकरण करताना म्हणतात, ''कोणत्याही राष्ट्राचे अंकित म्हणून न राहता, आम्ही एक स्वतंत्र राष्ट्र या नात्याने आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये भाग घेऊ; आम्ही सत्तागटाच्या राजकारणापासून अलिप्त राहू इच्छितो. अमेरिका, रशिया या महासत्तांच्या गटामध्ये सामील न होता जागतिक व्यासपीठावर भारतास सन्मानाचे स्थान याद्वारे मिळविता येईल.''

**पार्श्वभूमी**

अलिप्ततावादी चळवळ ही शीतयुद्धाच्या काळातील अशा राष्ट्रांची संघटना होती. ज्या राष्ट्रांनी औपचारिकपणे अमेरिका किंवा रशिया या देशांच्या गटात सामील होण्यास नकार दिला होता. त्याऐवजी त्यांनी स्वतंत्र किंवा तटस्थ राहण्याचा प्रयत्न केला. या गटाची मूळ संकल्पना ही १९५५ मध्ये इंडोनेशिया येथे आयोजित आशिया-आफ्रिका बांडुंग परिषदेत झालेल्या चर्चेदरम्यान तयार झाली. अलिप्ततावादी चळवळीची पहिली परिषद (बेलग्रेड परिषद) ही १९६१ मध्ये युगोस्लावियाचे जोसेफ ब्रोझ टिटो, इजिप्तचे गमाल अब्देल नासेर, भारताचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू, घानाचे क्वामे नक्रुमा व इंडोनेशियाचे सुकर्णो यांच्या नेतृत्वाखाली पार पडली.

सन १९७९ च्या हवाना घोषणेमध्ये साम्राज्यवाद, वसाहतवाद, नववसाहतवाद, वंशवाद आणि सर्व प्रकारची विदेशी अधीनता यांच्याविरुद्ध अलिप्ततावादी देशांचे राष्ट्रीय स्वातंत्र्य, सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता व सुरक्षितता सुनिश्चित करणे, असा अलिप्ततावादी चळवळीचा उद्देश नमूद करण्यात आला होता.अलिप्ततावादी धोरण म्हणजे पूर्णपणे तटस्थता, असे होत नाही; तर याला जागतिक राजकारणातील शांततापूर्ण हस्तक्षेप, असे म्हणता येईल.

**अलिप्ततावादी चळवळीची तत्त्वे :**

या चळवळीची तत्त्वे जास्त प्रमाणात पंचशील सिद्धांतावर आधारित होती. त्यापैकी काही तत्त्वे महत्वपूर्ण खालीलप्रमाणे :

- यूएन चार्टर आणि आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये अंतर्भूत असलेल्या मूल्यांचा आदर करणे.
- सर्व राज्यांच्या सार्वभौमत्व, समानता आणि प्रादेशिक अखंडता यांचा आदर करणे.
- देश आणि लोकांच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विविधतेचा आदर करणे.
- देशाच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करण्यास मनाई.
- बहुपक्षीयता आणि बहुपक्षीय संघटनांना संभाषण आणि सहकार्याद्वारे उदभवलेल्या मानवी समस्यांचे निराकरण करण्यासाठी योग्य चौकट म्हणून प्रोत्साहन आणि संरक्षण देणे.

**भारत आणि अलिप्तता चळवळ :**

भारत हा अलिप्ततावादी चळवळीचा संस्थापक व सर्वांत मोठा सदस्य देश होता. १९७० पर्यंत भारत या चळवळीच्या बैठकांमध्ये प्रमुख्याने सहभागी होत असे. मात्र, भारताची तत्कालीन सोविएत युनियनशी जवळीक असल्यामुळे लहान सदस्य राष्ट्रांमध्ये गोंधळ निर्माण झाला होता. परिणामी, ही चळवळ कमकुवत झाली आणि छोटी राष्ट्रे युनायटेड स्टेट्स किंवा सोविएत युनियनकडे वळली. रशियाचे विघटन होत असताना, अमेरिकेच्या नेतृत्वाखाली एक ध्रुवीय जागतिक व्यवस्था उदयास आली. परिणामतः भारताचे नवे आर्थिक धोरण आणि युनायटेड स्टेट्सकडे झुकल्यामुळे मध्यंतरीच्या काळात भारताच्या वचनबद्धतेबद्दल शंका निर्माण झाली होती.

**महत्व:**

जागतिक शांतता राखण्यासाठी या चळवळीने सक्रिय भूमिका बजावली आहे. या चळवळीने नेहमीच प्रादेशिक अखंडता आणि सार्वभौमत्वाचे समर्थन केले. प्रत्येक राष्ट्राचे स्वातंत्र्य टिकवून ठेवण्याच्या बाबतीत या चळवळीने निरंतर प्रयत्न केले. ही चळवळ शाश्वत विकासाच्या संकल्पनेचे समर्थन करते; तसेच जगाला शाश्वततेकडे नेऊ इच्छिते. हवामानबदल, स्थलांतर व जागतिक दहशतवाद यांसारख्या जागतिक मुद्द्यांवर करार करण्यासाठी हे एक मोठे व्यासपीठ आहे.

ही चळवळ जागतिक न्याय्य व्यवस्थेचे समर्थन करते. या चळवळीकडे 'धोरणात्मक स्वायत्तता' म्हणून पाहिले पाहिजे; जी आजच्या काळाची मोठी गरज आहे. या चळवळीची तत्त्वे आजही राष्ट्रांना मार्गदर्शन करू शकतात. दहशतवाद, हवामानबदल यांसारखे जागतिक मुद्दे मांडण्यासाठी आणि व्यापार संरक्षणवादासाठी ही चळवळ एक व्यासपीठ म्हणून वापरली जाऊ शकते. तसेच या चळवळीचा वापर दक्षिण-पूर्व आशियाईतील चीनचा वाढता प्रभाव आणि सीमा विवादांसंबंधी जागतिक समर्थन मिळविण्यासाठी केला जाऊ शकतो.

**भारत-रशिया परराष्ट्र धोरणाचा इतिहास**

जेव्हा भारत एक असंलग्न देश आणि सोव्हिएत युनियन एक महासत्ता होता. १९५० आणि १९६० च्या दशकात, भारत आणि सोव्हिएत युनियनने प्रामुख्याने संरक्षण आणि आर्थिक सहकार्यामध्ये मजबूत संबंध निर्माण केले. शीतयुद्धाच्या काळात भारत आणि सोव्हिएत युनियनने आशियातील युनायटेड स्टेट्सच्या प्रभावाचा सामना करण्यासाठी मजबूत धोरणात्मक, लष्करी, आर्थिक आणि राजनैतिक भागीदारी कायम ठेवली.

रशियाला भारतासोबत व्यावसायिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक संबंध दृढ करायचे होते आणि किमान १८६० पासून भारतात राजनैतिक कार्यालय उघडायचे होते, परंतु भारतातील तत्कालीन ब्रिटिश सरकार त्याला विरोध करत होते. रशियाचे पहिले वाणिज्य दूतावास नोव्हेंबर १९०० मध्ये मुंबईत उघडण्यात आले. त्यावेळी मुंबई हे रशियन राजवटीत असलेल्या आशियाई प्रजासत्ताकांतील हज यात्रेकरूंसाठी

आरामदायी मुक्कामही होते. १९१० मध्ये वाणिज्य दूतावास कलकत्ता येथे हलविण्यात आला. भारताच्या स्वातंत्र्यानंतर १९४७ मध्ये संबंध प्रस्थापित झाले असताना सोव्हिएत नेते जोसेफ स्टॅलिन यांचा महात्मा गांधी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि जवाहरलाल नेहरू यांच्याबद्दल नकारात्मक दृष्टिकोन होता, ज्यांना ते ब्रिटीश आणि मक्तेदारी भांडवलशाहीचे हत्यार मानत होते. १२ एप्रिल १९४७ रोजी रशियाने नवी दिल्ली येथे आपला दूतावास उघडला. स्टॅलिनच्या मृत्यूनंतर दोन्ही राष्ट्रांमधील घनिष्ठ सहकार्याने संबंध अधिक चांगले झाले.

भारत आणि रशिया यांच्यातील राजनैतिक संबंध भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच १३ एप्रिल १९४७ रोजी सुरू झाले. स्वातंत्र्यानंतर लगेचच भारताचे उद्दिष्ट जड उद्योगातील गुंतवणुकीद्वारे आर्थिक स्वयंपूर्णता प्राप्त करणे हे होते. सोव्हिएत युनियनने जड मशीन-बांधणी, खाणकाम, ऊर्जा उत्पादन आणि पोलाद संयंत्रांच्या क्षेत्रात अनेक नवीन उद्योगांमध्ये गुंतवणूक केली. भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेदरम्यान, सोविएत युनियनच्या मदतीने सोळा अवजड उद्योग प्रकल्प उभारण्यात आले, त्यापैकी आठ प्रकल्प सुरू करण्यात आले. यामध्ये जगप्रसिद्ध आयआयटी बॉम्बेच्या स्थापनेचा समावेश आहे. भारत आणि रशियाने सहकार्याची अनेक नवीन क्षेत्रे ओळखली आहेत. यामध्ये खोल समुद्रातील शोधापासून ते विज्ञान आणि तंत्रज्ञान, नावीन्य, रोबोटिक्स आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्था निर्माण करणे, पायाभूत सुविधा, कौशल्य विकास, कृषी, जहाजबांधणी, रेल्वे, विमान वाहतूक आणि तामिळनाडूमधील कुडनकुलम साइटवर अणुभट्ट्यांच्या सहा युनिट्स यावर अधिक लक्ष केंद्रित केले.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच भारत आणि रशिया यांच्यातील राजनैतिक संबंध सुरू झाले होते. १९६५ मधील भारत-पाकिस्तान युद्धानंतर शांततेसाठी सोव्हिएत युनियनने मध्यस्थीचा प्रयत्न केला. याच प्रयत्नांना यश येत भारत-पाकिस्तानदरम्यान तत्कालीन सोव्हिएत युनियनमधील ‘ताश्कंद’ येथे शांतता करार प्रस्थापित झाला. जेव्हा १९७१ मध्ये बांगलादेश स्वतंत्र होण्यासाठी भारताने लष्करी मदत केली, तेव्हा एखादी जागतिक महाशक्ती भारताच्या बाजूने असणे महत्वाचे होते, त्यासाठी भारताने सोव्हिएत संघाशी ऑगस्ट १९७१ साली ‘इंडो-सोव्हिएत शांतता, मैत्री आणि सहकार्य करार’ केला, ज्यामध्ये परस्पर धोरणात्मक सहकार्य निर्दिष्ट केले होते. तेव्हापासून भारत-सोव्हिएत संघांच्या संबंधांना एक मजबूत दिशा मिळाली.

रशिया हा भारताचा दीर्घकाळ आणि विश्वासार्ह भागीदार आहे. भारत आणि रशियाचे राजकीय, आर्थिक आणि धोरणात्मक संबंध सोव्हिएत काळापासूनचे आहेत. दोन्ही देशांमधील संबंध परस्पर आदर, विश्वास आणि सहकार्याने वैशिष्ट्यीकृत आहेत. ९ ऑगस्ट १९७१ रोजी, दोन्ही राष्ट्रांनी मैत्री आणि सहकार्य करारावर स्वाक्षरी केली, ज्यामुळे त्यांची भागीदारी आणखी मजबूत झाली. या करारामध्ये दोन्ही देशांमधील परस्पर संरक्षण सहकार्य आणि सल्लामसलत, आर्थिक आणि वैज्ञानिक सहकार्य आणि सांस्कृतिक देवाणघेवाण यांचा समावेश होता. सोव्हिएत युनियनने नेहमीच काश्मीरबाबत भारताच्या भूमिकेचे समर्थन केले आहे आणि विविध आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर राजनैतिक समर्थन दिले आहे.

१९५१ मध्ये, यूएसएसआरने भारताच्या समर्थनार्थ काश्मीर वादावर आपला व्हेटो पॉवर वापरला. १९५३ मध्ये जोसेफ स्टॅलिन यांनी सर्वपल्ली राधाकृष्णन यांना सांगितले की, ''तुम्ही आणि श्रीमान नेहरू दोघेही अशा व्यक्ती आहात ज्यांना आम्ही आमचे शत्रू मानत नाही. हे आमचे धोरण कायम राहील आणि तुम्ही आमच्या मदतीवर विश्वास ठेवू शकता.'' हे संबंध १९५५ पर्यंत मजबूत झाले आणि अलिप्त राष्ट्र चळवळीतील देशांशी घनिष्ठ संबंध वाढवण्याच्या सोव्हिएत प्रयत्नांचे यशस्वी प्रतिनिधित्व केले. १९५५ मध्ये, पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी जून १९५५ मध्ये सोव्हिएत युनियनचा पहिला दौरा केला आणि कम्युनिस्ट पक्षाच्या पहिल्या सचिव निकिता ख्रुश्चेव्ह यांचा भारताचा परतीचा प्रवास १९५५ च्या शरद ऋतूमध्ये झाला. भारतात ख्रुश्चेव्ह यांनी अशी घोषणा केली. सोव्हिएत युनियनने काश्मीर प्रदेशाच्या विवादित भूभागावर आणि गोव्यासारख्या पोर्तुगीज किनारपट्टीवरील एन्क्लेव्हवर भारतीय सार्वभौमत्वाचे समर्थन केले.

१९५० च्या दशकात, भारताला पोलाद, संरक्षण, रेल्वे, बांधकाम उपकरणे, धातू आणि खाणकाम, पेट्रोकेमिकल्स इत्यादीसारख्या अनेक औद्योगिक क्षेत्रांमध्ये सोव्हिएतचे सहाय्य आणि तंत्रज्ञानाचे हस्तांतरण झाले. ख्रुश्चेव्हच्या काळात भारतासोबतच्या सोव्हिएत युनियनच्या मजबूत संबंधांचा चीनशी असलेल्या सोव्हिएत संबंधांवर आणि चीनसोबतच्या भारतीय संबंधांवर नकारात्मक परिणाम झाला. १९५९ च्या सीमा विवाद आणि ऑक्टोबर १९६२ च्या चीन-भारत युद्धादरम्यान सोव्हिएत युनियनने आपली तटस्थता घोषित केली, तरीही चिनी लोकांनी जोरदार आक्षेप घेतला. सोव्हिएत युनियनने भारताला भरीव आर्थिक आणि लष्करी मदत दिली आणि १९६०पर्यंत भारताला चीनपेक्षा जास्त सोव्हिएत मदत मिळाली. ही विषमता चीन-सोव्हिएत संबंधांमध्ये आणखी एक वादाचा मुद्दा बनली. १९६२ मध्ये सोव्हिएत युनियनने भारतामध्ये मिकोयान-गुरेविच मिग-२१ जेट फायटरचे सह-उत्पादन करण्यासाठी तंत्रज्ञान हस्तांतरित करण्याचे मान्य केले, जे सोव्हिएत युनियनने यापूर्वी चीनला नाकारले होते.

सोव्हिएत युनियनने १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धानंतर दोन्ही देशांच्या दरम्यान शांतता मध्यस्थ म्हणून यशस्वीरित्या काम केले. सोव्हिएत पंतप्रधान अलेक्सी कोसिगिन यांनी भारत आणि पाकिस्तानच्या प्रतिनिधींची भेट घेतली आणि त्यांना काश्मीरवरील लष्करी संघर्ष संपवण्यासाठी वाटाघाटी करण्यास मदत केली. ताश्कंद शांतता करारानंतर तत्कालीन भारतीय पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांचा मृत्यू हा आजही सर्वात मोठा वादग्रस्त चर्चेपैकी एक आहे.

**सारांश**

भारत आणि रशियाचे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात मजबूत द्विपक्षीय संबंध आहेत, जे त्यांच्या परराष्ट्र धोरणांमध्ये दिसून येतात. भारत रशियाला एक दीर्घकालीन आणि परीक्षित मित्र म्हणून ओळखतो ज्याने त्याच्या आर्थिक विकासात आणि सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. ऑक्टोबर २००० मध्ये राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या भारत भेटीदरम्यान ''भारत-रशिया धोरणात्मक भागीदारीवरील घोषणा'' वर स्वाक्षरी झाल्यापासून भारत-रशिया संबंधांना गुणात्मकरीत्या नवीन आयाम प्राप्त झाले आहेत. सध्या,

दोन्ही देश राजकीय, संरक्षण आणि सुरक्षा, व्यापार, अर्थव्यवस्था, विज्ञान आणि संस्कृती या सहा प्रमुख क्षेत्रांमध्ये त्यांचे द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यासाठी काम करत आहेत.

१९९१ मध्ये सोव्हिएत युनियनचे विघटन झाल्यानंतर भारत आणि रशिया यांच्यातील संबंध जुळवून घेण्याच्या कालखंडातून गेले. यावेळी, मॉस्कोने पाश्चिमात्य समर्थक धोरणाचा अवलंब केला. वरील गोष्टी असूनही अलीकडे भारत-रशिया संबंधांना आव्हानांचा सामना करावा लागत आहे.

*** स्वयं-अध्यायनासाठी प्रश्न क्र. १**

अ) योग्य पर्याय निवडा.

१. भारताचे परराष्ट्र धोरण हे .......होते.

अ) साम्राज्यवादी ब) वसाहतवादी क) अराजकतावादी ड) मानवतावादी

२. १९६४ पर्यंतच्या भारताच्या परराष्ट्र धोरणावर ....... च्या विचारांचा प्रभाव होता.

अ) प.जवाहरलाल नेहरू ब) इंदिरा गांधी

क) कृष्णमेनन ड) निकिता क्रूसचेव्ह

३. भारत आणि रशिया यांच्या राजनैतिक संबंधाना ....... पासून सुरुवात झाली..

अ) १० एप्रिल १९४७ ब) ११ एप्रिल १९४७

क) १२ एप्रिल १९४७ ड) १३ एप्रिल १९४७

४. भारत-पाकिस्तानदरम्यान शांतता करार तत्कालीन सोव्हिएत युनियनमधील....... येथे झाला.

अ) ताश्कंद ब) काठमांडू क) गीलगीट ड) परीस

५. जगप्रसिद्ध आयआयटी बॉम्बेच्या स्थापनेमध्ये ....ची महत्वपूर्ण भूमिका आहे.

अ) रशिया ब) बांगलादेश क) श्रीलंका ड) पाकिस्तान

**भारत- अमेरिका**

भारत आणि अमेरिका यांचे संबंध खूप जुने आहेत. दोन्ही देशांना ब्रिटिशांच्या गुलामगिरीचा कटू अनुभव आहे. भारताच्या स्वातंत्र्य लढ्याला अमेरिकेने मोठा पाठिंबा दिला होता. अमेरिकेच्या स्वातंत्र्याच्या जाहिरनाम्याने भारतीयांना प्रेरणा दिली होती. भारताचे नेते अमेरिकेला भेटून स्वातंत्र्य लढ्यासाठी पाठिंबा मागत असत. अमेरिकेचे राष्ट्रपती रूझवेल्ट यांनाही भारतात्या स्वातंत्र्य मिळावे असे वाटत होते.

भारताच्या स्वातंत्र्य लढ्याला अमेरिकेचा नैतिक पाठिंबा होता. पण शीतयुध्द् कालखंडात १९४९ पर्यंत भारत-अमेरिका संबंधात विशेष प्रगती होवू शकली नाही. या काळात अमेरिका साम्यवाद व युरोपच्या प्रश्नात गुंतून गेली होती. शीतयुध्दाची तीव्रता वाढत होती. या काळात अमेरिका स्वतःची स्थिती मजबूत करण्यात आणि जागतिक राजकारणात एक महाशक्ती म्हणून स्वतःला प्रस्थापित करण्यात गुंतून गेली होती. त्यामुळे त्यांना भारताबरोबर संबंध सुधारण्यात रस नव्हता. या काळात भारत स्वातंत्र्य चळवळीत गुंतला

होता. पंडीत नेहरूंना दोन्ही देशाचे संबंध सुधारण्याची गरज तीव्रतेने जाणवत होती. पण संबंध सुधारण्यात काळाची बंधनेच मोठी होती.

भारत स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरूंनी अमेरिकेसोबत मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला. यासाठी त्यांनी असफ अली आणि विजया लक्ष्मी पंडित यांना अमेरिकेत राजदूत म्हणून पाठवले. पण, या प्रयत्नांना अपेक्षित यश मिळाले नाही. त्यानंतर नेहरू स्वतः अमेरिकेला भेटले आणि त्यांनी भारताचे परराष्ट्र धोरण स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, भारत अलिप्त देश असला तरी लोकशाही आणि स्वातंत्र्याच्या प्रश्नांवर तो निष्क्रिय राहणार नाही.

दुसया महायुध्दानंतरच्या काळात युरोप आणि आशिया खंडामध्ये साम्यवादाचा प्रसार रोखणे हे अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचे मुख्य सूत्र बनले होते. युध्दाची झळ बसलेल्या युरोपियन राष्ट्रांना आर्थिक मदत पुरविण्यासाठी अमेरिकेने ट्रुमन आणि मार्शल योजना सारख्या धोरणाचा पुरस्कार केला. पण आशिया-आफ्रिका खंडामध्ये नवस्वतंत्र राष्ट्रांना साम्यवादापासून दूर ठेवणे अमेरिकेसाठी गरजेचे होते. या राष्ट्राच्या आर्थिक दुर्बलतेचा फायदा सोविएत रशिया उचलण्याची भीती अमेरिकेला होती. त्यामुळे अमेरिकेला आशिया खंडामध्ये आपल्या साम्यवाद विरोधी धोरणाचे प्रतिनिधीत्व करेल असा सहकारी हवा होता. दुसऱ्या महायुध्दाच्या काळात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष एफ.डी. रूझवेल्ट यांना अमेरिकेची ही गरज चीन पूर्ण करू शकेल असे वाटले. परंतू चीनमध्ये साम्यवादी कांती यशस्वी झाल्यानंतर अमेरिकेचे स्वप्न भंग पावले. त्यामुळे आता सोविएत रशिया बरोबरच चीनवर नियंत्रण ठेवणारी समतूल्य सत्ता असणे ही अमेरिकेची महत्वाची गरज होती. त्याकाळात ही गरज पूर्ण करू शकणारी दोनच राष्ट्रे होती. एक भारत व दुसरा जपान त्यामुळे स्वातंत्र्यानंतर लगेचच भारताला आशिया खंडातील अमेरिकेच्या साम्यवादविरोधी धोरणामध्ये समाविष्ट करून घेण्याचे प्रयत्न चालू झाले होते. या आधारावर संबंध सुधारण्याची अपेक्षा केली जात होती. पण पंडीत नेहरू यांनी आखलेले भारतीय परराष्ट्र धोरण अमेरिकेच्या इच्छेविरूध्द् होते. नेहरूंची विचारसरणी अलिप्ततावादाची असली तरी त्याचा कल सोविएत रशियाकडे होता. याचा प्रत्यय लगेचच आला. ''पूर्व युरोपमधील झेकोस्लोव्हकिया, हंगेरी, बल्गेरिया, रूमानिया यासारख्या देशाना जबरदस्तीने साम्यवादी बनविण्याचा प्रयत्न सोविएत रशियाकडून झाला, तेव्हा भारताकडून कोणताही निषेध झाला नाही.'' यामुळे भारत- अमेरिका संबंधात तणाव निर्माण झाला. नेहरूंचे हे धोरण सोविएत रशियाकडे झुकणारे असूनही अमेरिकेने नेहरूंचे मन वळविण्याचा प्रयत्न चालूच ठेवला होता.

भारत आणि अमेरिका यांच्या संबंधात काळाच्या ओघात अनेक अडचणी निर्माण झाल्या. यातले काही प्रश्न दोन्ही देशांच्या आंतरिक परिस्थितीशी संबंधित होते. यामुळे दोन्ही देशांचे संबंध बिघडले. विशेषतः कश्मीरचा प्रश्न हा भारताच्या स्वातंत्र्यापासूनच सुरू आहे. शीतयुद्धाच्या काळात हा प्रश्न अधिकच गंभीर बनला. काश्मीरचे भौगोलिक स्थान खूप महत्त्वाचे असल्याने अमेरिका या प्रदेशावर नियंत्रण ठेवून चीन, रशिया आणि भारताच्या हालचालींवर नजर ठेवू इच्छित होती. त्यामुळे अमेरिका काश्मीरला स्वतंत्र राष्ट्र बनवण्याच्या बाजूने होती. अमेरिकेने कश्मीरमधील स्वातंत्र्य लढ्याला पाठिंबा दिला आणि भारतातील कश्मीरचे विलीनीकरण हे बेकायदेशीर असल्याचा दावा केला. संयुक्त राष्ट्रसंघाच्या ठरावांनुसार या प्रश्नाचे

निराकरण सार्वजनिक मताच्या आधारे व्हावे, अशी अमेरिकेची भूमिका होती. यामुळे भारत आणि अमेरिका यांच्यातील तणाव वाढला.

सन १९४९ मध्ये माओ-त्से-तुग याच्या नेतृत्वाखाली चीन साम्यवादी राष्ट्र म्हणून उदयास आले. भारताच्या दृष्टीकोनातून चीनचे महत्व लक्षात घेवून नेहरूंनी डिसेंबर १९४९ मध्ये चीनला मान्यता दिली. यावर ट्रुमन प्रशासन नाराज झाले. सोविएत रशियाच्या साम्यवादी धोरणाला पाठिंबा देणारे कृत्य असून जगात साम्यवादाला प्रोत्साहन मिळेल अशी भिती व्यक्त केली. यामुळे तणावात भर पडली. कोरिया संघर्ष १९५० मध्ये निर्माण झाला. भारताने प्रथम उत्तर कोरियास आक्रमक ठरवून एक प्रकारे अमेरिकेचे समर्थन केले. पण नंतर अमेरिकेने कोरिया प्रश्नाचा उपयोग चीनला शह देण्याचे साधन म्हणून केला. अमेरिकन सैन्याने ३८ अक्षास ओलांडून जाण्याचा निर्णय घेतला त्यावेळी भारताने अमेरिकेला विरोध केला. शिवाय "Uniting for peace Resolution" या प्रस्तावावर कडक शब्दात टीका केली. यामुळे तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. सन १९५३ साली अमेरिकेत सत्तांतर घडून आले. यानंतर अमेरिकेच्या अध्यक्षपदी ''डिवट डेव्हिड आयसेन हॉवर'' यांची निवड झाली.

आयसेन हावर प्रशासनाने भारताला एकटे पाडण्याचा, पंडित नेहरूंच्या प्रभावाला कमी करण्याचा आणि तिसऱ्या जगातील राष्ट्रवादाला पाठिंबा देणारे नेहरू यांचे पंख छाटण्याचा प्रयत्न केला. भारताला पाश्चिमात्य देशांची सहानुभूती आणि संयुक्त राष्ट्र संघटनेचा पाठिंबा मिळू नये, यासाठी अमेरिकेने जाणीवपूर्वक प्रयत्न केले. पं. नेहरू यांचे धोरण सोवियत रशियाकडे झुकलेले असले तरी, अमेरिकेने नेहरूंचे मन वळवण्याचा प्रयत्न चालूच ठेवला. १९५४ मध्ये, अमेरिकेने भारताला आर्थिक आणि लष्करी मदत देण्याची तयारी दर्शवली, परंतु नेहरू यांनी नकार दिला. यामुळे, अमेरिकेने पाकिस्तानसोबत संरक्षण करार केला आणि पाकिस्तानला सिटो आणि सेंटो या लष्करी करारांत सामील केले. यामुळे पाकिस्तानला आर्थिक आणि लष्करी मदत मिळू लागली आणि आशियातील सत्ता संतुलन ढासळू लागले. भारताने अमेरिकेच्या या धोरणावर कडक टीका केली.

पंडित नेहरूंच्या काळात भारत आणि सोवियत रशिया यांच्यात मैत्रीपूर्ण संबंध वाढले. १९५५ मध्ये नेहरू रशियाला आणि नंतर रशियन नेते क्रुश्चेव्ह व बुल्गानिन भारताला भेटले. या भेटींमुळे 'भारत-रशिया भाई-भाई' अशी घोषणा झाली. यामुळे अमेरिका अधिक नाराज झाली. १९५४ नंतर अमेरिका काश्मीर प्रश्नावर पाकिस्तानचे समर्थन करू लागली, तर रशिया भारताचे समर्थन करू लागले. यामुळे दोन्ही देशांमध्ये तणाव वाढला. मात्र, १९५६ मध्ये सुएझ कालवा प्रश्नावर भारताने अमेरिकेचे समर्थन केल्याने दोन्ही देशांचे संबंध सुधारले. १९५९ मध्ये अमेरिकेचे राष्ट्रपती आयसेनहावर भारताला भेटले आणि दोन्ही देशांमध्ये मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण झाले.

१९६१ मध्ये जॉन एफ. केनेडी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाले. केनेडी भारताचे मित्र होते आणि नेहरूंचा आदर करत होते. शीतयुद्धाच्या काळात भारत-अमेरिका संबंध हे सर्वात चांगले केनेडीच्या काळात होते.

केनेडी प्रशासनाने तिसऱ्या जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आणि भारत एक जागतिक सत्ता बनू शकते असे मानले. त्यामुळे, केनेडींनी भारत-अमेरिका संबंध मजबूत करण्याचा प्रयत्न केला.

गोवा मुक्तीच्या प्रश्नावर दोन्ही देशांमध्ये मतभेद निर्माण झाले. नेहरू गोवा शांततेच्या मार्गाने मुक्त करू इच्छित होते, पण नंतर लष्करी कारवाई करण्याचा निर्णय घेतला. अमेरिकेने भारताला सहा महिने वाट पाहण्यास सांगितले, पण भारत सरकारने हे मान्य केले नाही. गोवा मुक्त करण्याच्या भारताच्या निर्णयामुळे अमेरिका अडचणीत आली. एकीकडे, अमेरिका वसाहतवाद विरोधी होती, तर दुसरीकडे, नाटोचा सदस्य असल्यामुळे पोर्तुगालला समर्थन देणे आवश्यक होते. १९६१ मध्ये भारताने गोवा मुक्त केले आणि संयुक्त राष्ट्र संघात अमेरिकेने भारतावर टीका केली. यामुळे दोन्ही देशांमध्ये तणाव वाढला. नेहरूंनी अमेरिकेला गोवा मुक्तीची पूर्वसूचना न दिल्यामुळे दोन्ही देशांमध्ये संशय निर्माण झाला.

चीनने १९६२ मध्ये अचानक भारताच्या सीमेवर आक्रमण केले. लडाख आणि नेफा या प्रदेशांवर चीनने कब्जा केला. या आक्रमणामुळे भारत मोठ्या संकटात सापडला. चीनचे सैन्य नेफामध्ये मजबूत झाल्यामुळे आसामला धोका निर्माण झाला. या परिस्थितीत भारताला इतर देशांकडून मदत घ्यावी लागली. अशा वेळी अमेरिकेने भारताला मदत करण्याचे ठरवले. अमेरिकेने भारताला शस्त्रास्त्रे आणि इतर साहित्य पुरवले. त्यामुळे भारत-अमेरिका संबंध मजबूत झाले. केनेडी प्रशासनाने भारताला लष्करी आधुनिकीकरणासाठी मदत केली.

पंडित नेहरू यांनी भारत स्वतंत्र झाल्यापासून १९६४ पर्यंत परराष्ट्र विभाग स्वतःकडे ठेवला. भारत-अमेरिका संबंध बऱ्याच वेळा तणावपूर्ण राहिले पण हे संबंध पूर्णपणे कधीच तुटले नाहीत. हे संबंध विकसीत होत असताना आर्थिक आणि व्यापारी हित संबंधांना महत्वपूर्ण स्थान होते. या काळात भारतास "AID (Agency for International Development) अंतर्गत आर्थिक साह्य P.L.480 धोरणाअंतर्गत भारतास गव्हाचा पुरवठा केला. महत्त्वपूर्ण गोष्ट म्हणजे डिसेंबर १९६३ मध्ये दोन्ही देशांत करार होवून अमेरिकेने 'तारापूर अणूऊर्जा' प्रकल्पासाठी ८ लाख डॉलर देण्याचे मान्य केले. ३० वर्षाच्या या करारानुसार या प्रकल्पासाठी समृध्द युरेनियम इंधन देण्याचेही मान्य केले. हा करार भविष्यातील दोन्ही देशाच्या संबंधाचा मजबूत पाया होता. नेहरू काळात भारत-अमेरिका संबंध मैत्रीपूर्ण कमी आणि तणावपूर्णच जास्त राहिले.

पंडित नेहरू यांच्या निधनानंतर लाल बहादुर शास्त्री भारताचे पंतप्रधान बनले. तर अमेरिकेतही केनेडी यांची हत्या झाल्यामुळे अध्यक्षपदी 'लिंडन बेन्स जॉन्सन' याची निवड झाली. शास्त्री काळात १९६५ मध्ये अमेरिका व्हिएतनाम युध्दात गुंतली होती. उत्तर व्हिएतनामवर बॉम्ब वर्षाव करण्याच्या अमेरिकेच्या निर्णयावर भारताने कठोर टिका केली. १६ एप्रिल १९६५ च्या लाल बहादुर शास्त्रींच्या अमेरिका भेटीवेळी त्यांच्या स्वागताबाबत जॉन्सन प्रशासनाने असमर्थता दर्शविली. ही भारतास अपमानकारक घटना होती. यामुळे दोन्ही देशांच्या संबंधात वितुष्ट आले.

१९६५ च्या भारत-पाकिस्तान युध्दात अमेरिकेने भारताविरोधी भूमिका घेतली. या युध्दात पाकिस्तानने अमेरिकेच्या लष्करी सहाय्यातून मिळालेले 'पॅटन रनगाडे' आणि इतर शस्त्रांचा भारताविरूद्ध वापर केला. या

युध्दाच्या युध्दबंदी कराराची बोलणी ताश्कंद येथे झाली. यात रशियाने महत्वाची भूमिका बजावली. रशियाचा दक्षिण आशिया भागात प्रभाव वाढल्याचा अमेरिकने गैरसमज करून घेतल्याने संबंधात उदासीनता आली.

**सारांश :**

सन १९४० च्या दशकाच्या उत्तरार्धात अमेरिका भारताला पाकिस्तानपेक्षा अधिक महत्त्व देत होती. पण, शीतयुद्धाच्या काळात नेहरूंचे तटस्थ राहण्याचे धोरण अमेरिकेला आवडले नाही. अमेरिकेचे अधिकारी भारताला आपल्या बाजूने उभे राहावे असे म्हणत होते. अमेरिकेचे राजदूत हेन्री एफ. ग्रेडी यांनी नेहरूंना स्पष्टपणे सांगितले की, भारताला लोकशाहीच्या बाजूने उभे राहावे लागेल.

सन १९४९ मध्ये नेहरूंचा अमेरिका दौरा अपेक्षित यशस्वी झाला नाही. दोन्ही देशांमध्ये मतभेद उभे राहिले. नेहरू आणि कृष्ण मेनन यांचे मत होते की, भारताने अमेरिकेशी संबंध सुधारून आपली ताकद वाढवावी. अमेरिका नेहरूंना मदत करण्यास तयार होती, पण नेहरूंनी त्यांची ऑफर नाकारली. त्यामुळे भारताला अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणात गहू मिळण्याची संधी चुकली.

चीनमध्ये कम्युनिस्ट सरकार आल्यानंतर अमेरिकेने भारताला त्याला मान्यता देऊ नये असा सल्ला दिला होता, पण भारत तटस्थ राहिला. मात्र, कोरिया युद्धात उत्तर कोरियाने दक्षिण कोरियावर आक्रमण केले तेव्हा भारताने अमेरिकेला पाठिंबा दिला. भारताने युद्ध थांबवण्यासाठी मध्यस्थीची भूमिका निभावली आणि अमेरिका आणि चीन यांच्यात संदेशवहनाचे काम केले. भारताने स्वतः युद्धात सैनिक पाठवले नाहीत, पण संयुक्त राष्ट्रांना ३४६ डॉक्टरांची टीम पाठवली. या काळात भारताला अमेरिकेकडून अन्नधान्याची मदतही मिळाली. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या बारा वर्षांत अमेरिकेने भारताला १७०० दशलक्ष डॉलर्सची मदत केली.

१९५९ मध्ये, आयझेनहॉवर हे भारत आणि अमेरिका या दोन्ही देशांमधील संबंध मजबूत करण्यासाठी भारताला भेट देणारे पहिले अमेरिकन राष्ट्रपती होते. त्यांच्या या भेटीला इतके महत्त्व देण्यात आले की, न्यूयॉर्क टाइम्सने लिहिले की, ''नेहरूंनी अमेरिकेकडून चीनच्या आक्रमणासाठी मदत मागितली होती की नाही, याचा फारसा फरक पडत नाही. महत्त्वाचे म्हणजे अमेरिका भारताला पाठिंबा देत आहे.''

जेव्हा भारताने १९६१ मध्ये गोव्याला पोर्तुगीजांच्या ताब्यातून मुक्त केले, तेव्हा अमेरिकेने या कारवाईचा निषेध केला. केनेडी प्रशासनाने भारताला सर्व सैन्य गोव्यातून काढून घेण्याची मागणी केली आणि परिणामी भारताला मिळणारी आर्थिक मदतही कमी करण्याची धमकी दिली.परिणामी भारताच्या संरक्षण मंत्री व्ही.के. कृष्ण मेनन यांनी अमेरिकेच्या या निर्णयाला तीव्र शब्दांत विरोध केला. त्यांनी अमेरिकेच्या उपनिवेशवादी वृत्तीची निंदा केली १९६२ मध्ये जेव्हा चीनने भारतावर आक्रमण केले, तेव्हा अमेरिकेने उघडपणे भारताला पाठिंबा दिला. अमेरिकेने भारताला शस्त्र, दारूगोळा आणि कपडे पुरवले.

अमेरिका १९६२ च्या भारत-चीन युद्धानंतरही भारतावर पुन्हा एकदा चीन हल्ला करू शकतो याची चिंता करत होती. त्यामुळे अमेरिका भारताचे रक्षण करण्यासाठी तयार होती आणि त्यासाठी तिने अण्वस्त्रांचा वापर करण्याचाही विचार केला होता.

दुसरीकडे, भारतात अमेरिकेचे जे राजदूत होते, ते जॉन केनेथ गालब्रेथ होते. ते एक प्रसिद्ध उदारमतवादी अर्थशास्त्रज्ञ होते आणि भारताच्या जवळचे मानले जात होते. भारतात असताना त्यांनी कानपूर येथील भारतीय तंत्रज्ञान संस्थेत पहिले भारतीय संगणक विज्ञान विभाग स्थापन करण्यात मदत केली.

*** स्वयं-अध्यायनासाठी प्रश्न क्र. २**

अ) योग्य पर्याय निवडा.

१. ..... यांनी अमेरिकेत भारतीय राजदूत या पदावर कार्य केले.

अ) विजया लक्ष्मी पंडीत　　ब) लाल बहादूर शास्त्री

क) पंडीत जवाहरलाल नेहरू　　ड) रॉबेस्पिअर

२. भारत स्वतंत्र झाल्यापासून १९६४ पर्यत परराष्ट्र विभाग......यांच्याकडे होता.

अ) व्ही. के. कृष्ण मेनन　　ब) पंडीत जवाहरलाल नेहरू

क) सरोजनी नायडू　　ड) विजया लक्ष्मी पंडीत

३. अमेरिकेने 'तारापूर अणूऊर्जा' प्रकल्पासाठी ........लाख डॉलर देण्याचे मान्य केले.

अ) ८ लाख डॉलर　ब) ९ लाख डॉलर　क) १० लाख डॉलर　ड) ११ लाख डॉलर

४. १९६५ च्या भारत...... युध्दात अमेरिकेने भारताविरोधी भूमिका घेतली.

अ) बांगलादेश　ब) रशिया　क) चीन　ड) पाकिस्तान

५. ..........याच्या नेतृत्वाखाली चीन साम्यवादी राष्ट्र म्हणून उदयास आले.

अ) माओ-त्से-तुग　ब) हो ची मिन्ह　क) चौ एन लै　ड) जॉन केनेथ गालब्रेथ

**भारत-चीन परराष्ट्र संबंध**

१९४९ साली पीपल्स रिपब्लिक ऑफ चायनाची स्थापना झाली, तेव्हापासून चीन, सोव्हियत युनियन (नंतरचे रशिया) आणि युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका (अमेरिका) या धोरणात्मक, शक्तीशाली त्रिकोणावर चीनने आपले लक्ष केंद्रित केले. मग त्या त्रिकोणाच्या दृष्टीकोनातून चीनने भारताबद्दलची धोरणनिश्चिती केली. हा त्रिकोण जसजसा विकसित होत गेला आहे, त्याप्रमाणे त्याचा थेट परिणाम भारत-चीन संबंधांवर होताना दिसून येतो.

०१ आक्टोंबर १९४९ मध्ये चीनमध्ये कम्युनिस्ट सरकार आल्यानंतर भारत हा पहिला देश होता ज्याने चीनबरोबर राजकीय संबंध प्रस्थापित केले.मात्र नव्याने स्वतंत्र झालेल्या आशियाई देशांमध्ये अमेरिका आपले पाय रोवू नये. यासाठी, चीन हे आशियायी एकता या संकल्पनेला महत्त्व देत होते. त्यांचे धोरण होते की, युद्धानंतरच्या काळात आशियाई सरकारांनी तटस्थ भूमिका घ्यावी आणि चीनला आशियातील सर्व देशांना एकत्र आणण्यात मदत करावी. या धोरणात भारताला खूप महत्त्व होते आणि चीन हे भारतावर खूप जोर देत होते.

चीनचे भारतविषयक धोरण दोन प्रमुख उद्देशांवर आधारित होते. पहिले, भारत अमेरिकेच्या प्रभावाखाली येणार नाही याची काळजी घेणे आणि चीनशी संबंधित कोणत्याही मुद्द्यावर भारत तटस्थ राहिल याची खात्री करणे. आणि दुसरे विकसनशील देशांमध्ये भारताचे स्थान आणि प्रभाव याचा वापर करून आशियायी एकता या संकल्पनेला बळ देणे आणि अमेरिकेच्या वाढत्या प्रभावाला आळा घालणे. भारताला अमेरिकेपासून लांब ठेवणे हेच चीनच्या धोरणातले प्रमुख तत्त्व होते

चीनच्या जागतिक दृष्टिकोनात भारताचे स्थान काय होते? नेहरू आणि माओ यांचे १९३० च्या दशकातील पत्रव्यवहारावरून याची चाहूल लागते. १९३९ मध्ये नेहरू चीनला गेले आणि माओ यांच्या सहकाऱ्यांना भेटले. १९४२ मध्ये चँग-कै-शेख यांनी भारताच्या स्वातंत्र्य लढ्याला पाठिंबा दिला. माओला जागतिक घडामोडींमध्ये रस असल्याने त्याला भारताचा स्वातंत्र्य लढा माहीत असला पाहिजे, पण १९४५ पर्यंत त्याने याचा उल्लेख केला नाही. खरं तर, अनेक आशियाई आणि आफ्रिकन देशांनी भारताच्या लढ्यातून प्रेरणा घेत स्वातंत्र्य लढे सुरू केले होते. माओ केवळ वसाहतींच्या स्वातंत्र्य चळवळींचा उल्लेख करत. माओने भारताच्या नेतृत्वाची दखल घेतली नाही.

गेल्या सात दशकांपासून चीन स्वतःला सशक्त करण्यावर अधिक लक्ष केंद्रित करत होता. त्याच्या दृष्टिकोनात भारत हा एक मोठा स्पर्धक होता जो त्याच्या विकासाला अडथळा आणू शकतो. त्यामुळे चीनने भारताला एक शत्रू म्हणून पाहिले आणि कमकुवत करण्याचा प्रयत्न केला. शीतयुद्धाच्या काळात चीनने भारताला तटस्थ राहण्यास प्रोत्साहित केले, तर शीतयुद्धानंतर भारताला प्रतिस्पर्धी म्हणून पाहिले.

चीनने कधीही भारताला आपला समकक्ष मानले नाही. नवीन उघड झालेल्या गोपनीय कागदपत्रांनुसार, चीन सरकारमध्ये सर्वात वरच्या पातळीवरून भारताबद्दल अविश्वास होता. माओ नेहरूंबद्दल नकारात्मक दृष्टिकोन धारण करत होता. १९४९ मध्ये माओने भालचंद्र त्र्यंबक रणदिवे यांना लिहिलेल्या पत्रात नेहरूंना साम्राज्यवादाचा मदतनीस असे संबोधले होते.या काळात चीनला असे वाटत नव्हते की भारत आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून उदयास येईल. चीनच्या दृष्टिकोनातून भारत त्यांच्या बरोबरीचा नव्हता आणि त्यांची विचारधाराही भिन्न होती. चीनला असे वाटत होते की, भारत अमेरिकेच्या नेतृत्वाखालील साम्राज्यवादी गटाचा एक भाग आहे आणि तो कोणतेही स्वतंत्र निर्णय घेऊ शकत नाही.

**पं. नेहरूंचा चीनबद्दलचा विश्वास**

१९५४ मध्ये, नेहरूंनी सार्वजनिकपणे जाहीर केले की, चीनची सरकार आणि जनता शांततेसाठी इच्छुक आहे. त्यांना वाटत होते की चीनशी शांतिपूर्ण संबंध स्थापित करणे शक्य आहे आणि दोन्ही देशांमध्ये सहकार्याचे वातावरण निर्माण होऊ शकते. परिणामतः १९५६ मध्ये झालेल्या कॉमनवेल्थ देशांच्या शिखर बैठकीत भारताने चीनला पाठिंबा दिला. भारत आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर चीनच्या बाजूने उभा होता. शीतयुद्धाच्या वातावरणात, भारत आणि चीन दोन्ही नव्याने स्वतंत्र झालेले देश होते आणि त्यांना एकमेकांशी सहकार्य करून आशियातील शांतता आणि स्थिरता साधायची होती.चीन बाबत नेहरूंचा नेहमीच आशावादी दृष्टीकोन होता.

चीनचे पंतप्रधान चाऊ एन लाई यांनी जून १९५४ मध्ये भारताला भेट दिली आणि पंतप्रधान नेहरू यांनी ऑक्टोबर १९५४ मध्ये चीनला भेट दिली. चाऊ एन लाई यांनी जानेवारी १९५७ आणि एप्रिल १९५७ मध्ये पुन्हा भारताला भेट दिली. १९६२ पासून झालेल्या चीन-भारत संघर्षामुळे द्विपक्षीय संबंधांना मोठा धक्का बसला. भारत आणि चीन यांच्यातील असमानता आणि राजकीय परिस्थिती लक्षात घेता, चीनला वाटते की भारत आपला स्वार्थ सोडून चीनशी मैत्रीपूर्ण संबंध राखेल. त्यामुळे चीन भारतवर दबाव टाकत आहे की, तो आपल्या चिंतांना महत्त्व देईल. मात्र, भारत आपल्या अंतर्गत समस्यांवर लक्ष केंद्रित करून चीनशी संबंध बिघडू देऊ नये, असे चीन म्हणत असले तरी, त्याचा खरा हेतू भारताशी धोरणात्मक खेळ करणे हाच आहे. चीन नेहमी आक्रमकपणा दाखवून आपला मुद्दा सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो. चीनला समजते की भारत त्याला प्रत्युत्तर देण्याच्या स्थितीत नाही, म्हणून तो भारतवर प्रभुत्व गाजवण्याचा प्रयत्न करतो.

१९५५ मध्ये भरलेली बांडुंग परिषद खूप महत्वाची होती. चीनने भारताशी संबंध विकसित करताना आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्तेचे समीकरण कसे बदलत आहे, याचा विचार केला. चीनचे मुख्य उद्दिष्ट होते की भारत तटस्थ राहिले पाहिजे. म्हणजेच, भारत कोणत्याही मोठ्या शक्तीच्या बाजूने उभा राहू नये. चीनला असे वाटत होते की, जर भारत त्यांच्या या अपेक्षेनुसार वागला तर त्यांचे धोरण यशस्वी होईल.चीनने भारताला आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न केला. चीनला भारताला एक मित्र म्हणून पाहण्यापेक्षा, एक साधन म्हणून पाहिले.

१९५८ नंतर धोरणात्मक समीकरणे बदलल्यामुळे चीनचे भारत-धोरण अधिकच गुंतागुंतीच झाले. परिणामी अमेरिका आणि रशिया दोघेही भारताला पाठिंबा देत आहेत. आपण अडचणीच्या काळातून जात असताना आपल्याला अद्दल घडवावी धडा शिकवावा अशी त्यांची इच्छा आहे. पण दुटप्पी भूमिका चीनने घेतली. परिणामतः १९६२ चे यूद्ध झाले मात्र या युद्धाने फारसे काही साध्य झाले नाही.

**सारांश**

एकंदरीतच चीन भारताला आपला समकक्ष समजत नव्हता. पाश्चिमात्य राष्ट्रांशी भारताची विचारधारा जुळते असे चीनला नेहमीच वाटत असे. चीनला असे वाटत होते की, भारत त्यांच्या बरोबरीचा देश नाही. या कारणांमुळे चीनला भारतावर विश्वास नव्हता. चीन इतर देशांकडून येणाऱ्या दबावाचा सामना करत होता.

भारताचे चीनसंबंधी परराष्ट्र धोरण हे इतिहास, भू-राजनीती, आर्थिक आणि सामरिक मुद्द्यांवर आधारित आहे.

भारत आणि चीन यांच्यातील सीमा विवाद हा दोन्ही देशांमधील महत्त्वाचा प्रश्न आहे. विशेषत: अरुणाचल प्रदेश आणि अक्साई चीन भागावरून दोन्ही देशांमध्ये तणाव आहे. त्यामुळे भारताचे धोरण सीमा सुरक्षा मजबूत करण्यावर आहे. भारत आणि चीन यांच्यातील आर्थिक संबंध मोठ्या प्रमाणात वाढले आहेत, व्यापारातील असमतोलता भारतासाठी चिंतेचा विषय आहे. भारत-चीन संबंधांमध्ये आशियाई महासत्तेसाठी स्पर्धा आहे. विशेषतः हिंद महासागर क्षेत्रात आणि दक्षिण आशियाई देशांमध्ये प्रभाव वाढविण्यासाठी दोन्ही देशांनी आपले प्रयत्न वाढवले आहेत. चीन आणि पाकिस्तानमधील निकट संबंध भारतासाठी धोरणात्मक आव्हान आहे.

१९६२ च्या संघर्षानंतर भारताचे चीनबाबतचे धोरण अधिक कठोर झाले आहे. दोन्ही देशांमधील सैनिकी तणावानंतर भारताने चीनशी संबंधांचे पुनरावलोकन केले आहे.भारताने इंडो-पॅसिफिक क्षेत्रात अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया यांसारख्या देशांशी सहकार्य वाढवले आहे, ज्याचा उद्देश चीनच्या वाढत्या प्रभावाला तोंड देणे आहे. हे धोरण भारताच्या सार्वभौमत्वाच्या संरक्षणासाठी आणि चीनच्या आक्रमक धोरणांना प्रत्युत्तर देण्यासाठी नेहरू कालखंडात अतिशय समन्वयवादी परराष्ट्र धोरणाची आखणी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केली.

* स्वयं-अध्यायनासाठी प्रश्न क्र. ३

अ) योग्य पर्याय निवडा.

१. ..... साली पीपल्स रिपब्लिक ऑफ चायनाची स्थापना झाली

अ) १९४९ ब) १९५० क) १९५१ ड) १९५२

२. १९४२ मध्ये ...... यांनी भारताच्या स्वातंत्र्य लढ्याला पाठिंबा दिला.

अ) व मेनन ब) चिआंग काइ-शेक क) झिनपिंग ड) चाऊ एन लाई

३. १९५६ मध्ये झालेल्या ......... देशांच्या शिखर बैठकीत भारताने चीनला पाठिंबा दिला.

अ) कॉमनवेल्थ ब) आशियायी क) युरोपीय ड) साम्राज्यवादी

४. चीनचे पंतप्रधान ......... यांनी जून १९५४ मध्ये भारताला भेट दिली

अ) माओ ब) चाऊ एन लाई क) नेबुर ड) झिनपिंग

५. सन ..........मध्ये बांडुंग परिषद भरली.

अ) १९५५ ब) १९५६ क) १९५७ ड) १९५८

## १.४ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ :

१. राष्ट्रवाद : राष्ट्र आणि राष्ट्रभूमी यांना आदर्श मानून त्यांवर निष्ठा ठेवणारी आधुनिक राजकीय विचारप्रणाली व त्यावर आधारलेला ध्येयवाद म्हणजेच राष्ट्रवाद होय.

२. साम्राज्यवाद : जगातील भूप्रदेशावर आपले राजकीय व आर्थिक वर्चस्व निर्माण करण्यासाठी चाललेली संघर्षाची स्पर्धा म्हणजे साम्राज्यवाद होय.

३. आरमारी सामर्थ्य : इंग्लंड या देशाचे समुद्रावरील सैनिकी वर्चस्वाला आरमारी सामर्थ्य म्हटले जाते.

४. परिषद : जगातील राष्ट्रांनी आपले प्रश्न सोडवण्यासाठी एका निश्चित ठिकाणी बोलावलेली सभा

५. शांतता करार : विचार विनिमयाच्या माध्यमातून केलेली वाटचाल

## १.५ स्वंय अध्ययन प्रश्नांची उत्तरे

* स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. १

 १) ड) मानवतावादी  २) अ) प.जवाहरलाल नेहरू  ३) ड) १३ एप्रिल १९४७

 ४) अ) ताश्कंद  ५) अ) रशिया

* स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. २

 १) अ) विजया लक्ष्मी पंडीत  २) ब) पंडीत जवाहरलाल नेहरू

 ३) अ) ८ लाख डॉलर  ४) ड) पाकिस्तान

 ५) अ) माओ-त्से-तुग

* स्वयं-अध्यायनासाठी प्रश्न क्र.३

 १) अ) १९४९  २) ब) चिआंग काइ-शेक  ३) अ) कॉमनवेल्थ

 ४) ब) चाऊ एन लाई  ५) अ) १९५५

## १.६ सरावासाठी प्रश्न :

अ) दिर्घोत्तरी प्रश्न :

१. परराष्ट्र धोरण म्हणजे काय, भारताच्या परराष्ट्र धोरणाची सविस्तर चर्चा करा.
२. भारतीय परराष्ट्र धोरणातील तत्त्वे व उद्दिष्ट्ये यांचा सविस्तर आढावा घ्या.
३. भारत-रशिया परराष्ट्र धोरणाची सविस्तर चर्चा करा.
४. भारत अमेरिका परराष्ट्र धोरणाची चिकीस्तक मांडणी करा.
५. भारत-चीन राजकीय संघर्षाचे वर्णन करा.

ब) टिपा लिहा.

१. अलिप्ततावाद

२. रशियन क्रांती

३. पंचशील तत्वे

४. ताश्कंद करार

५. बांडुंग परिषद

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. देवळाणकर शैलेंद्रः ''भारतीय परराष्ट्र धोरण सातत्य आणि स्थित्यंतर'', प्रकाशक- प्रतिमा प्रकाशन, पुणे.

२. भोगले शांताराम : ''भारताचे परराष्ट्र धोरण'', प्रकाशक-विद्या प्रकाशन, नागपूर.

३. दत्त पी. व्ही.: ''बदलती दुनियामें भारत की विदेश नीती', प्रकाशक-हिंदी माध्यम कार्यान्वये विदेशालय, दिल्ली.

४. लाटे रा. ज.: ''आंतरराष्ट्रीय संबंध'', प्रकाशक पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.

५. रायपूरकर वसंत : ''आंतरराष्ट्रीय संबंध'', नागपूर प्रकाशन,

६. व्ही. बी. पाटील ''भारताचे परराष्ट्र धोरण, के. सागर पब्लिकेशन, पुणे,

७. डॉ. शैलेंद्र देवळाणकर: ''भारत आणि जग'', प्रकाशक-सकाळ पेपर्स, पुणे.

८. रायपूरकर वसंत (२००६) आंतरराष्ट्रीय संबंध. श्री. मंगेश प्रकाशन नागपूर

९. देवळाणकर शैलेंद्र (२००७) भारतीय परराष्ट्र धोरणः सातत्य आणि स्थित्यंतर. प्रतिमा प्रकाशन पुणे

१०. पाटील एम.पी. (१९९७) युध्दोत्तर अमेरिकाः टूमन ते बुश, मंगल प्रकाशन कोल्हापूर

११. घई यु. आर आणि घई के. के. (२००२) भारतीय विदेश नीति न्यू एकेडेमिक पब्लिशिंग कंपनी, जालंदर


❑❑❑

# घटक २
# दुसरा टप्पा (१९६७–१९८४)

**अनुक्रमणिका**

२.० उद्दिष्टे
२.१ प्रास्ताविक
२.२ विषय विवेचन
  २.२.१ यु.एस.एस.आर.
  २.२.२ यु.एस.ए.
  २.२.३ चीन
  २.२.४ पाकिस्तान
२.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
२.४ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे
२.५ सारांश
२.६ सरावासाठी स्वाध्याय
२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.० उद्दिष्टे :

- इंदिरा गांधी यांच्या काळातील भारताच्या परराष्ट्र धोरणाची माहिती होईल.
- भारताचे सोव्हियत युनियन आणि अमेरिका यांच्याशी असलेल्या संबंधाचे स्वरूप समजून घेता येईल.
- भारत व चीन यांचे संबंध जाणून घेता येतील.
- भारत व पाकिस्तान यांच्यातील संबंध ज्ञात होतील.
- भारताच्या परराष्ट्र धोरणात झालेल्या बदलांचे व त्यासंबंधीच्या घडामोडीचे आकलन होईल.

## २.१ प्रास्ताविक

मित्रहो, भारत स्वतंत्र झाल्यानंतर पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखालील भारताच्या परराष्ट्र धोरणाची सुरवात व त्याच्या आकारास आलेल्या स्वरूपाचा इतिहास आपण मागील घटकामध्ये अभ्यासला आहे. पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या काळातील परराष्ट्र संबंधांशी निगडीत घडामोडींचा देखील अभ्यास आपण मागील घटकामध्ये केला. जवाहरलाल नेहरू यांच्या पंतप्रधान पदाच्या संपूर्ण कार्यकाळात परराष्ट्र मंत्रालय हे स्वत: नेहरू यांनीच सांभाळले. भारताच्या परराष्ट्र धोरणाचा पाया हा

पं.जवाहरलाल नेहरू यांच्या कार्यकिर्दीत घातला गेला. कोणत्याही प्रकारचे लष्करी करार न करणे, अलिप्ततावादी धोरण, राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण धोरण, वसाहतवादविरोधी भूमिका, रंगभेदाविरुद्ध जाहीर भूमिका, निशस्त्रीकरणद्वारे जागतिक शांतता प्रस्थापित होईल अशी भूमिका इत्यादी बाबी या जवाहरलाल नेहरू यांच्या परराष्ट्र धोरणाच्या केंद्रस्थानी होत्या.

पंडित नेहरूंच्या मृत्युनंतर पंतप्रधान झालेल्या लाल बहादूर शास्त्री यांच्या कार्यकाळात अलिप्ततावादी धोरणात फारसा बदल झाला नाही. भारत-चीन युद्धानंतर भारताच्या संरक्षण सिद्धतेत वाढ आवश्यक आहे असे लाल बहादूर शास्त्री यांचे मत होते. त्यासाठी सोव्हियत युनियन सोबत संबंध वाढविण्यावर त्यांनी भर दिला. लाल बहादूर शास्त्री यांच्या कार्यकाळात १९६५ मध्ये झालेल्या भारत-पाकिस्तान युद्धात भारताला विजय मिळाला. मात्र, ताश्कंद करारादरम्यान लाल बहादूर शास्त्री यांचा मृत्यू झाला.

लाल बहादूर शास्त्री यांच्यानंतर पंतप्रधानपदी आलेल्या इंदिरा गांधी यांच्या काळात भारताच्या परराष्ट्र धोरणात मुलभूत बदल झाले. बदलती जागतिक परिस्थिती, भारताच्या शेजारील राष्ट्रांतील अंतर्गत अशांतता इत्यादींचा परिणाम भारताच्या परराष्ट्रीय संबंधावर झाला. परिणामी, इंदिरा गांधी यांचा कार्यकाळ म्हणजेच १९६७ ते १९८४ पर्यंतचा काळ हा भारताच्या परराष्ट्र संबंधांचा दुसरा टप्पा म्हणून ओळखला जातो. भारताच्या परराष्ट्र संबंधातील या दुसऱ्या टप्प्याचा अभ्यास आपण या घटकात करणार आहोत.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ युनियन ऑफ सोव्हिएत सोशालिस्ट रिपब्लिक्स (U.S.S.R.):

**पृष्ठभूमी :** भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या काळापासून भारत व सोव्हिएत युनियन यांचे अत्यंत मैत्रीपूर्ण संबंध होते. भारत स्वतंत्र झाल्यापासून भारताला पोलाद, संरक्षण, रेल्वे, बांधकाम उपकरणे, धातू आणि खाणकाम, पेट्रोकेमिकल्स इत्यादीसारख्या अनेक औद्योगिक क्षेत्रांमध्ये सोव्हिएत युनियन कडून मोठ्या प्रमाणात मदत करण्यात आली तसेच या क्षेत्रातील तंत्रज्ञानाचे हस्तांतर देखील करण्यात आले. ख्रुश्चेव यांच्या काळात सोव्हिएत युनियनचे भारतासोबतचे संबंध अत्यंत मजबूत झाले. याचा चीनशी असलेल्या सोव्हिएत युनियनच्या संबंधांवर आणि चीनसोबतच्या भारतीय संबंधांवर नकारात्मक परिणाम झाला. सन १९५९ च्या भारत-चीन सीमा विवाद आणि ऑक्टोबर १९६२ च्या चीन-भारत युद्धादरम्यान साम्यवादी सोव्हिएत युनियनने आपली तटस्थता घोषित केली, तरीही साम्यवादी चीनने रशियाच्या भूमिकेवर जोरदार आक्षेप घेतला. सोव्हिएत युनियनने सातत्याने भारताला भरीव आर्थिक आणि लष्करी मदत देऊ केली. सन १९६० पर्यंत भारताला सोव्हिएत युनियन कडून मिळणारी मदत ही चीनला सोव्हिएत युनियन कडून मिळणाऱ्या मदतीपेक्षा जास्त होती. भारत आणि रशिया यांचे मैत्री संबंध काही इतर पेचप्रसंगात देखील दिसून आले. सोव्हिएत युनियनने १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्ध सुरु असताना भारत आणि पाकिस्तान यांच्या दरम्यान शांतता प्रस्थापित करण्यासाठी पुढाकार घेतला. दोन्ही देशांनी युद्ध विराम घोषित करण्यात व शांतता बोलणीस सुरवात करण्यात सोव्हिएत युनियनने महत्त्वाची भूमिका बजावली. सोव्हिएत युनियनच्या प्रतिनिधींनी भारत आणि पाकिस्तानच्या प्रतिनिधींची भेट घेतली आणि त्यांना लष्करी संघर्ष संपवण्यासाठी

वाटाघाटी करण्यास मदत केली. १० जानेवारी १९६६ ला झालेला ताश्कंद करार घडवून आणण्यात सोव्हिएत युनियनची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती.

**ताश्कंद करारानंतर भारत व सोव्हिएत युनियन संबंध :** ताश्कंद कराराच्या नंतर भारत आणि सोव्हिएत युनियनच्या संबंधात मोठ्याप्रमाणात बदल झाले. सोव्हिएत युनियनने भारताला पूर्ण पाठींबा आणि सहाय्य देण्याच्या धोरणात महत्त्वाचा बदल केला. नव्या सोव्हिएत युनियनच्या धोरणानुसार भारताला सहाय्य करतानाच पाकिस्तान सोबतचे संबंध सुधारण्यावर भर देण्यात आला. सप्टेंबर, १९६६ मध्ये पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी मॉस्कोला भेट देऊन सोव्हिएत युनियन सोबतच्या संबंधाची पुनर्बांधणी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, सोव्हिएत युनियनने आपल्या धोरणात वरउल्लेख केल्याप्रमाणे बदल केल्यामुळे इंदिरा गांधी यांची मॉस्को भेट तितकीशी फलद्रूप झाली नाही. सन १९६७ च्या शेवटी सोव्हिएत युनियन आणि पाकिस्तान यांच्यात शस्त्रास्त्रांसंबंधी करार होण्याची शक्यता बळावली. सोव्हिएत युनियनला आवडतील असे निर्णय (उदा. पेशावर मधील अमेरिकन लष्करी तळ बंद करणे.) पाकिस्तानने घेतल्याने जुलै १९६८ मध्ये सोव्हिएत युनियनने पाकिस्तानला शस्त्रास्त्रे पुरविण्याचा निर्णय जाहीर केला. सोव्हिएत युनियनच्या या निर्णयामुळे भारतातील जनमानस क्षुब्ध झाले. मात्र, भारत सरकारने याबाबत अत्यंत संयमी भूमिका घेतली. सोव्हिएत युनियनचे पाकिस्तान संबंधी धोरण हे सोव्हिएत युनियनच्या जागतिक राजकारणातील हितसंबंधांवर आधारलेले होते. पाकिस्तानला चीन आणि अमेरिका यांच्यापासून दूर करण्याचा सोव्हिएत युनियनचा प्रयत्न होता. भारतासंबंधी सोव्हिएत युनियनचे धोरण हे मैत्रीपूर्ण आणि सहकार्य यावरच आधारलेले असून सोव्हिएत युनियनच्या पाकिस्तान धोरणामुळे त्यावर काही फरक पडणार नव्हता.

**भारत व सोव्हिएत युनियन यांच्यातील आर्थिक व व्यापारी संबंध (१९६५-७०) :** पाकिस्तानला आपल्या बाजूला वळविण्याचे धोरण जरी सोव्हिएत युनियनने अंगिकारले असले तरी देखील भारताशी आर्थिक व व्यापारी संबंधांमध्ये त्यांनी फरक पडू दिला नव्हता. ताश्कंद कराराच्या नंतरच्या काळातदेखील सोव्हिएत युनियनने भारताला रणगाडे, बॉम्बफेक करणारी विमाने, तोफा आणि रडार उपकरणे इत्यादींचा पुरवठा चालूच ठेवला. भारत आणि सोव्हिएत यांच्यातील व्यापारी उलाढाल ही सन १९६६-६७ मध्ये २२६.९ कोटी आणि सन १९६८ च्या अखेरीस ४९७ कोटी इतकी होती. सन १९६७ पर्यंत सोव्हिएत युनियनने भारताला देऊ केलेली एकूण कर्जाऊ मदत ही जवळपास १००० कोटी इतकी झाली होती. सोव्हिएत युनियनने भारताच्या दीर्घकालीन आर्थिक विकासाच्या योजनांसाठी मदत देण्याचे धोरण कायम ठेवले. त्यामुळे ताश्कंद करारानंतरच्या काळात देखील भारत-सोव्हिएत संबंध वाढतच गेले, परंतु जवाहरलाल नेहरूंच्या काळात असलेली भारत-सोव्हिएत युनियन मैत्रीतील दृढता याकाळात अस्तित्वात नव्हती. व्यापार आणि आर्थिक संबंधांच्या संदर्भात काही मतभेदाचे मुद्दे असल्यामुळे भारत-सोव्हिएत युनियन संबंधात काहीसा तणाव देखील होता.

**सन १९६९ मधील सोव्हिएत युनियनच्या धोरणातील सुधारणा :** सन १९६९ च्या दरम्यान घडलेल्या काही नव्या घडामोडींमुळे भारत आणि सोव्हिएत युनियनच्या परराष्ट्र धोरणांमध्ये काही बदल घडून आले. याबदलांमुळे १९५५-६५ दरम्यान भारत आणि सोव्हिएत युनियनच् यांच्या द्विपक्षीय संबंधांचे वैशिष्ट्य

असलेल्या मैत्री, सौहार्द आणि सहकार्याचे पुनरुज्जीवन झाले. सन १९६९ मध्ये सोव्हिएत युनियनला पाकिस्तानबद्दलच्या आपल्या नवीन धोरणाचे अपयश लक्षात आले. पाकिस्तानला आपल्याकडे आकृष्ट करण्याच्या सोव्हिएत युनियनच्या प्रयत्नांना यश आले नाही. पाकिस्तानने आपले चीन समर्थक आणि अमेरिका समर्थक मूळ धोरण कायम ठेवले. परिणामी, सोव्हिएत युनियनला भारतासोबतच्या संबंधांचे महत्त्व नव्याने कळून चुकले. सन १९६९ मध्ये सोव्हिएत युनियनने भारताला आश्वस्त केले की, दक्षिण आशिया व जागतिक पातळीवर शक्तिशाली, समृद्ध आणि अलिप्तावादी असलेला भारत आपली नैसर्गिक भूमिका पार पडत असेल तर सोव्हिएत युनियनला आनंदच वाटेल. यासाठी सोव्हिएत युनियन हे भारताला शक्य ते सर्व सहकार्य करण्यास उत्सुक आहे.

**सन १९७१ चा भारत–सोव्हिएत युनियन करार:** सन १९६९ नंतर सोव्हिएत युनियनच्या धोरणात अचानक झालेल्या बदलांना लगेच स्वीकारण्यास आरंभीच्या काळात भारत फारसा तयार नव्हता. मात्र, सन १९६९–७० दरम्यान दक्षिण आशियातील घटनाक्रमांनी भारताला सोव्हिएत युनियन सोबतच्या मैत्री, सौहार्द आणि सहकार्य आधारित संबंधांवर पुनर्विचार करण्यास बाध्य केले. भारत–सोव्हिएत मैत्रीपूर्ण सहकार्य बळकट करण्याच्या गरजेची परस्पर जाणीव झाल्यामुळे दोन्ही देशांमधील राजनैतिक संपर्क वाढले. भारत आणि सोव्हिएत युनियनमध्ये अधिक फलदायी आर्थिक आणि व्यापारी सहकार्याचा उदय झाला. पाकिस्तानमधील अंतर्गत अशांतता आणि पूर्व पाकिस्तानचा प्रश्न यांच्या परिणामस्वरूप दक्षिण आशियातील राजकीय स्थिती स्फोटक बनली होती. दक्षिण आशियातील या संकटमय परिस्थितीमुळे भारत आणि सोव्हिएत युनियनला आपल्या मैत्रीला अधिक भक्कम आधार देणे आवश्यक बनले. भारत आणि सोव्हिएत युनियनच्या परस्पर हितसंबंधांमुळे दोघांनी ९ ऑगस्ट १९७१ रोजी शांतता, मैत्री आणि सहकार्य करारावर स्वाक्षरी केल्या.

सन १९७१ च्या भारत व सोव्हिएत युनियन करारावर दोन्ही राष्ट्रांनी स्वाक्षरी केल्याने भारत–सोव्हिएत मैत्री आणि सहकार्याचे नवे पर्व सुरू झाले. दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये हा एक महत्त्वाचा टप्पा ठरला आणि याद्वारे राजकीय, सांस्कृतिक, तांत्रिक आणि वैज्ञानिक क्षेत्रात भारत–सोव्हिएत सहकार्य मजबूत करण्यासाठी कायदेशीर आणि राजकीय आधार प्रदान केला गेला. प्रस्तावना आणि १२ कलम असलेल्या या कराराने भारत आणि सोविएत युनियन यांच्यातील घनिष्ठ मैत्रीला विस्तारित व आणखी घनिष्ठ करण्याच्या दिशेने प्रयत्न करण्याची इच्छा दोन्ही देशांकडून व्यक्त करण्यात आली. या करारामध्ये आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा यांना सुनिश्चित करण्यासाठी तसेच दोन्ही राष्ट्रांतील व्यापार व तांत्रिक सहकार्याच्या विस्तारासाठी एकमेकांना सहाय्य करण्याच्या तरतुदी होत्या. भारत आणि सोव्हिएत युनियन यांच्यातील करारात पंचशील तत्त्वावर विश्वास व्यक्त करण्यात आला. याशिवाय, सोव्हिएत युनियनने भारताच्या अलिप्ततावादी धोरणाबाबत आदर व्यक्त केला. भारत आणि सोव्हिएत युनियन या दोघांनीही संयुक्त राष्ट्रांच्या सनदेच्या उद्देशांचे आणि तत्त्वांचे पालन करण्याचा निर्धार व्यक्त केला.

**सन १९७१ च्या भारत–सोव्हिएत युनियन कराराचा प्रभाव:** सन १९७१ चा भारत–सोव्हिएत युनियन यांच्यातील कराराने येणाऱ्या काळातील भारत–सोव्हिएत युनियन यांच्यातील सहकार्य आणि मैत्रीच्या परस्पर

संबंधांच्या विकासासाठी एक भक्कम पाया प्रदान केला. हा करार प्रामाणिक मैत्री, आदर, परस्पर विश्वास आणि १९५३ पासून भारत आणि सोव्हिएत युनियन यांच्यातील संबंधांच्या दरम्यान प्रस्थापित झालेल्या नात्यांचा तार्किक परिणाम होता. दोन्ही देशांमधील सहकार्य हे अधिक फलदायी व विकसित होण्याच्या शक्यता या करारामुळे वाढल्या.

भारताच्या सुरक्षेसाठी पाकिस्तान कडून असलेल्या धोक्यांना प्रतिबंधन हा या कराराचा तत्कालीन उद्देश होता. भारताविरुद्धची चीन-पाकिस्तानची संभाव्य एकजूट तपासण्यासाठीही त्याची रचना करण्यात आली होती. वॉशिंग्टन-पिंडी-बीजिंगच्या आघाडीच्या वाढत्या सहकार्यला व प्रभावाला पायबंध घालण्यासाठीचा उद्देश या कराराचा होता. अमेरिका (वॉशिंग्टन), पाकिस्तान (रावलपिंडी) आणि चीन (बीजिंग) यांची आघाडी व एकी ही भारताच्या सुरक्षेला एक मोठा धोका होती. भारत-सोव्हिएत युनियन यांच्यातील करारात संयुक्त राष्ट्र संघात भारताला समर्थन देण्याचे सोव्हिएत युनियनने आश्वासन दिले. पूर्व पाकिस्तान मध्ये अशांतता असताना आणि १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धात बांगलादेशची निर्मिती करताना या करारामुळे संयुक्त राष्ट्र संघात भारताला सोव्हिएत युनियनचे समर्थन प्राप्त झाले. डिसेंबर १९७१ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या बांगलादेश युद्धात भारताला सोव्हिएत युनियनकडून जोरदार समर्थन मिळाले. परिणामी, पाकिस्तानच्या बाजूने चीन आणि अमेरिका यांच्याकडून होणारा संभाव्य हस्तक्षेप रोखण्यात यश आले. संयुक्त राष्ट्र संघात भारताला सोव्हिएत युनियनचे पूर्णत: समर्थन मिळाले आणि सुरक्षा परिषदेत अमेरिका-चीन यांनी भारताविरोधात आखलेले डावपेच हाणून पाडणे शक्य झाले.

सन १९७१ चा भारत-सोव्हिएत युनियन यांच्यातील करारानंतरच्या काळात, भारत-सोव्हिएत युनियन यांच्यातील आर्थिक, व्यापारी आणि तांत्रिक सहकार्य देखील वेगाने विकसित झाले. १९७१-७७ या काळात भारत-सोव्हिएत संबंध अतिशय मैत्रीपूर्ण, सौहार्दपूर्ण आणि परिपक्व झाले. दोन्ही देशांचे नेते आणि अधिकाऱ्यांच्या वारंवार भेटी होऊन विचारांचे सातत्याने आदान-प्रदान झाले. या भेटींमधील चर्चेमुळे विविध क्षेत्रात भारत-सोव्हिएत युनियन यांच्यातील सहकार्य वाढवण्यासाठी अनेक महत्त्वाचे करार होणे शक्य झाले. १९७१ मध्येच, सोव्हिएत अकॅडेमी ऑफ सायन्सेस आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO) यांनी शांततापूर्ण हेतूंसाठी बाह्य अवकाशाचा शोध आणि वापरामध्ये सहकार्य वाढवण्यासाठी एक करार केला. या कराराअंतर्गत १९ एप्रिल १९७५ रोजी भारताचा पहिला कृत्रिम उपग्रह 'आर्यभट्ट' हा सोव्हिएत युनियनच्या भूमीतून अवकाशात प्रक्षेपित करण्यात आला. पुढे १९७१ मध्ये दोन्ही देशांच्या सरकारांनी आर्थिक, वैज्ञानिक आणि तांत्रिक सहकार्यासाठी भारत-सोव्हिएत युनियन संयुक्त आयोग स्थापन करण्याचे मान्य केले. २ ऑक्टोबर १९७२ चा दुसरा करारान्वये भारत आणि सोव्हिएत युनियनने दोन्ही देशांमधील वैज्ञानिक आणि तांत्रिक सहकार्य आणखी वाढवण्याचे मान्य केले. सन १९७४ च्या शांतीपूर्ण उद्देशांसाठी केलेल्या आण्विक चाचणीचा निषेध करण्यास सोव्हिएत युनियनने नकार दिला. अण्वस्त्र प्रसारबंदी करारावर [Non-Proliferation Treaty (NPT)] स्वाक्षरी करण्यास भारताने नकार दिला याचा देखील सोव्हिएत युनियनने निषेध केला नाही. सोव्हिएत युनियनच्या या भूमिकेला भारताकडून पूर्ण दाद मिळाली.

**लियोनिद ब्रेझनेव्ह यांची भारत भेट (१९७३):** नोव्हेंबर १९७३ मध्ये, सोव्हिएत युनियनचे सर्वोच्च नेते लियोनिद ब्रेझनेव्ह यांनी भारताला भेट दिली. भारतामध्ये त्यांचे अत्यंत जोरदार व अतिशय प्रेमळ स्वागत करण्यात आले. ब्रेझनेव्ह यांच्या दौऱ्यात दोन्ही देशांमध्ये तीन महत्त्वपूर्ण करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. पंधरा वर्षांच्या आर्थिक आणि व्यापार कराराद्वारे, सोव्हिएत युनियनने भारताच्या प्राथमिक गरजा आणि योजनांसाठी अधिक मदत देण्याचे मान्य केले. उद्योग आणि कृषी क्षेत्रात भारत-सोव्हिएत युनियन सहकार्य वाढविण्यावर सहमती झाली. बोकारो पोलाद प्रकल्प आणि भिलाई पोलाद प्रकल्पामधून पोलादाचे उत्पादन वाढवण्यासाठी सोव्हिएत युनियनने भारताला कर्ज देण्याचे मान्य केले. मथुरा ऑइल रिफायनरी आणि कलकत्ता ट्यूब रेल्वेच्या स्थापनेसाठी देखील कर्ज देण्याचे सोव्हिएत युनियनने कबूल केले. दुसरा करार भारताच्या नियोजन आयोग आणि सोव्हिएत नियोजन परिषद यांच्यातील सहकार्य करण्यासाठी उपयुक्त ठरला. दोन्ही देशांनी इतर देशांमध्ये, विशेषतः आफ्रिकन आणि आशियाई देशांमध्ये संयुक्त औद्योगिक प्रकल्पांच्या स्थापनेसाठी परस्परांना सहकार्य करावे, यावर एकमत झाले. तिसरा करार हा कॉन्सुलर कन्व्हेन्शन होता, ज्याच्या अंतर्गत भारताने सोव्हिएत नागरिकांना परस्पर आधारावर विशेष वागणूक देण्याचे मान्य केले. डिसेंबर १९७६ मध्ये, सोव्हिएत युनियनने भारताला चार वर्षांच्या कालावधीत ५५ लाख टन कच्च्या तेलाचा पुरवठा रुपयांमध्ये दिलेल्या रक्कमेच्या बदल्यात करण्याचे मान्य केले. ओपेक The Organization of the Petroleum Exporting Countries (OPEC) देशांनी मोठी दरवाढ जाहीर केली असताना भारताला हा मोठा दिलासा मिळाला होता.

सन १९६५-७७ या काळात भारत-सोव्हिएत संबंध विकसित होत गेले आणि ते अधिकाधिक मैत्रीपूर्ण आणि परस्पर सहकार्यावर आधारित होत गेले. पाकिस्तानबद्दलच्या बदललेल्या सोव्हिएत धोरणाचा परिणाम म्हणून आलेल्या सुरुवातीच्या आघाताने भारत-सोव्हिएत युनियन मैत्री आणि सहकार्य वाढवण्यासाठी काम करण्याच्या नवीन आणि अधिक दृढ इच्छांना बळ दिले. सन १९७१ मध्ये परस्पर मैत्री आणि सहकार्याचा सर्वोच्च बिंदू गाठला गेला, जेव्हा ऑगस्टमध्ये भारत-सोव्हिएत शांतता, मैत्री आणि सहकार्य करारावर स्वाक्षरी झाली. या कराराने भारत-सोव्हिएत युनियन संबंधांचा अत्यंत सौहार्दपूर्ण आणि परस्पर सहाय्यकारी संबंधांच्या नव्या युगात प्रवेश झाला. १९७१ नंतरच्या काळात विविध क्षेत्रात या सहकार्याचा झपाट्याने विकास झाला. भारत-सोव्हिएत व्यापार आणि सांस्कृतिक संबंध अत्यंत विकसित आणि विस्तृत झाले. भारतात घोषित झालेल्या आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधींच्या सरकारच्या धोरणांना सोव्हिएत समर्थनामुळे द्विपक्षीय संबंधांच्या विविध क्षेत्रात आणि अनेक आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर भारत आणि सोव्हिएत युनियन खूप जवळ आले.

**जनता-लोकदल सरकारच्या काळातील संबंध:** मार्च १९७७ च्या निवडणुकीत इंदिरा गांधी यांच्या काँग्रेसच्या विरोधातील जनता पक्षाला विजय मिळाला. परिणामी भारतीय राजकारणात व परराष्ट्र धोरणात मोठा बदल घडून आला. भारत-सोव्हिएत युनियन संबंधांच्या संदर्भात हा बदल सोव्हिएत युनियनशी भारताचे मैत्रीपूर्ण संबंध उतरणीस लागण्याची शंका भारत आणि सोव्हिएत युनियनच्या जाणकारांना होती. जनता पक्षाचे नेतृत्व करणारी मंडळी ही अमेरिकेशी मैत्री करण्याच्या विचारांची तसेच उजव्या विचारसरणीकडे

झुकलेले होते. पाश्चिमात्य आणि भारतीय वृत्तपत्रांनी तर भारतीय परराष्ट्र धोरणात लक्षणीय बदल होण्याची शक्यता वर्तवली होती. 'सोव्हिएत समर्थक संबंध' किंवा 'सोव्हिएत तत्त्वाशी असलेले विशेष संबंध' हे अमेरिकेशी अधिक संतुलित आणि अधिक मैत्रीपूर्ण वृत्तीच्या संबंधांसाठी सोडून दिले जातील असा सार्वत्रिक अंदाज होता.

जनता पक्ष सरकार मधील नेत्यांनी निवडणुकीपूर्वी केलेल्या विधानांमुळे जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आल्यानंतर सोव्हिएत युनियन व भारत यांच्या संबंधात बदल होईल अशी शक्यता निर्माण झाली होती. मात्र, आधी सोव्हिएत युनियनने व नंतर भारताने पुढे होऊन केलेल्या प्रयत्नामुळे हे भारत-सोव्हिएत युनियन संबंधांमध्ये सातत्य राहिले. आंतरराष्ट्रीय परिस्थिती आणि भारत-सोव्हिएत युनियन सहकार्याचे स्वरूप पाहिल्यानंतर नवी दिल्ली आणि मॉस्को यांच्यात अनेक समान हितसंबध असल्याचे जनता पक्ष सरकारच्या लक्षात आले. पाकिस्तान-चीन आणि चीन-अमेरिका यांच्यातील वाढते संबंध, बांगलादेशशी चीनचे वाढते संबंध, चीनची वाढती अणुशक्ती, शस्त्रे आणि लष्करी संसाधने याबाबतीत सोव्हिएत युनियनवर भारताचे अवलंबित्व, पाकिस्तानला अमेरिकेकडून होणारा शस्त्रास्त्रांचा पुरवठा आणि भारत-सोव्हिएत युनियन आर्थिक, व्यापारिक, वैज्ञानिक आणि तांत्रिक सहकार्याच्या विकसित स्वरूपामुळे जनता पक्ष सरकारला देखील सोव्हिएत युनियनशी घनिष्ठ संबंधांची आवश्यकता स्पष्टपणे लक्षात आली. जनता पक्ष सरकारला झालेल्या या जाणिवेमुळे जनता पक्ष सरकारमधील पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी मॉस्कोला भेट देण्यासाठी सोव्हिएत युनियनचे निमंत्रण स्वीकारले. ऑक्टोबर १९७७ मध्ये त्यांनी मॉस्कोला भेट दिली आणि सोव्हिएत युनियनने त्यांचे जोरदार स्वागत केले. सोव्हिएत युनियनचे सर्वोच्च नेते लियोनिद ब्रेझनेव्ह हे स्वत: भारताचे पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या स्वागतासाठी विमानतळावर आले होते. मोरारजी देसाई यांनीही 'सर्व देशांशी समतोल संबंध' हा त्यांचा निवडणूकपूर्व काळातील दृष्टिकोन बाजूला ठेवून सोव्हिएत युनियनशी मैत्री संदर्भात आपली भूमिका जाहीरपणे व्यक्त केली. भारत-सोव्हिएत युनियन संबंध हे नेतृत्वातील व्यक्तींवर किंवा विशिष्ट विचारसरणीवर आधारित नसून समानता, राष्ट्रीय हित आणि समान हितसंबंधांवर आधारित आहेत. तत्कालीन परराष्ट्र मंत्री वाजपेयी यांनीही 'महत्त्वाच्या हिताच्या बाबींवर सोव्हिएत युनियनने भारताला दिलेल्या सातत्यपूर्ण आणि तत्त्वनिष्ठ पाठिंब्याची' अशी सोव्हिएत युनियनची प्रशंसा देखील केली. पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या मॉस्को दौऱ्याच्या समारोपाच्या वेळी जारी करण्यात आलेल्या संयुक्त जाहीरनाम्यात भारत आणि सोव्हिएत युनियन हे त्यांच्या परस्पर सहकार्य आणि मैत्रीची प्रगती कायम ठेवतील असे सूचित करण्यात आले. शिवाय, दोन्ही देशांदरम्यान अनेक समान उद्दिष्टे आहेत ज्यामुळे परस्परसंबंध आणि सहकार्य पुढे चालू ठेवणे आणि विकसित करणे दोन्ही देशांना अत्यावश्यक होते. अशारितीने, १९७७ च्या अखेरीस भारत आणि सोव्हिएत युनियन हे दोघेही जागतिक परिस्थितीच्या वास्तविकतेच्या आधारावर त्यांचे परस्पर संबंध सामान्य करणे आणि त्यात सुधारणा करण्याबाबत सकारात्मक होते. भारत-सोव्हिएत युनियन यांचे संबंध हे राजकीय गरजेवर आणि परस्पर हितसंबंधांवर आधारित आहेत हे जनता पक्ष सरकारच्या लगेचच लक्षात आले. सोव्हिएत युनियनच्या सरकारने वैचारिक भिन्नता असतानादेखील जनता पक्ष सरकारशी जुळवून घेतले. तारापूर अणु प्रकल्पासाठी शुद्ध युरेनियमचा पुरवठा आणि अण्वस्त्र प्रसारबंदी करार Non-

Proliferation Treaty (NPT) संदर्भात भारत आणि अमेरिका यांच्यात असलेल्या तीव्र मतभेदांच्या पृष्ठभूमीवर जनता पक्ष सरकारला सोव्हिएत युनियन सोबतच्या सहकार्याचे महत्त्व जाणवले. जनता पक्ष सरकारला चीन सोबतचे संबंध सुधारण्यात अपयश आल्याने त्यांना सोव्हिएत युनियन सोबतचे संबंध विकसित करणे भाग पडले. सतत सुरू असलेले चीन-सोव्हिएत युनियन मधील मतभेद आणि आशियाच्या सत्ता संतुलानामध्ये वाढते वॉशिंग्टन-बीजिंग-पिंडी-टोकियो संबंधयामुळे भिन्न विचारांचे सरकार जरी भारतात सत्तेवर असले तरी सोव्हिएत युनियनला भारताशी मैत्रीपूर्ण संबंध मजबूत करणे गरजेचे वाटत होते. व्हिएतनाम, कंबोडिया-कंपुचिया येथील बिघडलेल्या परिस्थितीत सोव्हिएत युनियनला भारताचे समर्थन आवश्यक वाटत होते. परिणामी, भारत-सोव्हिएत युनियन यांचे संबंध १९७७-७९ मध्ये सतत विकसित होत राहिले आणि त्यांमध्ये कोणताही मुलभूत स्वरूपाचा बदल घडून आला नाही. भारत आणि सोव्हिएत युनियन मध्ये आर्थिक आणि व्यापारिक सहकार्य हे उन्नत होत गेले व संपर्काचे सातत्य कायम राहिले.

**सन १९८०-८४ दरम्यान भारत-सोव्हिएत युनियन संबंध:** सन १९७९ च्या अखेरीस, भारत आणि सोव्हिएत युनियनमध्ये कंपुचिया समस्या आणि अफगाणिस्तानमध्ये सोव्हिएत युनियनचा लष्करी हस्तक्षेप याबाबत स्पष्ट स्वरूपाचे मतभेद निर्माण झाले. सोव्हिएत युनियन सरकारला भारताने कंपुचियामधील नवीन राजवटीला मान्यता द्यावी असे वाटत असताना भारताने तशी भूमिका घेण्याचे टाळले. कंपुचियामध्ये शिरलेल्या सर्व व्हिएतनामी सैन्याच्या माघारीनंतरच कंपुचियाला मान्यता देण्याच्या प्रश्नावर विचार करता येईल, अशी भूमिका भारताने घेतली. कंपुचियाबाबत व्हिएतनामचे समर्थन करण्याची सोव्हिएत युनियनच्या भुमिकेप्रमाणे भूमिका स्वीकारण्यास जनता पक्ष सरकार तयार नव्हते. कंपुचियामधील बाहेरील हस्तक्षेपाला भारताने विरोध दर्शवला. शिवाय, २४ डिसेंबर १९७९ रोजी जेव्हा सोव्हिएत युनियनने अफगाणिस्तानमध्ये हस्तक्षेप केला तेव्हा संयुक्त राष्ट्रातील भारतीय राजदूताने सोव्हिएतच्या कारवाईचा निषेध केला. जानेवारी १९८० मध्ये, भारत-सोव्हिएत युनियन संबंध तणावाकडे जात असल्याचे निदर्शनास येत होते.

जानेवारी १९८० च्या लोकसभा निवडणुकीत, इंदिरा गांधीं यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाचे सरकार भारतात जोरदार बहुमताने सत्तेत परत आले. भारतातील या सत्ता बदलांमुळे पुन्हा भारत-सोव्हियत युनियन सौहार्दपूर्ण मैत्री आणि घनिष्ठ सहकार्य हे १९७७ पूर्वीप्रमाणे होईल असा विश्वास सोव्हिएत युनियनला होता. इंदिरा गांधी सरकारच्या निर्देशानुसार संयुक्त राष्ट्र संघातील भारतीय राजदूताने अफगाणिस्तान संकटावर भारताच्या भूमिकेत सुधारणा केली तेव्हा सोव्हिएत युनियनचा विश्वास सार्थ ठरला. भारताने अफगाणिस्तानातील गंभीर परिस्थितीवर चिंता व्यक्त करताना गेल्या काही वर्षांमध्ये इतर राष्ट्रांनी-शक्तींनी अफगाणिस्तानच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करून अस्थैर्य माजविण्याच्या केलेल्या प्रयत्नाकडे भारताने लक्ष वेधले. भारताच्या अफगाणिस्तान भूमिकेतील हा बदल सोव्हिएत युनियनला अनुकूल होता.

सन १९८० पासून भारत आणि सोव्हिएत युनियन या दोन्ही राष्ट्रांनी परस्पर सहकार्य मजबूत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरु ठेवले होते. जून १९८० मध्ये भारताचे तत्कालीन परराष्ट्र मंत्री पी. व्ही. नरसिंह राव यांनी सोव्हिएत युनियनला भेट देऊन सोव्हिएत युनियनच्या नेत्यांशी महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा केली. सोव्हिएत युनियनचे सर्वोच्च नेते लियोनिद ब्रेझनेव्ह यांच्या निमंत्रणावरून भारताचे राष्ट्रपती नीलम

संजीव रेड्डी यांनी सप्टेंबर-ऑक्टोबर १९८० मध्ये सोव्हिएत युनियनला अधिकृतपणे भेट दिली. सदर भेटीदरम्यान भारत-सोव्हिएत संबंधांचा आढावा घेण्यात आला आणि दोन्ही राष्ट्रांनी स्वीकारलेल्या सहकार्याच्या मार्गांवर पूर्ण समाधान व्यक्त करण्यात आले. दोन्ही राष्ट्रे ही वेगवेगळ्या क्षेत्रात द्विपक्षीय सहकार्य विकसित करत होते. सोव्हिएत युनियन आणि भारताची ही दीर्घकालीन घनिष्ठ मैत्री ही शांततापूर्ण सहअस्तित्वाचे मूल्य आणि प्रमुख आंतरराष्ट्रीय समस्यांवर दोन्ही देशांच्या समान भूमिका या आधारवर निर्माण झाली असल्याचे स्पष्ट करून या मित्रत्वाचे दोन्ही देशांनी कौतुक केले.

डिसेंबर १९८० मध्ये, सोव्हिएत युनियनचे सर्वोच्च नेते लियोनिद ब्रेझनेव्ह यांनी भारताला भेट दिली. आपल्या भेटीदरम्यान ब्रेझनेव्ह यांनी पुन्हा एकदा भारत-सोव्हिएत सहकार्य वेगाने विकसित होत असल्याबद्दल समाधान व्यक्त करत प्रशंसा केली. आपल्या भारत भेटीदरम्यान ब्रेझनेव्ह यांनी निरीक्षण व्यक्त केले की, आज सोव्हिएत युनियन आणि भारत यांच्यातील मैत्रीचे संबंध विकसित करताना, दोन्ही देश केवळ स्वत:च्या राष्ट्रांतील लोकांच्या सध्याच्या पिढीसाठीच नाही तर येणाऱ्या पिढ्यांसाठी आणि संपूर्ण मानवजातीच्या शांततामय भविष्यासाठी ही एक उत्तम गोष्ट करत आहेत. दोन्ही देशांमधील मैत्री मजबूत करण्यासोबतच या भेटीमुळे काही महत्त्वाचे द्विपक्षीय करारही झाले उदा. १९८१-८५ या वर्षांसाठीचा व्यापार करार, १९८१ आणि १९८२ या वर्षांसाठी सांस्कृतिक, वैज्ञानिक आणि शैक्षणिक देवाणघेवाणीचा करार इत्यादी. हे करार अफगाणिस्तानच्या मुद्द्यावर भारत-सोव्हिएत मतभेद अस्तित्वात असल्याच्या वास्तवाशी सुसंगता राखून करण्यात आले होते. भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी सोव्हिएत युनियनचे सर्वोच्च नेते लियोनिद ब्रेझनेव्ह यांना स्पष्ट केले की, भारताला अफगाणिस्तान समस्या लवकरात लवकर सोडवली जावी असे वाटते आणि याच अर्थ सोव्हिएत युनियनने अफगाणिस्तानमधून आपले सैन्य माघारी घ्यावे असा आहे.

ऑगस्ट १९८१ मध्ये भारत आणि सोव्हिएत युनियन यांनी भारत आणि सोव्हिएत युनियन यांच्यातील शांतता, मैत्री आणि सहकार्य कराराला (१९७१) दहा वर्ष पूर्ण झाल्याबद्दल आनंद साजरा केला. दोन्ही राष्ट्रांनी या प्रसंगाचा उपयोग भारत-सोव्हिएत युनियन मैत्री आणि सहकार्याच्या महत्त्वाला आधोरेखीत केले. दोन्ही देशांमध्ये अधिकाधिक आर्थिक आणि व्यापारी सहकार्य प्रस्थपित करण्यासाठी तसेच आंतरराष्ट्रीय शांतता आणि मैत्री कायम राखण्यासाठी प्रयत्न करण्याचा संकल्प केला. यावेळी बोलताना श्रीमती इंदिरा गांधी यांनी निरीक्षण नोंदवले की, 'आमच्या दोन देशांमधील शांतता, मैत्री आणि सहकार्याचा करार हा शांतता आणि प्रगतीसाठी जगातील लोकांच्या संघर्षात सकारात्मक योगदान देण्याच्या आमच्या समान आकांक्षांचे प्रतीक आहे.... आम्ही आमच्या दोन्ही देशांमधील दृढ आणि पारंपारिक मैत्रीला खूप महत्त्व देतो आणि त्याच्या पुढील विकासासाठी प्रयत्न करतो.' त्याचप्रमाणे लियोनिद ब्रेझनेव्ह यांनी ही असे मत मांडले की, ''सोव्हिएत युनियन-भारत सहकार्याची इमारत ही शांतता, मैत्री आणि सहकार्य कराराच्या भक्कम पायावर उभी आहे. आता जवळपास एक दशकापासून हा करार दोन्ही देशातील जनतेसाठी उपयुक्त ठरत आहे. या बलाढ्य वृक्षाचे खोड आणि फांद्या वाढतच आहेत. त्यामुळे, नवीन करार, नवीन संबंध, देवाणघेवाण आणि परस्परसंवाद सतत वाढत आहे. चिरस्थायी शांतता आणि समतेवर अधारीत संबंधांसाठी संघर्षात सहकार्य करण्यास देखील मदत करते.''

सन १९८१ पर्यंत, भारत-सोव्हिएत युनियन चे आर्थिक आणि व्यापारी सहकार्य खूप लक्षणीय प्रमाणात विकसित झाले होते. भारताला सोव्हिएत युनियन कडून दीर्घकालीन कर्जे १८१४.४ कोटी आणि व्यावसायिक कर्ज रु. ६५० कोटी (फक्त २.५% व्याजदरासह) मिळाले होते. भारतातील ७० हून अधिक औद्योगिक आणि इतर प्रकल्पांना सोव्हिएत युनियनचे सहकार्य मिळत होते आणि अनेक सोव्हिएत युनियन अनुदानित पोलाद प्रकल्पांतून ४०% आणि वीज प्रकल्पांतून १५% पेक्षा जास्त उत्पादन येणे सुरू केले होते. सन १९८१ मध्ये, सोव्हिएत अनुदानित प्रकल्पांमध्ये पोलाद आणि तेल उत्पादन अनुक्रमे ४० आणि ७० दशलक्ष टनांवर पोहोचले. १९८०-८१ मध्ये सोव्हिएत युनियनला भारतातून रु. ११५७.३ कोटी इतकी निर्यात झाली आणि रु. ९५५.२ कोटी इतकी आयात भारतात करण्यात आली. यावरून, १९८१-८२ मध्ये व्यापार आणि औद्योगिक क्षेत्रात भारत-सोव्हिएत युनियन सहकार्याने उत्तम प्रगती केली असल्याचे स्पष्ट होते. एप्रिल १९८२ मध्ये, भारत आणि सोव्हिएत युनियनने दोन्ही देशांमधील राजनैतिक संबंधांच्या स्थापनेचा ३५ वा वर्धापन दिन साजरा केला. भारत-सोव्हिएत युनियन मैत्री आणि सहकार्याचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी या प्रसंगाचा उपयोग करण्यात आला. दोन्ही देशाच्या शीर्ष नेतृत्वाने भारत - सोव्हिएत युनियन मैत्रीचे महत्त्व या निमित्ताने अधोरेखीत केले.

सप्टेंबर १९८२ मध्ये, पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी सोव्हिएत युनियनच्या दौऱ्यामध्ये मॉस्कोला भेट देऊन भारत आणि सोव्हिएत युनियन संबंधांना आणखी मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले. इंदिरा गांधी यांचा हा दौरा समकालीन जगातील सर्वात घट्ट मैत्री व सहकार्य वाढविण्याच्या दृष्टीकोनातून महत्त्वाचे पाऊल मानला गेला. सोव्हिएत युनियन आणि भारत यांच्यात मतभेदाचे काही मुद्दे जागतिक राजकारणामुळे निर्माण झाले असले तरी दोन्ही देश एकमेकांची त्या मुद्द्यांवरील दृष्टीकोन समजून घेतात हे स्पष्ट झाले.

सन १९८३ मध्ये सोव्हिएत युनियनचे सर्वोच्च नेते लियोनिद ब्रेझनेव्ह यांचा मृत्यू झाला. सोव्हिएत युनियनने भारताला आश्वस्त केले की, ब्रेझनेव्ह यांच्या पश्चातदेखील भारतासोबतचे सोव्हिएत युनियनचे संबंध पूर्वीसारखेच घनिष्ठ राहतील. सन १९८४ मध्ये पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर राजीव गांधी हे भारताचे पंतप्रधान झाले. सोव्हिएत युनियनमध्ये ब्रेझनेव्ह यांच्या मृत्युनंतर मिखाईल गोर्बोचेव्ह हे सत्तेवर आले. राजीव गांधी आणि मिखाईल गोर्बोचेव्ह या दोघांनी भारत आणि सोव्हिएत युनियन यांची दीर्घकालीन घनिष्ठ मैत्री आणि सर्वंकष सहकार्य वृद्धिंगत होण्याच्या दृष्टीने पुढील काळात प्रयत्न केले.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १**

१. ताश्कंद करार घडवून आणण्यात ............ ची भूमिका महत्त्वाची होती.

अ) अमेरिका ब) रशिया क) चीन ड) इंग्लंड

२. भारताचा पहिला कृत्रिम उपग्रह ............ हा सोव्हिएत युनियनमधून अवकाशात प्रक्षेपित करण्यात आला.

अ) आर्यभट्ट ब) कुमारभट्ट क) आर्ययान ड) कुमारयान

३. ऑक्टोबर १९७७ मध्ये ............ यांनी सोव्हिएत युनियनला भेट दिली.

अ) इंदिरा गांधी ब) अटलबिहारी वाजपेयी

क) मोरारजी देसाई ड) राजीव गांधी

४. जोड्या जुळवून योग्य पर्याय निवडा.

| गट १ | गट २ |
|---|---|
| १. भारत- सोव्हिएत युनियन सहकार्य करार | अ. १९७३ |
| २. ताश्कंद करार | ब. १९७१ |
| ३. लियोनिद ब्रेझनेव्ह यांची पहिला भारत दौरा | क. १९६६ |
| ४. राष्ट्रपती नीलम संजीव रेड्डी यांचा सोव्हिएत युनियन दौरा | ड. १९८० |

अ) १-ड, २-अ, ३-ब, ४- क ब) १-क, २-ब, ३-ड, ४- अ

क) १-ब, २- क, ३-अ, ४-ड ड) १-अ, २-ड, ३-क, ४- ब

५. खालील विधानांच्या संदर्भात योग्य पर्याय निवडा.

विधान १ - भारत-सोव्हिएत युनियन मैत्रीमुळे अमेरिकेच्या भारतविरोधी हस्तक्षेपाला मर्यादा आल्या.

विधान २ - सोव्हियत युनियनशी भारताची मैत्री ही कामचलाऊ स्वरुपाची होती.

अ) विधान १ हे सत्य / योग्य आणि विधान २ हे असत्य / अयोग्य

ब) विधान २ हे सत्य / योग्य आणि विधान १ हे असत्य / अयोग्य

क) दोन्ही विधाने सत्य / योग्य

ड) दोन्ही विधाने असत्य / अयोग्य

### २.२.२ युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका (U.S.A.)

**पृष्ठभूमी :** पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या काळात भारत आणि यु.एस.ए. यांच्यातील परस्पर संबंध निर्माण होण्याची प्रक्रिया झाल्याचे दिसते. भारताच्या अलिप्ततावादी धोरणामुळे अमेरिका व भारत यांच्यातील संबंधात याकाळात तणाव होता. पण, याच काळात भारतावरील चीनच्या आक्रमणामुळे राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांच्या नेतृत्वाखालील यु.एस.ए.शी भारताचे संबंध सुधारल्याचे दिसून येते.

लाल बहादूर शास्त्री पंतप्रधान झाले तेव्हा भारत-अमेरिका संबंध हे संथ गतीने पण निश्चितपणे प्रगती करत होते. राष्ट्राध्यक्ष जॉन्सन हे राष्ट्राध्यक्ष केनेडींनी सुरू केलेल्या भारताप्रती उदार धोरण कायम ठेऊन होते. भारताच्या तारापूर अणुऊर्जा केंद्राबाबत डिसेंबर १९६३ चा करार आणि अमेरिकेने भारताला देऊ केलेली अन्नधान्यांची मदत यामुळे भारत-अमेरिका संबंधांच्या वाढीसाठी चांगले वातावरण तयार झाले होते.

तथापि, भारत–अमेरिका संबंधांना १९६५ मध्ये दोन मोठे धक्के बसले. पहिला धक्का म्हणजे, १९६५ च्या आरंभी, अमेरिका ही आशियातील राष्ट्र असलेल्या व्हिएतनाममध्ये सुरु असलेल्या गृहयुद्धात मोठ्या प्रमाणावर सहभागी झाली. कम्युनिस्ट विचारांचे उत्तर व्हिएतनाम विरुद्ध पाश्चात्य भांडवलशाही विचारांचे दक्षिण व्हिएतनाम यांच्यात सन १९५४ ते १९७५ याकाळात झालेल्या संघर्षाला 'व्हिएतनाम युद्ध' म्हणून ओळखले जाते. अमेरिकेने दक्षिण व्हिएतनामच्या बाजूने युद्धात भाग घेतला. अमेरिकेने उत्तर व्हिएतनामवर विविध ठिकाणी बॉम्ब हल्ले चढविले. १९६५ च्या आरंभी अशा प्रकारे बॉम्बहल्ले सुरु करण्याचे आदेश देऊन व्हिएतनाम युद्धाची व्याप्ती वाढविण्याच्या अमेरिकेच्या धोरणाला भारताने कडाडून विरोध केला आणि त्यावर तीव्र टीका केली. परिणामी, भारत व अमेरिका यांच्यातील मतभेद खूप तीव्र झाले. १६ एप्रिल १९६५ मध्ये भारत आणि अमेरिका यांच्या संबंधाने अगदी तळाची पातळी गाठली. कारण, मे १९६५ मध्ये भारताचे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री हे अमेरिकेच्या नियोजित दौऱ्यावर जाणार होते. या दौऱ्यात त्यांना भेटण्यास अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन्सन यांनी असमर्थता दर्शवली. अमेरिकेच्या या निर्णयामुळे भारताचा अपमान झाल्याचे मानले गेले. भारतामध्ये अमेरीकाविरुद्ध जनभावना वाढीस लागली.

भारत व अमेरिका संबंधाला दुसरा धक्का हा १९६५ च्या भारत–पाकिस्तान युद्धामुळे बसला. ऑगस्ट १९६५ मध्ये पाकिस्तानने भारतावर हल्ला केला तेव्हा अमेरिकेची भूमिका ही भारतासाठी प्रतिकूल असल्याचे आढळून आले. पाकिस्तानने या युद्धात अमेरिकेने पुरवलेले पॅटन रणगाडे आणि इतर शस्त्रसामग्री भारताविरोधात वापरली. अमेरिकेने याचा विरोध ही केला नाही आणि पाकिस्तानवर टीका देखील केली नाही. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आयसेनहॉवर यांनी नेहरूंना दिलेले वचन पाळण्यात अमेरिकेला अपयश आले. अमेरिकेने दिलेली शस्त्रास्त्रे पाकिस्तानला भारताविरोधात वापरू देण्यात येणार नाही असे वचन राष्ट्राध्यक्ष आयसेनहॉवर यांनी भारताला दिले होते. मात्र, लाल बहादूर शास्त्रींच्या काळातील अमेरिकेचे पाकिस्तान समर्थक धोरण हे भारत–अमेरिका संबंधांच्या मार्गात मोठी अडचण आणणारे व दुरावा निर्माण करणारे ठरले. अमेरिकाविरोधी धोरण असलेल्या चीनशी पाकिस्तानची मैत्री वाढत असतानाही, अमेरिकेच्या पाकिस्तान समर्थक धोरणात सुधारणा झाली नाही. काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे अशी भारताची भूमिका असताना अमेरिकेने संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत काश्मीर प्रश्नावरील चर्चेत राजकीय तोडगा काढण्याचा आग्रह धरला. अमेरिकेची काश्मीर बाबतची भूमिका ही भारताच्या भूमिकेच्या विरोधात जाणारी होती. परिणामी, अल्पावधीतच झालेल्या या दोन धक्क्यांमुळे भारत–अमेरिका संबंध पुन्हा ताणले गेले. दरम्यानच्या काळात ताश्कंद करारात सोव्हिएत युनियनने भारत व पाकिस्तान यांच्यात मध्यस्ती करून दक्षिण आशियातील आपला प्रभाव वाढविला. सोव्हिएत युनियनच्या वाढत्या प्रभावाला प्रतिक्रिया म्हणून अमेरिकेने भारताला अन्न धान्य व्यतिरिक्त इतर सर्व प्रकारची मदत करणे थांबविले. परिणामी, भारत–अमेरिका यांच्यातील संबंध थंडावले.

**इंदिरा गांधी यांची पहिली कारकिर्द (१९६६–७७):** जानेवारी १९६६ मध्ये इदिरा गांधी या पहिल्यांदा पंतप्रधान झाल्या त्यावेळी लिंडन बी. जॉन्सन हे युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकाचे राष्ट्राध्यक्ष होते. जॉन्सन यांनी इंदिरा गांधींचे अभिनंदन केले आणि त्यांना अमेरिकेच्या मदतीचे आश्वासन दिले. जॉन्सन यांच्या

आमंत्रणावरून २८ मार्च १९६६ मध्ये इंदिरा गांधी अमेरिकेला गेल्या. दरम्यानच्या काळात भारत हा गंभीर अन्नधान्य टंचाईला सामोरे जात होता. भारताला अमेरिकेकडून अन्नधान्याची मदत आवश्यक होती. मात्र, इंदिरा गांधीची अमेरिका भेट म्हणावी तितकी यशस्वी झाली नाही. भारतातील व अमेरिकेतील उच्च शिक्षण क्षेत्रासाठी इंडो-यु.एस.एज्युकेशन फौंडेशनच्या योजना निश्चित करण्यात आल्या. मात्र, भारतात याला होणाऱ्या तीव्र विरोधामुळे या योजना बारगळल्या. सन १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धाच्या वेळी अमेरिकेने भारताविरोधात व पाकिस्तान समर्थक भूमिका घेतली होती. या युद्धामुळे अमेरिकेने भारताला देण्यात येणारी मदत थांबवली होती. इंदिरा गांधींच्या अमेरिका दौऱ्यामुळे भारताला अमेरिकेकडून अन्नधान्य व विकास कामांसाठी मदत मिळवता आली. जॉन्सन यांनी भारताला तीस लाख टन अन्नधान्य व ९० लाख डॉलर्सची मदत करण्याचे आश्वासन दिले. अमेरिकेच्या मदतीच्या बदल्यात अमेरिकाधार्जिणे अथवा अमेरिकेला हवे असणारे धोरण भारताने राबवावे अशी जॉन्सन यांची इच्छा होती. भारताने आपल्या रुपयाचे अवमूल्यन करावे असे अमेरिकेला अपेक्षित होते. अन्नधान्यांच्या मदतीच्या माध्यमातून अमेरिकेला आवडतील अशी धोरणे लादण्याच्या नीतीचा इंदिरा गांधी यांनी विरोध केला.

१९६० च्या दशकात व्हिएतनाम युद्ध व मध्य पूर्व आशिया मधील युद्धांच्या संदर्भातील भूमिकेबाबत भारत व अमेरिका यांच्यात तीव्र मतभेद असल्याने भारत-अमेरिका यांच्या परस्पर संबंध सुधारण्यात अडथळे येत होते. १९७० च्या दशकाच्या उत्तरार्धात अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात झालेले बदल हे भारत-अमेरिका संबंधांच्या बाबतीत अत्यंत निराशाजनक राहिले. याकाळात अमेरिका असमाधानी व संतप्त असण्यामागे पुढील कारणे होती.

(१) दक्षिण आशिया व एकूणच आशिया खंडामध्ये सोव्हिएत युनियनचे वाढते महत्त्व

(२) पाकिस्तानचे चीनशी घनिष्ठ होत जाणारे संबंध

(३) भारताला मदत करण्याबाबत अमेरिकेची उदासीनता

याकाळात अमेरिकेने इतर देशांशी संबंध सुधारून नव्या स्वरूपात शक्ती संतुलन राखण्याच्या दृष्टीने विचार सुरु केला. सोव्हिएत युनियनचा प्रभाव रोखण्यासाठी आपल्या बाजूने येतील अशा देशांना मोठ्या प्रमाणात मदत देण्याचा धोरणात बदल अमेरिकेने केला. परिणामी, भारताला अमेरिकेपासून मिळणारी मदतीचे प्रमाण कमी झाले. अमेरिकेच्या धोरणातील हा बदल आणि वाढती भारत-सोव्हिएत युनियन मैत्री याचा अत्यंत नकारात्मक परिणाम भारत-अमेरिका संबंधांच्या विकासावर झाला.

**इंदिरा गांधी विरुद्ध रिचर्डस निक्सन :** रिचर्डस निक्सन हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष असण्याच्या काळात (१९६९ ते १९७४) भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध अत्यंत तणावपूर्ण बनून सातत्याने ताणलेले होते. टी.एन. कौल यांच्या मते, रिचर्डस निक्सन यांच्या काळातील अमेरिकेने आंतरराष्ट्रीय शक्ती संतुलन वेगळ्या पायावर स्थापित करण्याच्या दृष्टीने एक नवीन धोरण विकसित केले. अमेरिकेच्या शक्तीच्या मर्यादा मान्य करणे आणि आशियातील अमेरिकन वचनबद्धता कमी करून तेथील पेचप्रसंगातून अंग काढून घेणे

असे धोरणात्मक निर्णय घेण्यात आले. बी. आर. नय्यर यांच्या मते, अमेरिकेच्या धोरणातील याबदलामागील मुख्य प्रेरणा या पुढीलप्रमाणे होत्या.

(१) आंतरराष्ट्रीय राजकारणात अमेरिकेला केंद्रस्थानी आणणे.

(२) सोव्हिएत युनियनच्या प्रभाव विस्ताराला मर्यादित करणे.

(३) व्हिएतनाममधून अमेरिकन सैन्याने माघार घेण्याची प्रक्रिया सुलभ करणे.

(४) आंतराष्ट्रीय राजकारणात सोव्हिएत युनियन गटापासून वेगळा व तिसरी शक्ती म्हणून चीनशी संबंध प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने वाटचाल करणे. चीनशी संबंधातील बदल हे चीनच्या आण्विक शक्तीत झालेल्या वाढीच्या परिणामस्वरूप होते.

वर उल्लेख केलेल्या निक्सन यांच्या काळातील अमेरिकेच्या धोरणात झालेल्या बदलांमुळे अमेरिकेचे भारताबाबतचे परराष्ट्र धोरण हे उदासीन स्वरूपाचे राहिले. भारत-सोव्हिएत युनियन यांची वाढती मैत्री तसेच आशिया आणि हिंदी महासागर क्षेत्राच्या सुरक्षेबाबत अमेरिकेचा दृष्टिकोन स्वीकारण्याबाबत भारताने दिलेला नकार अमेरिकेच्या पचनी पडला नाही.

**बांगलादेश युद्ध आणि भारत–अमेरिका संबंध :** भारत-अमेरिका संबंधातील सर्वात तळाचा स्तर हा १९७१ मध्ये आला. भारताने प्रथम सोव्हिएत युनियनशी शांतता आणि मैत्रीच्या करारावर स्वाक्षरी केली आणि त्यानंतर भारत हा बांगलादेश युद्धात मुक्तिवाहिनीच्या बाजूने सामील झाला. अमेरिकन सरकारने भारत-सोव्हिएत युनियन मैत्री कराराच्या विरोधात तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. भारताचे परराष्ट्र धोरण हे सोव्हिएत युनियनच्या बाजूने झुकलेले असल्याचे या कराराच्या निमित्ताने स्पष्ट झाले अशी अमेरीकेची धारणा झाली. काही अमेरिकन लेखकांनी हा करार म्हणजे भारताने अलिप्ततावादी धोरण सोडून दिले असल्याचे द्योतक आहे, असे निरीक्षण नोंदवले. दुसरीकडे, भारताने या टीकेचे जोरदार खंडन केले आणि भारत हा अलिप्तवादी धोरणावर कायम असल्याचे ठासून सांगितले. १९७१ च्या भारत-पाक युद्धात, ज्याला 'बांगलादेश युद्ध' म्हणून ओळखले जाते, यात अमेरिकेने पूर्णपणे पाकिस्तान समर्थक भूमिका घेतली होती. पाकिस्तानच्या अंतर्गत बाबींमध्ये भारत हस्तक्षेप करत असल्याची जोरदार टीका अमेरिकेने केली. निक्सन सरकारने अमेरिकेचे 'सातवे आरमार' हे बंगालच्या उपसागरात रवाना केले. भारतावर दबाव आणण्यासाठी 'गन-बोट डिप्लोमसी' (Gun-Boat Diplomacy) वापरण्याचा हा निक्सन प्रशासनाचा प्रयत्न होता. भारताला अमेरिकेकडून मिळणारी आर्थिक मदत आणि संरक्षण उपकरणांचा पुरवठा पूर्णपणे थांबवण्याचे आदेश निक्सन सरकारने दिले. बांगलादेशच्या मुक्तीसाठी मदत करण्याच्या व त्यासाठी पाकिस्तान विरुद्ध युद्धात सहभागी होण्याच्या भारताच्या धोरणावर अमेरिकेने केलेली टीका आणि विरोध यामुळे भारत-अमेरिका संबंध खालावले. तथापि, या युद्धात पाकिस्तानचा दारूण पराभव आणि बांगलादेशला मिळालेल्या मुक्तीमुळे दक्षिण आशियातील सामरिक शक्ती संतुलन बदलले आणि त्याचा परिणाम म्हणून भारत या क्षेत्रातील एक मोठी शक्ती म्हणून उदयास आला. पाकिस्तान आणि भारत यांच्यातील समानतेच्या तत्त्वावर आधारित असलेल्या अमेरिकन धोरणाला हा मोठा धक्का होता. भारत-अमेरिकेतील परस्पर संबंध हे कटू होत

गेले आणि पुढे अनेक महिने असेच राहिले. सन १९७१ च्या बांगलादेश युद्धानंतर लवकरच भारताने उत्तर व्हिएतनामशी आपले राजकीय संबंध विकसित करण्याचा निर्णय घेतला. सन १९७२ मध्ये, जॅक अँडरसन यांच्याशी संबंधीत कागदपत्रे प्रकाशित झाल्यानंतर रिचर्डस निक्सन प्रशासनाचा भारतविरोधी पक्षपातीपणा जगासमोर उघडकीस आला. पुढे, भारताने उदयोन्मुख वॉशिंग्टन-पेकिंग-पिंडी संबंधांना (अमेरिका-चीन-पाकिस्तान संबंध) संशयाने पाहिले. हे सर्व घटक भारत-अमेरिका संबंधांसाठी प्रक्षोभक ठरले.

**भारत-अमेरिका संबंधामध्ये अस्वस्थता:** सन १९७२ च्या शेवटच्या महिन्यात भारत-अमेरिका यांच्यातील तणाव थोडासा निवळण्यास सुरवात झाली. या बदलाच्या आरंभास कारणीभूत ठरलेला मुद्दा म्हणजे भारताच्या कर्जांच्या हफ्त्यांचे पुनर्रनिर्धारण करण्याच्या प्रस्तावाला अमेरिकेने सहमती दर्शवली. अमेरिकेच्या या निर्णयाची भारताने प्रशंसा केली. हेन्री किसिंजर या अमेरिकन मुत्सद्दींच्या मते, अमेरिकेने भारताला दक्षिण आशियातील प्रमुख सत्ता मानले व यासोबतच डॅनियल पी. मोयनिहान यांची भारतातील अमेरिकेचे राजदूत म्हणून नेमणूक या दोन बाबींमुळे १९७१ पासून तणावपूर्ण असलेले भारत-अमेरिका संबंधात सुधारणा होण्याजोगे पोषक वातारवण निर्माण झाले. डिसेंबर, १९७३ मध्ये अमेरिकेने भारताला मदत म्हणून देण्यात येणाऱ्या कर्जाचा दोन तृतीयांश भाग हा माफ करून (Write Off) केल्याने भारत-अमेरिका संबंध सुधारण्याच्या दिशेने सकारात्मक वातावरण निर्माण झाले.

भारत-अमेरिका संबंध सुधारण्याच्या प्रक्रिया सुरू असतानाच व्हिएतनाम प्रश्न, दिएगो गार्सियामधील अमेरिकन लष्करी तळाची निर्मितीसंबंधी वाद, सी.आई.ए. च्या गुप्त कारवाया आणि मार्च १९७३ पासून पाकिस्तानला अमेरिकेकडून लष्करी पुरवठा सुरु करण्याचा निर्णय इत्यादी बाबींसंदर्भात भारत व अमेरिका यांनी एकमेकांवर तीव्र शब्दात टीका-टिप्पणी केल्यामुळे भारत-अमेरिका संबंध पुन्हा बिघडले. १८ मे १९७४ रोजी भारताने आपले पहिली शांततापूर्ण अणुचाचणी केली व अणुशक्ती असलेल्या मोजक्या राष्ट्रांच्या यादीत भारत सामील झाला. भारताच्या शांततामय अणुचाचणीच्या अमेरिकेने कठोर शब्दात निषेध केला. भारताच्या अणुशक्ती धोरणाकडे अमेरिका हे संशयाने पाहत होते. अमेरिकन सरकारला वाटत होते की, भारताच्या अणुशक्ती धोरणामुळे आशियातील इतर राष्ट्रे विशेषत: पाकिस्तान वगैरे अणुशक्ती मिळवण्याचा प्रयत्न करू लागतील. परिणामी, आशिया खंडात अण्वस्त्रांची स्पर्धा सुरु होईल. मात्र, भारताला अणुशक्ती मिळवण्याचा व शांततापूर्ण कारणांसाठी अणुतंत्रज्ञान विकसित करण्याचा संपूर्ण अधिकार असल्याचे भारताची भूमिका होती.

ऑक्टोबर १९७४ मध्ये अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री डॉ. हेन्री किसिंजर यांनी भारताला भेट दिली. डॉ. हेन्री किसिंजर यांनी भारताच्या आणि अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणातील एकमेकांबद्दलचे समज-गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला. २८ ऑक्टोबर १९७४ रोजी, आर्थिक, व्यावसायिक, वैज्ञानिक, तांत्रिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक सहकार्यावर भारत-अमेरिका यांच्या एकत्रित आयोगाच्या स्थापनेसाठी एक करार झाला. याद्वारे भारत आणि अमेरिकेने या क्षेत्रांमध्ये परस्पर सहकार्य वाढवण्याचा निर्णय घेतला. अमेरिका व सोविएत युनियन यांच्यातील तणाव कमी होणे, १९७३ मध्ये व्हिएतनाम युद्धाची समाप्ती, हेन्री किसिंजर आणि

राष्ट्राध्यक्ष फोर्ड यांची सकारात्मक विधाने आणि अमेरिकेकडून भारताला मिळणारी आर्थिक मदत पुन्हा सुरू झाल्याने भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध विकसित होण्याच्या शक्यता अधिक बळकट झाल्या.

**जनता पक्ष – लोक दल युग (१९७७–७९):** मार्च १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत, भारताच्या राजकीय परीदृश्यात एक मोठा बदल झाला. भारताच्या स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच बिगर काँग्रेस पक्ष अर्थात जनता पक्ष हा केंद्रात सत्तेवर आला. परिणामी, अमेरिकेबद्दलच्या भारतीय परराष्ट्र धोरणात मोठा बदल होण्याची शक्यता निर्माण झाली. जनता पक्षाच्या केंद्र सरकारमधील पंतप्रधान मोरारजी देसाई आणि परराष्ट्रमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांनी अलिप्ततावादी चळवळीची आपली बांधिलकी स्पष्ट केली होती. मात्र, त्याचवेळी अलिप्ततावादी भूमिका 'वास्तव' आणि 'योग्य' बनवण्याची भूमिका व्यक्त केली. सदरची भूमिका ही सोव्हिएत युनियनच्या बाजूने कल असणारे व त्याच्याशी विशेष सहकार्य असण्याच्या इंदिरा गांधी यांच्या काँग्रेस सरकारच्या काळातील धोरणाचा त्याग इच्छा प्रदर्शित करणारी होती. परिणामी, जनता पक्षाचे सरकार हे अमेरिकेसोबत संबंध सुधारण्याच्या दृष्टीने मोठी पाऊले उचलेल अशी आशा निर्माण झाली. सन १९७७ च्या पॅरिसच्या भेटीदरम्यान परराष्ट्र मंत्री अटल बिहारी वाजपेयींनी अमेरिकेच्या परराष्ट्र सचिवांची भेट घेतली. वाजपेयी यांनी भारत व अमेरिका यांच्यात अधिक मैत्रीपूर्ण आणि सहकार्यपूर्ण संबंध राखण्याची गरज स्पष्ट केली.

भारत–अमेरिका मैत्रीमध्ये सुधारणा व्हावी या उद्देशाने जानेवारी १९७८ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जिमी कार्टर यांनी भारताला भेट दिली. मात्र, या भेटीचा कोणताही ठोस परिणाम होऊ शकला नाही. याउलट अण्वस्त्र प्रसारबंदी करार [Non-Proliferation Treaty (NPT)] वर भारताने स्वाक्षरी करण्याच्या मुद्द्यांवर भारत–अमेरिकेमध्ये तीव्र मतभेद निर्माण झाले. भारताने अण्वस्त्र प्रसारबंदी करारवर स्वाक्षरी करावी अशी अमेरिकेची इच्छा होती. याउलट, हा करार राष्ट्रांराष्ट्रात भेदभाव करणारा आणि भारताच्या राष्ट्रीय हितासाठी हानिकारक असल्याचे भारताची भूमिका होती. परिणामी, भारत–अमेरिका यांच्यातील चांगले संबंध विकसित होण्याची शक्यता पुन्हा एकदा धूसर झाली. जून १९७८ मध्ये पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी अमेरिकेला भेट दिली. आपल्या भेटीत, मोरारजी देसाई यांनी भारत व अमेरिका यांच्यातील सहकार्य वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला. अमेरिकेने तारापूर येथील अणु प्रकल्पासाठी लागणारे समृद्ध युरेनियमचा भारताला पुरवठा करण्यात विलंब केला होता. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष कार्टर यांनी पंतप्रधान मोरारजी देसाई यांना या संदर्भात सकारात्मक आश्वासन दिले. पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या अमेरिका दौऱ्यामुळे दोन्ही राष्ट्रांमधील काही गैरसमज दूर होण्यास निश्चितपणे मदत झाली. मात्र, अण्वस्त्र प्रसारबंदी कराराच्या संदर्भात कोणताही तोडगा निघाला नाही. तसेच, सन १९६३ च्या करारानुसार अमेरिकेने भारताला समृद्ध युरेनियम पुरवण्याच्या संदर्भातील भारत व अमेरिकेतील मतभेददेखील दूर करणे शक्य झाले नाही. परिणामी, जनता पक्ष व लोकदलाच्या कार्यकाळात भारत आणि अमेरिका यांच्यातील परस्पर संबंध केवळ मर्यादित प्रमाणात विकसित होऊ शकले.

**सन १९८०–८४ दरम्यान भारत व अमेरिका संबंध:** जानेवारी १९८० मध्ये इंदिरा गांधी या पुन्हा भारताच्या पंतप्रधान बनल्या. सप्टेंबर १९८० मध्ये, रोनाल्ड रेगन हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून

आले. दोन्ही देशातील शीर्ष नेतृत्वात झालेले बदल आणि आशियाच्या शक्ती संतुलनात झालेले बदल यांच्यामुळे भारत व अमेरिका परस्पर संबंधात बदल घडून आले. मात्र, ते नेहमीप्रमाणे वरवर मैत्रीचे व सहकार्याचे होते पण त्यात दृढता, मुलभूत परस्पर समन्वय व उत्साह नव्हता. याकाळात भारत आणि अमेरिकेत पुढील मुद्द्यांवरून गंभीर स्वरूपाचे मतभेद होते.

(१) सोव्हिएत युनियनच्या अफगाणिस्तानमधील कारवाईमूळे निर्माण झालेले राजकीय संकट

(२) अमेरिकेकडून पाकिस्तानला होणारा अत्यंत अत्याधुनिक शस्त्रे आणि लढाऊ विमानांचा पुरवठा

(३) हिंदी महासागरातील दिएगो गार्सिया येथे उभारण्यात आलेल्या अमेरिकेच्या लष्करी तळाचा प्रश्न

(४) कंबोडियातील नव्या साम्यवादी कंपुचियाला मान्यता देण्याचा मुद्दा

(५) भारताचे अण्वस्त्र धोरण आणि अमेरिकेचा त्यास विरोध

वरील मुद्द्यांमुळे भारत व अमेरिका यांचे संबंध सुधारण्यात सातत्याने अडथळा येत होता.

सोव्हिएत युनियनने अफगाणिस्तान मधील साम्यवादी सरकार वाचविण्याच्या उद्देशाने १९७९ मध्ये अफगाणिस्तान मध्ये लष्करी हस्तक्षेप केला. अफगाणिस्तान मधील ही सोव्हिएत युनियनची लष्करी कारवाई १९८९ पर्यंत चालू होती व त्याचे दूरगामी परिणाम जागतिक राजकारणावर पडले. अफगाणिस्तान मधील सोव्हिएत युनियनच्या लष्करी हस्तक्षेपावर अमेरिकेने जोरदार टीका केली. अमेरिकेने सोव्हिएत युनियनचा विस्तारवाद म्हणून अफगाणिस्तान मधील कारवाईची निंदा केली. अफगाणिस्तानमधील सोव्हिएत युनियनच्या सैन्याची उपस्थिती बेकायदेशीर, अनैतिक आणि अफगाणिस्तानच्या लोकांच्या हक्क आणि इच्छेविरुद्ध आहे, असे अमेरिकेचे मत होते. अमेरिकेच्या मते, अफगाणिस्तानमधील सोव्हिएत युनियनच्या लष्करी हस्तक्षेपामागे पुढील विस्तारवादी उद्दिष्ट्ये होती.

(१) अफगाणिस्तानवर नियंत्रण मिळवून सोव्हिएत युनियन आपल्या विरोधातील चीनला सामरिकरित्या घेरण्याचा प्रयत्न करत होता.

(२) अमेरिकेशी जवळीक असणाऱ्या पाकिस्तानवर दबाव आणण्यासाठी

(३) पर्शियन अखातापर्यंत पोहोचण्याचा भूमार्ग प्राप्त करणे.

वरील सर्व उद्दिष्ट्ये ही अमेरिकेच्या हितसंबंधांना बाधा आणणारी असल्याने अमेरिकेने सोव्हिएत युनियनचा कडाडून विरोध केला. याउलट, भारताने सोव्हिएत युनियनची निंदा करण्यास आपली अनास्था दर्शविली. कारण, भारताच्या मते, अफगाणिस्तानमध्ये साम्यवादविरोधी-सोव्हिएत युनियनविरोधी राजवट स्थापित करण्याच्या काही राष्ट्रांच्या कारवायांमुळे सोव्हिएत युनियनला हस्तक्षेप करावा लागला आहे. सोव्हिएत युनियनचा निषेध करून किंवा अफगाण मुजाहिदांना शस्त्रास्त्रे पुरवल्याने अफगाणिस्तान प्रश्नाचे निवारण होणार नाही, असे भारताचे मत होते. शांततामय वाटाघाटी व बाहेरील हस्तक्षेप थांबवून अफगाणिस्तानातून सोव्हिएत युनियनच्या सैन्याच्या माघारीवर तोडगा काढता येईल. परिणामी, भारताने

सोव्हिएत युनियन संदर्भातील अमेरिकन भूमिकेशी सहमती दर्शवली नाही. याशिवाय अफगाणिस्तानातील सोव्हिएत युनियनच्या उपस्थितीमुळे पाकिस्तान किंवा दक्षिण आशियाची सुरक्षा धोक्यात येईल, हे मत भारताला मान्य नव्हते. सोव्हिएत युनियनच्या सामर्थ्याचा पुढील विस्तार रोखण्यासाठी पाकिस्तानला लष्करीदृष्ट्या सामर्थ्यशाली करण्यावर अमेरिकेचा भर होता. परिणामी, अमेरिकेने पाकिस्तानला अत्यंत अत्याधुनिक शस्त्रास्त्रे आणि लढाऊ विमाने ही खूप कमी दराने विकण्याचा निर्णय घेतला. अत्यंत प्रगत F-16 या लढाऊ विमानांच्या पुरवठ्यासह इतर प्रकारच्या लष्करी शस्त्रास्त्रांचा पुरवठा पाकिस्तानला देण्याच्या अमेरिकेच्या धोरणास भारताचा ठाम विरोध होता. कारण या शस्त्रास्त्रांचा वापर पाकिस्तान हा भारताविरोधात करू शकतो, अशी रास्त शंका भारतास होती. अण्वस्त्रे तयार करण्याच्या दृष्टीने पाकिस्तानने सुरु केलेल्या प्रयत्नांकडे अमेरिका कानाडोळा करते असे भारताला वाटत होते.

अमेरिकेने हिंदी महासागरात दिएगो गार्सिया हे नाविक तळ विकसित करण्यास सुरवात केली होती. आशिया व हिंदी महासागरातील अमेरिकेच्या हितसंबंधांच्या रक्षणासाठी हा नाविक तळ आवश्यक असल्याची अमेरिकेची भूमिका होती. भारताने अमेरीकेद्वारे हा नाविक तळ उभारण्याच्या धोरणाला तीव्र विरोध केला. भारताच्या मते, दिएगो गार्सिया येथील अमेरिकन नाविक तळ हा भारताच्या संरक्षण सिद्धतेसाठी अत्यंत धोकादायक होता. दिएगो गार्सिया संबंधी भारत व अमेरिकेतील मतभेद सातत्याने समोर येत राहिले आहेत. याशिवाय जागतिक अर्थव्यवस्थेच्या संदर्भात विकसित देश आणि विकसनशील देश यांच्यातील हितसंबंधांच्या संघर्षाचा परिणाम विकसित देश असलेल्या अमेरिका व विकसनशील देश असलेल्या भारताच्या परस्पर संबंधावर देखील पडला.

जून १९८२ मध्ये, पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी अमेरिकेचा दौराकरून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रेगन यांच्याशी महत्त्वपूर्ण आणि फलदायी स्वरुपाची चर्चा केली. दोन्ही नेत्यांनी भारत-अमेरिका परस्परसंबंधांच्या बाबतीत आपली चांगली समज असल्याचे दर्शवत मैत्रीपूर्ण आणि सहकार्यावर आधारित संबंध विकसित करण्याच्या दृष्टीने येणाऱ्या काळात प्रयत्न करणार असल्याचे स्पष्ट केले. भूतकाळातील चांगल्या संबंधांचे दुवे आणि भविष्यातील मैत्रीच्या आकांक्षा यांच्या आधारावर दृढ मैत्रीपूर्ण संबंध निर्माण होऊ शकतात यावर दोन्ही राष्ट्रांनी सहमती दर्शवली. या भेटीदरम्यान भारताला समृद्ध युरेनियमच्या पुरवठ्याचा मुद्दा सौहार्दपूर्णपणे सोडवण्यात आला. नव्या तारापूर करारानुसार अमेरिकेऐवजी फ्रान्सने समृद्ध युरेनियमचा भारताला पुरवठा करण्याचे मान्य केले. परिणामी, भारत व अमेरिकेतील एक वादाचा मुद्दा आपसूक दूर झाला. दोन्ही देशांमधील सहकार्य वाढण्याची शक्यता पूर्वीपेक्षा चांगली असल्याचे दिसून आले.

तथापि, १९८२-८४ या काळात प्रत्यक्ष व्यवहारात कोणतीही वास्तविक सुधारणा झाली नाही. पाकिस्तानला अत्याधुनिक शस्त्रास्त्रांचा पुरवठा चालू ठेवण्याचा आणि वाढवण्याचा अमेरिकेचा निर्णय, विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाबाबत अमेरिकेची उदासीनता, अधिकाधिक अत्याधुनिक शस्त्रे विकसित करण्याचा आणि तैनात करण्याचा अमेरिकेचा निर्णय, भारतविरोधी अतिरेकी गटांवर नियंत्रण ठेवण्याच्या मुद्द्यावर अमेरिकेची असहकार्याची भूमिका, हिंदी महासागरात आणि विशेषत: आखाती प्रदेशात लष्करी हालचाली सुरू करण्याचा अमेरिकेचा निर्णय आणि भारताची सोव्हिएत युनियनशी मैत्री व सहकार्य

इत्यादी बाबी या  भारत व अमेरिका यांच्यातील मैत्री व सहकार्याचे संबंध एका मर्यादित प्रमाणात वाढू न देण्यास जबाबदार ठरले.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

१. मे, १९६५ मध्ये अमेरिका दौऱ्यात पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांना भेटण्यास ............ यांनी असमर्थता दर्शवली.

अ) राष्ट्राध्यक्ष निक्सन   ब) राष्ट्राध्यक्ष ट्रुमन   क) राष्ट्राध्यक्ष केनेडी ड) राष्ट्राध्यक्ष जॉन्सन

२. ........... च्या मदती बदल्यात अमेरिकाधार्जिणे धोरण स्वीकारण्याला भारताने विरोध केला..

अ) अन्नधान्य   ब) तंत्रज्ञान   क) अण्वस्त्रे   ड) शस्त्रास्त्रे

३. १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धावेळी अमेरिकेने आपले ........... भारतावर दबाब टाकण्यासाठी पाठवले.

अ) वायुदल   ब) सैन्यदल   क) नौदल   ड) तटरक्षक दल

४. जोड्या जुळवून योग्य पर्याय निवडा.

| गट १ | गट २ |
|---|---|
| १. रिचर्डस निक्सन | अ. भारतासंबंधी उदार धोरण |
| २. लिंडन बी. जॉन्सन | ब. फ्रान्सद्वारे समृद्ध युरेनियमच्या भारतास पुरवठ्यास मान्यता |
| ३. रोनाल्ड  रेगन | क. भारत विरोधात नौदल |
| ४. जॉन एफ. केनेडी | ड. भारताला अन्नधान्याची मदत |

अ) १-ड, २-अ, ३-ब, ४- क   ब) १-क, २-ड, ३-ब, ४- अ

क) १-ब, २- क, ३-अ, ४-ड   ड) १-अ, २-ड, ३-क, ४- ब

५. खालील विधानांच्या संदर्भात योग्य पर्याय निवडा.

विधान १ – अण्वस्त्र प्रसारबंदी करारावर भारताने सही करू नये म्हणून अमेरिका दबाव टाकत होती.

विधान २ – अण्वस्त्र प्रसारबंदी करारावर सही करण्यास भारत सदैव उत्सुक होता.

अ) विधान १ हे सत्य / योग्य आणि विधान २  हे असत्य / अयोग्य

ब) विधान २ हे सत्य / योग्य  आणि विधान १ हे असत्य / अयोग्य

क) दोन्ही विधाने सत्य / योग्य

ड) दोन्ही विधाने असत्य / अयोग्य

### २.२.३ चीन

**पृष्ठभूमी:** भारताचे शेजारी राष्ट्र असलेल्या चीनशी भारताचे सांस्कृतिक व आर्थिक संबंध हे प्राचीन काळापासून अस्तित्वात होते. सन १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला व १९४९ मध्ये चीनमध्ये साम्यवादी क्रांती होऊन चीनचे जनवादी प्रजासत्ताक People's Republic of China (PRC) अस्तित्वात आले. साम्राज्यवाद विरोधात लढा देऊन आशियात नव्याने अस्तित्वात आलेले राष्ट्र म्हणून दोन्ही देशात समान धागा होता. परिणामी, सुरवातीच्या काळात भारत आणि चीनचे परस्परसंबंध हे विकसित होतील या दृष्टीने दोन्ही देश हे आशावादी आणि सकरात्मक होते. तिबेटवरील चीनचा कब्जा आणि सीमेसंबंधी वाद असले तरी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि चीनच्या शीर्ष नेतृत्वाने 'पंचशील' च्या तत्त्वांना दोन्ही देशांच्या परस्पर संबंधाचा पाया म्हणून मान्यता दिली होती. तरीही, चीनने १९६२ ला भारतावर आक्रमण करून भारताचा काही भाग अनधिकृतपणे आपल्या ताब्यात घेतला. भारत-चीन युद्धामुळे भारतीय नेतृत्व आणि जनमानस यांचे चीनसंबंधी दृष्टीकोनात अमुलाग्र बदल झाला. भारत-चीन यांच्यातील सीमावाद हा सतत चिघळत राहणारा विषय ठरला.

**भारतविरोधी चीन व पाकिस्तान मैत्री:** भारताला दक्षिण आशियामध्ये एकटे पडण्यासाठी चीनने पाकिस्तानशी जवळीक साधून चीन-पाकिस्तान संबंध विकसित केले. १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धादरम्यान, चीनने भारताप्रती शत्रुत्व दर्शवून पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय पातळीवर पाठींबा दिला. इतकेच नव्हे तर पाकिस्तानला चीनने शस्त्रास्त्रांची मदत देखील केली होती. १९६५ च्या युद्धात भारतीय सैन्याने पाकिस्तानकडून अमेरिकन शस्त्रास्त्रांसोबतच चीनकडून पाकिस्तानला मिळालेली हत्यारे देखील हस्तगत केली होती. १९६५ चे युद्ध सुरु असताना चीनने पाकिस्तानला मदत होईल यादृष्टीने भारताची कुरापत काढण्याचा प्रयत्न केला. १६ सप्टेंबर १९६५ रोजी भारताला भारत-सिक्कीम-चीन सीमेवरील ५६ लष्करी ठाणी रिकामी करण्यास सांगितले. चीनच्या मते, भारताने ही ठाणी बेकायदेशीरपणे उभी केली होती. तीन दिवसाच्या आत ही लष्करी ठाणी भारताने रिकामी करावीत अन्यथा भारताला गंभीर परिणाम भोगावे लागतील असा इशारा चीनने दिला. सोव्हिएत युनियन आणि अमेरिका यांनी युद्धाचा आवाका वाढू नये म्हणून चीनला तंबी दिल्यामुळे चीनला शांत बसणे भाग पडले. पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी चीनला स्पष्टपणे सांगितले की भारताने सिक्कीम-चीन सीमेच्या कथित उल्लंघनात तथ्य नाही आणि भारताने भारतीय भूभागावरील चीनचे सर्व दावे फेटाळून लावले.

इंदिरा गांधी यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात भारताने पुढाकार घेऊन चीन सोबत संबंध सुधारण्याचे पुष्कळ अयशस्वी प्रयत्न केले. जून १९६७ मध्ये दिल्लीतील चिनी दूतावासाच्या दोन अधिकाऱ्यांना हेरगिरीसाठी अटक करण्यात आली. भारताच्या सिक्कीमच्या प्रदेशाला व चीनच्या तिबेट प्रदेशाला जोडणाऱ्या 'नाथू ला' नावाच्या खिंडी जवळ भारत-चीन सीमेवरील भारतीय ठाण्यांवर सण १९६७ च्या सप्टेंबरमध्ये चीनने हल्ला केला. ऑक्टोबर, १९६७ मध्ये सिक्कीम व तिबेटला जोडणाऱ्या आणखी एका 'चो ला' नावाच्या खिंडी जवळच्या भारतीय चौकीवर चीनने हल्ला केला. एप्रिल, १९६८ मध्ये नाथू ला येथे पुन्हा चीनने

घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला. आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठ्याप्रमाणात टीका होऊ लागल्यामुळे १९७० मध्ये चीनने भारतीय सीमेवरील आपल्या कुरापती थांबविल्या. चीनच्या वर्तवणूकीतील या बदलाचे स्वागत करून भारताचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री स्वर्णसिंग यांनी भारत-चीन परस्पर संबंध सुधारण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

१९७१ मध्ये झालेल्या बांगलादेश समस्येच्या काळात चीनने सातत्याने पाकिस्तानला पाठींबा दर्शवून भारताशी शत्रुत्व प्रकट केले. पाकिस्तानचे अध्यक्ष याह्या खान आणि झुल्फिकार अली भुट्टो यांनी पाकिस्तानमध्ये निर्माण झालेली राजकीय परिस्थिती अत्यंत चुकीच्या पद्धतीने हाताळल्यामुळे पूर्व पाकिस्तान (म्हणजेच आजचा बांगलादेश) मधील परिस्थिती चिघळली. पूर्व पाकिस्तानच्या बंगाली भाषिक नागरिकांनी स्वतंत्र बांगलादेशची घोषणा करून पाकिस्तानविरुद्ध उठाव केला. बांगलादेशातील उठाव दडपून टाकण्यासाठी पाकिस्तानी सैन्याने बंगाली भाषिकांचा नरसंहार आरंभला. परिणामी, परिस्थिती चिघळत जाऊन पुढे भारत-पाकिस्तान युद्धाला तोंड फुटले. १९७१ च्या डिसेंबर महिन्यात झालेल्या या युद्धात पाकिस्तानचा पराभव होऊन स्वतंत्र बांगलादेश अस्तित्वात आला. युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्यावर चीनने कोणतीही स्पष्ट भूमिका घेतली नव्हती. मात्र, युद्धाला तोंड फुटल्यावर चीनने पाकिस्तानला आपला संपूर्ण पाठींबा देऊन लष्करी मदत देखील पुरवली. मात्र, अनेकांच्या अपेक्षेप्रमाणे चीनने प्रत्यक्ष युद्धात भाग घेतला नाही. पाकिस्तानचे लष्करशाह याह्या खान यांनी पराभवाचे खापर झुल्फिकार अली भुट्टोंवर फोडताना, भुट्टोंनी चीन हा पाकिस्तानच्या बाजूने प्रत्यक्ष युद्धात उतरेल अशी खात्री दिली होती. अमेरिकेला देखील चीन हा १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धात पाकिस्तानच्या मदतीकरिता प्रत्यक्ष युद्धात भाग घेईल असा विश्वास होता. भारताचे तत्कालीन लष्करप्रमुख जनरल सॅम माणेकशा यांना देखील भारत-पाकिस्तान युद्ध झाले तर चीन या युद्धात पाकिस्तानच्या बाजूने प्रत्यक्ष हस्तक्षेप करेल असे वाटत असल्याने त्यांनी प्रत्यक्ष युद्धासाठी १९७१ मध्ये नोव्हेंबर-डिसेंबर महिन्याची निवड केली होती. नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये हिमालयात बर्फ पडून सीमाक्षेत्रातील मार्ग बंद होतील व चीनला प्रत्यक्ष युद्धावेळी पाकिस्तानच्या मदतीसाठी लष्करी हालचाली करणे अशक्य होईल असा जनरल माणेकशा यांचा होरा होता. प्रत्यक्षात चीन आणि अमेरिकेलादेखील भारत-पाकिस्तान युद्धात पाकिस्तानच्या बाजूने भाग घेता आला नाही. ऑगस्ट, १९७१ मध्ये झालेला भारत आणि रशिया यांच्यातील मैत्री व सहकार्य करार हा चीन व अमेरिकेच्या कारवायांना मर्यादित ठेवण्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आणि परिणामकारक ठरला. पाकिस्तानला प्रत्यक्ष युद्धात मदत करता न आल्याने हतबल झालेल्या चीनने संयुक्त राष्ट्रसंघातील स्थायी सदस्यत्वाचा फायदा घेऊन भारतावर प्रचंड टीका केली.

बांगलादेशला स्वतंत्र होण्यापासून कोणीच रोखू शकले नाही, पण चीनने संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा समितीतील आपल्या स्थायी पदाचा वापर करून बांगलादेशला संयुक्त राष्ट्रसंघात प्रवेश देण्याच्या प्रस्तावविरोधात आपला नकाराधिकार (Veto) वापरला. पाकिस्तानची तळी उचलण्याच्या नादात चीन हे विसरून गेला की स्वत: चीनचा संयुक्त राष्ट्रसंघातील प्रवेश हा अमेरिकेने नकाराधिकार वापरल्याने दोन दशके रखडलेला होता. पंतप्रधान इंदिरा गांधी या तरीदेखील आशावादी होत्या. जानेवारी, १९७२ मध्ये चीन

– पाकिस्तान संबंध दृढ असले तरी भारत व चीन यांचे परस्पर संबंध सुधारण्यास वाव आहे, असे इंदिरा गांधी यांना वाटत होते. मात्र, चीनच्या कुरापती सुरू राहून ऑक्टोबर १९७५ मध्ये भारताच्या पूर्व सीमेवर चीनकडून गोळीबाराच्या घटना घडून चार भारतीय जवान शहीद झाले.

**भारताची आण्विक चाचणी:** भारताने राजस्थानच्या वाळवंटामधील पोखरण येथे १९७४ च्या मे महिन्यात आण्विक चाचणी केली. भारताने केलेली आण्विक चाचणी व भारताचा अणु संशोधन कार्यक्रम हा अणुशक्तीच्या शांततापूर्ण उपयोगासाठी असून भारताने आण्विक शास्त्रास्त्रे निर्मितीसाठी ही आण्विक चाचणी केली नसल्याचे जगाला स्पष्ट शब्दात सांगितले. मात्र, भारताच्या अणुचाचणीकडे पाहण्याचा चीनचा दृष्टिकोन वेगळा होता. भारत हा अणुचाचणीचा उपयोग आपल्या शेजारच्या छोट्या राष्ट्रांवर दबाव निर्माण करेल असा चीनचा आरोप होता. खरेतर अशाप्रकारचे आरोप हे स्वतः चीनवर झाले होते, जेव्हा चीनने पहिल्यांदा अणुचाचणी केली होती. भारत आणि चीन यांच्या अणुचाचणीमध्ये सर्वात महत्त्वाचा फरक हा होता की, भारताची अणुचाचणी ही शांततामय उपयोगासाठी होती तर चीनने केलेली अणुचाचणी ही अण्वस्त्रे बनवण्याच्या उद्देशाने केलेली होती. चीनने आपले मित्र राष्ट्र असलेल्या पाकिस्तानला आश्वस्त केले की, भारताच्या या अणुशक्ती दबावाविरुद्ध चीन सदैव पाकिस्तानचे समर्थन करेल.

**सिक्कीमचे भारतात विलीनीकरण :** सन १९७४-७५ मध्ये सिक्कीमच्या जनतेने तेथील चोगयाल शासकांच्या विरोधात उठाव केल्यानंतर चीनची प्रतिक्रिया अत्यंत कडक स्वरुपाची होती. चीनच्या जनतेच्या उठावामुळे व सिक्कीममध्ये घेण्यात आलेल्या सार्वमतामध्ये जनतेने दिलेल्या कौलामुळे सिक्कीम भारतात सामील होऊन भारताच्या संघराज्यातील एक राज्य बनला. चीनने सिक्कीममधील घडामोडी हा भारताचा 'विस्तारवाद' असल्याचा आरोप केला. भारतासाठी यात काही नवीन नव्हते. शेजारी राष्ट्रांना धमकावणे, दबाव टाकणे, पाकिस्तानचे विभाजन घडवून आणणे, नेपाळपणे हस्तक्षेप करणे, तिबेटीयन बंडखोरांना आश्रय व समर्थन देणे इत्यादी प्रकारचे आरोप चीन सातत्याने भारतावर करत होता. चीनने सिक्कीमच्या भारतातील विलीनीकरणाला मान्य करण्यास नकार दिला. सोव्हिएत युनियनची मदत घेऊन स्वत:चे साम्राज्य उभारण्याचा भारताचा प्रयत्न असल्याचा आरोप चीनने केला. चीनचा आरोप हा अत्यंत तर्कहीन होता व त्याला कोणताही आधार नव्हता. भारताने चीनचे आरोप जोरदारपणे धुडकावून लावले. पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या मते, चीनचे स्वत:चे तिबेटमधील कृत्य आणि पाकिस्तानने हुंजरामध्ये घुसखोरी केल्यानंतर चीनने याबाबत बाळगलेले सोयीस्कर मौन पाहता सिक्कीमबद्दल भाष्य करण्याचा चीनला कोणताही अधिकार नाही. अंतिमत: सन २००६ मध्ये सिक्कीम हे भारताचे राज्य आहे हे चीनने मान्य केले.

**राजनैतिक संबंधांचे सामान्यीकरण:** भारत आणि चीन या दोन्ही देशांत परस्परांचे दूतावास असले तरीही १९६२ ते १९७४ या दोन्ही देशांत तणाव असलेल्या काळात राजदूत पातळीवरील संवाद त्रोटक होता. एप्रिल, १९७५ मध्ये तत्कालीन परराष्ट्रमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी लोकसभेत घोषणा केली की, चीनशी संबंध सुधारण्याच्या दृष्टीकोनातून भारताने चीनमध्ये राजदूत पाठविण्याचा निर्णय घेतला आहे. भारताने वरिष्ठ राजनीतिज्ञ असलेल्या के. आर. नारायण यांना भारताचे राजदूत म्हणून चीनला पाठविले. चीनने भारताने घेतलेल्या पुढाकाराचे स्वागत केले.

राजदूतपातळीवरील संबंध पुनर्स्थापित झाले असले तरी भारत आणि चीन यांच्यातील तणाव पूर्णपणे निवळला नव्हता. सीमावाद हा भारत-चीन यांच्यातील तणावाच्या अनेक कारणांपैकी एक होता. सीमावाद देखील प्रचंड गुंतागुंतीचा झाला होता, कारण अक्साई चीन मधील प्रत्यक्ष नियंत्रण रेषा Line of Actual Control (LAC) ही १९५९ किंवा १९६२ सारखी राहिली नसून चीनने तिचा विस्तार केला होता. चीनने अनधिकृतपणे बळकावलेल्या भारताच्या मालकीच्या प्रदेशात चीनद्वारे बेकायदेशीरपणे बांधल्या जाणाऱ्या काराकोरम महामार्गाला भारताचा विरोध होता. भारताने दलाई लामा आणि त्यांच्यासोबत मोठ्यासंख्येने आलेल्या तिबेटीयन लोकांना आपल्या देशात आश्रय दिला आहे ही बाब चीनला खटकणारी होती. भारत हा तिबेटमध्ये अशांतता निर्माण करण्याचा प्रयत्न करतो असा चीनचा आरोप होता.

भारत-चीन संबंध सुधारण्याच्या प्रक्रियेमध्ये सीमाप्रश्न हा सर्वात मोठा अडथळा होता. १९७० व १९८० च्या दशकांत सीमाप्रश्न बाजूला ठेऊन दोन्ही देशातील सोडवता येण्याजोग्या समस्या सोडवण्याबाबत चिनी नेतृत्वाने संकेत दिले. मात्र, १९७८ मध्ये भारताचे पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी असे मत व्यक्त केले की, सीमावाद सुटल्याशिवाय भारत-चीन मधील इतर समस्यांच्या सोडवणुकीत कोणतीच प्रगती होणे शक्य नाही. असे असले तरी दोन्ही देशांनी सीमावादमुळे संबंध सुधारण्याच्या प्रक्रियेवर बाधा येऊ नये याची काळजी घेतली.

**माओ यांच्या नंतर चीन व भारत संबंध :** सन १९४९ च्या साम्यवादी क्रांतीपासून चीनचे सर्वोच्च लष्करी नेते असलेल्या माओ-त्से-तुंग यांचा १९७६ मध्ये मृत्यू झाला. पुढच्याच वर्षी सन १९७७ मध्ये इंदिरा गांधी यांचा लोकसभा निवडणुकीत पराभव होऊन जनता पक्ष सत्तेवर आला. चीनमधील नवे नेतृत्व आणि भारतातील नवे पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी भारत-चीन संबंधांना पूर्वपदावर आणण्याचा आपल्या पूर्वसुरींप्रमाणे प्रयत्न केला. चीनमधील वरिष्ठ राजनैतिक अधिकाऱ्यांनी भारताचे पंतप्रधान मोरारजी देसाई व तत्कालीन परराष्ट्रमंत्री अटलबिहारी वाजपेयी व तत्कालीन विरोधी पक्ष नेत्या इंदिरा गांधी यांची भेट घेतली. त्यांनी परराष्ट्रमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांना चीन भेटीचे आमंत्रण दिले. भारताचे पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी स्पष्ट केले की, सीमा प्रश्न हा भारतासाठी मुलभूत प्रश्न आहे. त्यांच्या मते, सीमाप्रश्न सुटला तरच भारत-चीन संबंध पूर्वपदावर येऊ शकतात.

**वाजपेयी यांचा चीन दौरा:** परराष्ट्रमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांनी फेब्रुवारी १९७९ मध्ये चीनला भेट दिली. दुर्दैवाने वाजपेयींना आपला दौरा थोडक्यात आवरता घ्यावा लागला. चीनने अलिप्तावादी गटातील राष्ट्र असलेल्या व्हिएतनामवर आक्रमण केल्याने वाजपेयींना आपला दौरा सोडून परत फिरावे लागले. परस्पर संबंध पूर्वपदावर आणण्यासाठी गेल्या मागील तीन वर्षांपासून केलेल्या प्रयत्नांमुळे घडून आलेल्या वाजपेयींच्या चीन दौऱ्यात सीमाप्रश्न वगळता इतर मुद्द्यांवर चीनशी झालेली चर्चा ही सकारात्मक व फलदायी ठरली. दौऱ्यादरम्यान काश्मीर प्रश्नावर चीनने एकतर्फी स्वरुपात भर दिला नाही व सिक्कीमच्या भारतातील विलीनीकरणाला विरोध दर्शविला नाही. परराष्ट्रमंत्री वाजपेयी यांनी लोकसभेत माहिती देताना पुढील बाबी स्पष्ट केल्या.

१. चीनबरोबरचे संबंध पूर्वपदावर येत आहेत.

२. सीमाप्रश्न हा बाजूला पडला होता तो आता मुख्य पटलावर आणण्यात आला आहे.

३. परराष्ट्रमंत्र्यांनी चीनला ईशान्य भारतातील राज्यांमधील बंडखोरांना चीनद्वारे मिळणाऱ्या मदतीबद्दल विचारले तर चीनने ती भूतकाळातील बाब असल्याचे उत्तर दिले.

४. परराष्ट्रमंत्र्यांनी सिक्कीमबद्दल भारताची भूमिका स्पष्ट केल्यावर चीनने त्यावर कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही.

वाजपेयींच्या दौऱ्यानंतर नागा आणि मिझो बंडखोरांना चीनकडून मिळणारा शस्त्र पुरवठा थांबला. चीनमध्ये होणारा भारतविरोधी अपप्रचार हळूहळू बंद झाला. वाजपेयी यांच्याशी झालेल्या चर्चेमुळे सीमाप्रश्न जरी सुटला नसला तरी चीन व भारत यांच्या परस्पर सहकार्य स्थापित होऊ शकते हे दोन्ही देशांच्या लक्षात आले. या दौऱ्यानंतर भारत आणि चीन यांच्या व्यापार वाढ झाल्याचे दिसते.

**१९८० नंतर भारत व चीन संबंध:** इंदिरा गांधी या १९८० मध्ये पुन्हा भारताच्या पंतप्रधान झाल्या. भारत व चीन संबंध पूर्वपदावर आणण्यासाठी मोरारजी देसाई सरकारने घेतलेल्या पुढाकाराचा उपयोग करून इंदिरा गांधीनी भारताचे चीन धोरण विकसित केले. सन १९८० च्या मे महिन्यात युगोस्लाव्हियाचे राष्ट्राध्यक्ष मार्शल टिटो यांच्या अंत्यसंस्कारासाठी पंतप्रधान इंदिरा गांधी या युगोस्लाव्हियाची राजधानी बेलग्रेड येथे गेल्या होत्या. बेलग्रेडमध्येच त्यांनी चीनचे पंतप्रधान हुआ ग्वोफेंग यांची भेट घेतली. चाऊ-एन-लाय आणि जवाहरलाल नेहरू यांच्या १९६१ मधील भेटीनंतर प्रथमच चीन आणि भारताच्या शीर्ष नेतृत्वाची भेट झाली होती. इंदिरा गांधी आणि हुआ ग्वोफेंग यांनी भारत व चीन यांचे परस्पर संबंध सुधारण्याच्या दृष्टीने पाऊले उचलण्याचे ठरवले. सन १९८१ मध्ये हे स्पष्ट झाले की, कमीत कमी त्याग आणि जास्तीजास्त लाभ या दृष्टीकोनातून चीन हा भारताशी आपले संबंध विकसित करू इच्छित होता. मात्र, त्याच वेळी भारताचे शेजारी राष्ट्रे असलेल्या पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश यांच्याशी स्वत:चे परराष्ट्र संबंध बिघडू न देण्याबाबत चीन सावध होता. जटील सीमाप्रश्न हा बाजूला ठेऊन भारत व चीन या दोन्ही देशांनी आर्थिक, व्यापारी, सांस्कृतिक, सामाजिक आणि राजनैतिक क्षेत्रात द्विपक्षीय संबंध विकसित करण्यासाठी भर द्यायला हवा अशी चीनची भूमिका होती. सीमाप्रश्न काही काळासाठी बाजूला ठेवता येईल मात्र तो कायमचा भिजत ठेवणे भारताला मान्य नव्हते. भारत व चीन मध्ये अस्तित्वात असलेली प्रत्यक्ष नियंत्रण रेषा Line of Actual Control (LAC) हीच आंतरराष्ट्रीय सीमारेषा मानावी असा एक प्रस्ताव देखील चीनचे जेष्ठ नेते डेंग शियोपिंग यांच्याकडून ऑक्टोबर १९८२ मध्ये आला होता. मात्र, भारत हा सीमाप्रश्नाच्या सोडवणुकीवर ठाम होता. दोन्ही देशांनी सातत्याने सीमाप्रश्न सोडवण्यासाठी चर्चेच्या फेऱ्या सुरु ठेवल्यास हा वाद सुटू शकतो अशी भारताची भूमिका होती.

भारत आणि चीन यांच्यात विविध पातळीवर चर्चा होऊन देखील द्विपक्षीय संबंधात खूप म्हणावी अशी प्रगती झाली नाही. भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी आणि चीनचे पंतप्रधान झाओ झियांग यांची मेक्सिको येथे ऑक्टोबर १९८१ मध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत भेट झाली. विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, कला

आणि क्रीडा या क्षेत्रातील परस्पर सहकार्याचा विस्तार करण्यावर १९८३ मध्ये दोन्ही देशांचे एकमत झाले. भारत आणि चीन यांच्यातील चर्चेच्या फेऱ्या सुरूच राहिल्या आणि पुढे १९८८ मध्ये तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी चीनचा दौरा केला. सन १९५४ मध्ये तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंच्या चीन दौऱ्यानंतर जवळपास ३४ वर्षांनंतर चीनचा अधिकृत दौरा करणारे पंतप्रधान राजीव गांधी हे ठरले.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

१. चीनच्या शीर्ष नेतृत्वाने ............ च्या तत्त्वांना भारतासोबतच्या संबंधाचा पाया म्हणून मान्यता दिली होती.

अ) अहिंसा ब) वसुधैव कुटुंबकम क) अपरिग्रह ड) पंचशील

२. ............ या देशासोबत भारताचे युद्ध सुरु असताना चीनने भारताची कुरापत काढण्याचा प्रयत्न केला.

अ) नेपाळ ब) बांगलादेश क) पाकिस्तान ड) अफगाणिस्तान

३. चीनद्वारे बांधल्या जाणाऱ्या ............ महामार्गाला भारताचा विरोध होता.

अ) लेह ब) काराकोरम क) गिलगीट ड) ल्हासा

४. जोड्या जुळवून योग्य पर्याय निवडा.

| गट १ | गट २ |
|---|---|
| १. नाथू ला | अ. चीनमधील भारताचे राजदूत |
| २. अटलबिहारी वाजपेयी | ब. सीमेवरील खिंड |
| ३. के. आर. नारायण | क. चीनला भेट देणारे परराष्ट्र मंत्री |
| ४. हुआ ग्वोफेंग | ड. चीनचे पंतप्रधान |

अ) १-ड, २-अ, ३-ब, ४- क ब) १-क, २-ड, ३-ब, ४- अ

क) १-ब, २- क, ३-अ, ४-ड ड) १-अ, २-ड, ३-क, ४- ब

५. खालील विधानांच्या संदर्भात योग्य पर्याय निवडा.

विधान १ – सीमाप्रश्न सोडविण्यास भारताने प्राथमिकता दिली होती.

विधान २ – भारतावर हल्ला केला म्हणून चीनने पाकिस्तानवर टीका केली.

अ) विधान १ हे सत्य / योग्य आणि विधान २ हे असत्य / अयोग्य

ब) विधान २ हे सत्य / योग्य आणि विधान १ हे असत्य / अयोग्य

क) दोन्ही विधाने सत्य / योग्य

ड) दोन्ही विधाने असत्य / अयोग्य

## २.२.४ पाकिस्तान

**पृष्ठभूमी :** भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये भौगोलिक, सांस्कृतिक, भाषिक आणि आर्थिक बाबतीत बरेचसे साम्य असले, तरीही अनेक ऐतिहासिक आणि राजकीय घटनांमुळे त्यांचे संबंध सातत्याने तणावपूर्ण आणि जटील बनले आहेत. सन १९४७ मध्ये भारताची फाळणी आणि त्यादरम्यान झालेला हिंसाचार, जम्मू आणि काश्मीर झालेला संघर्ष आणि दोन राष्ट्रांमध्ये झालेली युद्धे आणि असंख्य लष्करी चकमकी यांनी भारत-पाकिस्तान संबंधांना आकार दिला आहे. स्वातंत्र्य मिळतानाच झालेली भारताची फाळणी ही जगाने आतापर्यंत अनुभवलेल्या सर्वात मोठ्या मानवी स्थलांतरांपैकी एक होती. फाळणी दरम्यान झालेल्या हिंसाचारात दोन्ही बाजूचे निष्पाप पुरुष, स्त्रिया आणि बालके मृत्यमुखी पडले. भारत हे धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक राष्ट्र बनले तर पाकिस्तान हे धर्माधारित राष्ट्र बनले. भारत आणि पाकिस्तानमध्ये जम्मू आणि काश्मीर हा संघर्षाचा मुद्दा राहिल्याने भारत-पाकिस्तान पहिले युद्ध हे जम्मू-काश्मीरवरून झाले होते. नव्याने तयार केलेल्या पाकिस्तानी सैन्याच्या मदतीने सशस्त्र पाकिस्तानी घूसखोरांनी ऑक्टोबर १९४७ मध्ये जम्मू आणि काश्मीरवर आक्रमण केले. जम्मू आणि काश्मीरचे राजे महाराजा हरी सिंह यांना अंतर्गत बंड तसेच बाह्य आक्रमणाचा सामना करावा लागला, त्यांनी भारतीय सशस्त्र सैन्याच्या मदतीची विनंती केली. राजा हरीसिंग यांनी भारतात जम्मू-काश्मीरचे विलीनीकरण करण्याचे मान्य केले. त्यांनी आपले संरक्षण, दळणवळण आणि परराष्ट्र व्यवहार यांचे नियंत्रण भारत सरकारकडे सोपवले. भारताने तातडीने आपले सैन्य जम्मू-काश्मीरच्या संरक्षणासाठी पाठवून पाकिस्तानचे आक्रमण थोपवले. सन १९४८ उत्तरार्धापर्यंत लढाई सुरु राहिली. जानेवारी १९४९ रोजी संयुक्त राष्ट्रसंघात जम्मू आणि काश्मीरचा मुद्दा उपस्थित झाल्यानंतर युद्धविराम घोषित करण्यात येऊन परिस्थिती 'जैसे थे' ठेवण्यात आली. पाकिस्तानने या आक्रमणातून बळकावलेला प्रदेश पाकव्याप्त काश्मीरच्या स्वरुपात अनधिकृतपणे पाकिस्तानच्या ताब्यात राहिला. तर, भारताने मुक्त केलेला प्रदेश भारतातील जम्मू आणि काश्मीर या राज्याच्या स्वरुपात अस्तित्वात आहे.

सन १९६५ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात दुसऱ्यांदा युद्ध झाले. या युद्धात भारताची सरशी होऊन लाहोर पर्यंतचा प्रदेश भारताने आपल्या ताब्यात घेतला. सोव्हिएत युनियनने भारत आणि पाकिस्तान यांच्यात मध्यस्थी करून ताश्कंद येथे शांतता करार घडवून आणला. ताश्कंद करार करतेवेळी भारताचे पंतप्रधान असलेले लालबहादूर शास्त्री यांचे ताश्कंद मुक्कामीच निधन झाले. लाल बहादूर शास्त्री यांच्या मृत्युनंतर काळजीवाहू पंतप्रधान म्हणून जबाबदारी स्वीकारणाऱ्या गुलझारी लाल नंदा यांनी तात्काळ जाहीर केले की, भारत सरकार ताश्कंद करारातील घोषणांवर ठाम असून कराराची परिपूर्ण आणि प्रामणिकपणे अंमलबजावणी करेल. मात्र, पाकिस्तानमध्ये ताश्कंद करार म्हणजे भारताच्या मागण्या आणि सोव्हिएत युनियनच्या दबावांपुढे पाकिस्तानची शरणागती म्हणून प्रचंड टीका झाली. जोपर्यंत शांततेचे मार्ग खुले आहेत तोपर्यंत सैन्य शक्तीचा अवलंब करू नये असा ताश्कंद कराराचा अर्थ होता. तथापि, भारत आणि पाकिस्तान यांच्यातील परस्पर संबंध सुधारण्यासाठी कोणतीही ठोस पाऊले दोन्ही बाजूंकडून उचलण्यात आली नाहीत. पाकिस्तानामध्ये तर भारत विरोधी अपप्रचार वाढविण्यात आला. झुल्फिकार अली भुट्टो यांनी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्षाला धार्मिक रंग देण्याचा प्रयत्न केला. ताश्कंद कराराची अंमलबजावणीबाबत

भारताने प्रामाणिक प्रयत्न केले. पाकिस्तानच्या प्रदेशातून सैन्य मागे घेणे, युद्ध कैद्यांना मुक्त करणे इत्यादी तरतुदी अंमलात आणल्या गेल्या. पण, दोन्ही देशांमध्ये मैत्री, सहकार्य आणि परस्पर समजूतदारपणा यांच्यासाठी केलेले प्रयत्न अयशस्वी ठरले. काश्मीर बळकावून घेणे हे पाकिस्तानचे एकमेव उद्दिष्ट असल्यामुळे पाकिस्तानकडून आगळीक सातत्याने सुरूच राहिली. अमेरिकेकडून पाकिस्तानला लष्करी मदत मिळत होतीच पण ताश्कंद करारानंतर सोव्हिएत युनियन कडून देखील पाकिस्तानला आर्थिक व लष्करी सहाय्य मिळू लागले. पाकिस्तानने १९६६-६९ या काळात सोव्हिएत युनियनशी जवळीक वाढविण्याचा जोरदार प्रयत्न केला. पाकिस्तानला आपल्याकडून सहाय्य मिळाले तर पाकिस्तान पाश्चात्य राष्ट्रांपासून दूर जाईल व भारत - पाकिस्तान यांच्या संबंधातील तणाव देखील कमी होईल असा सोव्हिएत युनियनला वाटत होते. पण, काश्मीरवर आपल्या मनाप्रमाणे तोडगा निघाल्याशिवाय शांतता प्रस्थापित होणार नाही असा पाकिस्तानचा दृष्टीकोन होता.

काश्मीर प्रश्नासोबतच आणखी काही मुद्दे हे भारत-पाकिस्तान तणावाचे कारण ठरले. पहिले म्हणजे, पाकव्याप्त काश्मीरमधील गिलगीट ते चीन मधील सीनकिआंग दरम्यान रस्ता बांधणीसाठी पाकिस्तानने चीनशी करार केला. हा अत्यंत शत्रूभावी व बेकायदेशीर करार होता कारण ज्या भूभागातून हा मार्ग जाणार होता तो भूभाग भारताचा असून बेकायदेशीरपणे पाकिस्तानच्या नियंत्रणात होता. दुसरा मुद्दा, पाकिस्तान सातत्याने अमेरिका, सोव्हिएत युनियन आणि चीन यांच्या मदतीने काश्मीरचा तोडगा स्वत:च्या पद्धतीने काढण्यासाठी भारतावर दबाब आणत होता. तिसरा मुद्दा, गंगा नदीच्या पाणीवाटपावरून पाकिस्तानशी असलेला वाद होता. भारताद्वारे गंगा नदीच्या पाण्याचा वापर आणि भारताकडून गंगा नदीवर बांधण्यात येणारा फरक्का बंधारा याला पाकिस्तानचा विरोध होता. या बंधाऱ्यामुळे पूर्व पाकिस्तानचा प्रदेश हा कोरडा पडून निर्जन होऊन जाईल असा पाकिस्तानचा दावा होता.

पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी भारतातर्फे युद्ध टाळण्यासाठी करार करण्याचा प्रस्ताव पाकिस्तानचे लष्करशाह अयुब खान यांना दिला होता. अयुब खान यांनी भारताचा या प्रस्तावाला नकार दिला. ईशान्य भारतातील मिझो व नागा बंडखोरांना पाकिस्तानकडून मिळणारे सहाय्य उघड करणारी कागदपत्रे व छायाचित्रे भारताने जगासमोर आणली. दरम्यानच्या काळात पाकिस्तानने अमेरिकेकडून शस्त्रास्त्रांची अतिरिक्त साठा प्राप्त केला. भारत-पाकिस्तान परस्पर संबंधांनी तळाची पातळी सन १९७१ मध्ये गाठली. पूर्व पाकिस्तानमधील अंतर्गत अस्वस्थतेने गृहयुद्धाचे स्वरूप धारण केले. पूर्व पाकिस्तानातील गृहयुद्धामुळे लाखों निर्वासितांचे लोंढे भारतात येऊ लागले. प्रचंड संख्येने आलेल्या निर्वासितांची सोय लावताना भारताच्या अर्थव्यवस्थेवर मोठा भार पडला तसेच भारताच्या अंतर्गत कायदा सुव्यवस्थेवर ताण पडला. गुंतागुंतीच्या आणि तणावपूर्ण परिस्थितीचे पर्यावसान १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धात झाले. या युद्धात पाकिस्तानचा पराभव होऊन स्वतंत्र राष्ट्र म्हणून 'बांगलादेश' अस्तित्वात आला.

**पूर्व पाकिस्तान समस्या आणि १९७१ चे भारत-पाकिस्तान युद्धः** पूर्व पाकिस्तानातील गृहयुद्ध आणि बांगलादेशचा उदय हा घटनाक्रम भारत-पाकिस्तान संबंधातील सर्वाधिक ताण-तणावाचा काळ मानला गेला आहे. या घटनाक्रमाची पार्श्वभूमी मूलत: पाकिस्तानची अंतर्गत बाब होती, परंतु त्याचे परिणाम भारत-पाक

संबंधांसाठी महत्त्वपूर्ण ठरले. सन १९४७ मध्ये भारताची फाळणी झाली तेव्हा पाकिस्तानची निर्मिती ही धर्माधारित होती. फाळणीपूर्व भारताच्या पश्चिमेकडील तसेच पूर्वेकडील मुस्लीम बहुसंख्य असलेल्या प्रदेशांना एकत्र करून पाकिस्तान हा नवीन देश स्थापन झाला. पूर्वेकडील भाग हा पूर्वीच्या बंगाल प्रांतातून वेगळा करून तयार करण्यात आला ज्याला 'पूर्व पाकिस्तान' म्हणून ओळखण्यात येत होते. पाकिस्तानच्या दोन्ही भागांमध्ये सुमारे १२०० मैलांचे अंतर होते, जो संपूर्णपणे भारताचा भूभाग होता. पाकिस्तानची मागणी मुख्यत: उत्तर व पश्चिम भारतातील उच्चवर्गीय मुस्लिमांनी केली होती. फाळणी नंतर अस्तित्वात आलेल्या पाकिस्तानमधील पूर्व पाकिस्तान व पश्चिम पाकिस्तान यांच्यात भौगोलिक व सांस्कृतिक फरक मोठ्याप्रमाणात होता. पूर्व पाकिस्तानची लोकसंख्या जास्त असून देखील पाकिस्तानच्या सत्ताकारणावर पश्चिम पाकिस्तानमधील पक्षांचा वरचष्मा होता. पूर्व पाकिस्तानमध्ये प्रभाव असणाऱ्या शेख मुजीबुर रहमान यांच्या अवामी पक्षाने डिसेंबर १९७० मध्ये झालेल्या पाकिस्तान नॅशनल असेंब्लीच्या निवडणुकीत ३०० पैकी १६० जागा जिंकल्या. तरी देखील अवामी लीगचे नेते शेख मुजीबुर रहमान यांना पाकिस्तानचे पंतप्रधानपद नाकारण्यात आले. हा मुद्दा पूर्व पाकिस्तान मधील असंतोषाच्या उद्रेकाचे कारण ठरला. मार्च १९६९ मध्ये अयुब खान यांच्या जागी याह्या खान हे लष्करशाह म्हणून सत्तेवर आले. याह्या खान आणि पाकिस्तान पीपल्स पार्टीचे नेते झुल्फिकार अली भुट्टो यांनी लोकांचा आवाज आणि निवड चिरडण्याचा निर्णय घेतला. लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या नेतृत्वाला शासन करण्याचा अधिकार नाकारणे हे पाकिस्तानमधील गृहयुद्धाचे कारण बनले आणि त्याचे विभाजन झाले.

पाकिस्तानी सैन्याने पूर्व पाकिस्तानातील बंगाली भाषिक जनतेवर, स्त्रियांवर, विचारवंतांवर, राजकीय कार्यकर्त्यांवर प्रचंड अत्याचार केला. पाकिस्तानी सैन्याने पूर्व पाकिस्तानमध्ये मोठ्याप्रमाणात नरसंहार घडवून आणला. पूर्व पाकिस्तानातील या अत्याचारांमुळे भयभीत झालेले लोक भारतातील पश्चिम बंगाल, आसाम व ईशान्य भारतातील इतर राज्यांमध्ये आश्रयाला येऊ लागले. भारताने या निर्वासितांसाठी छावण्या उभ्या केलेल्या जिथे त्यांना आश्रय घेता आला. मात्र, या जवळपास १ कोटी निर्वासितांची व्यवस्था लावण्यासाठी भारतावर मोठा आर्थिक भार पडत होता. भारताने आंतरराष्ट्रीय समुदायाला वारंवार निर्वासितांच्या सहाय्यासाठी आर्थिक व वस्तूंची मदत पुरवण्याची वारंवार विनंती केली. भारताचे तत्कालीन परराष्ट्र मंत्री स्वर्ण सिंग यांनी अनेक देशांच्या प्रतिनिधींची भेट घेऊन यासाठी प्रत्यक्ष विनंती केली. मात्र, आंतरराष्ट्रीय समुदायाकडून पुरेसा प्रतिसाद भारताला मिळाला नाही. पूर्व पाकिस्तान मधील परिस्थिती सुधारली नाही तर भारताची आर्थिक परिस्थिती निर्वासितांच्या आगमनामुळे कोलमडेल तसेच कायदा व सुव्यवस्थेचा देखील गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता होती. परिणामी, पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी मार्च १९७१ मध्ये पूर्व पाकिस्तानच्या अंतर्गत संघर्षात बंगाली भाषिकांच्या बाजूने हस्तक्षेप करण्याचा निर्णय घेतला. भारताच्या 'रॉ' या गुप्तचर संस्थेने निर्वासितांच्या छावणीतील तरुणांना सैन्य प्रशिक्षण देवून 'मुक्ती वाहिनी' या पूर्व पाकिस्तानमधील लढाऊ संघटनेत भरती करण्यास सुरुवात केली. पूर्व पाकिस्तानच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या बंगाली भाषकांची लढाऊ संघटना असलेल्या 'मुक्ती वाहिनी' ला भारताने सर्वोपरी मदत देण्याचे धोरण स्वीकारले. एप्रिल १९७१ मध्ये शेख मुजीबुर रहमान यांच्या 'अवामी लीग' पक्षाने पूर्व पाकिस्तानला स्वतंत्र

'बांगलादेश' म्हणून जाहीर केले. एप्रिल १९७१ मध्येच पाकिस्तान विरोधात युद्ध करण्याचा भारताचा निर्णय झाला होता. जुलै मध्ये भारताने युद्धाची योजना अंतिम केली. ऑगस्ट १९७१ मध्ये भारताने सोव्हियत युनियनशी मैत्री व सहकार्याचा करार केला. या करारामुळे युद्ध झाल्यास आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताला सोव्हिएत युनियनचा पाठींबा मिळण्याचा मार्ग खुला झाला. दरम्यानच्या काळात पाकिस्तानात भारतविरोधी वातावरणाला तेथील सत्ताधाऱ्यांनी खतपाणी घालून द्वेष वाढीस लावला. भारत-पाकिस्तान यांच्यातील तणाव नोव्हेंबर १९७१ पर्यंत सीमेवरील चकमकीपर्यंत मर्यादित होता. मात्र तणावपूर्ण परिस्थिती वाढून ३ डिसेंबर १९७१ मध्ये पाकिस्तानने भारतावर आक्रमण केले. डिसेंबरमध्ये सैन्यप्रमुख जनरल सॅम माणेकशॉ यांच्या नेतृत्वाखालील भारतीय सैन्याची युद्ध सज्जता पूर्ण झालेली होती. भारताच्या पश्चिम आणि पूर्व सीमेवर युद्धाला तोंड फुटले. पश्चिम सीमेवरील आक्रमणाला भारताने जोरदार प्रत्युत्तर दिले. पूर्व सीमेवरील पूर्व पाकिस्तानमध्ये भारतीय सैन्याने व मुक्ती वाहिनीने जोरदार मुसंडी मारून ठिकठिकाणी पाकिस्तानी सैन्याचा जोरदार पराभव केला.

आंतरराष्ट्रीय पातळीवर सोव्हिएत युनियनच्या पाठींब्यामुळे अमेरिका व चीन यांच्याकडून पाकिस्तानच्या बाजूने होणारा संभाव्य हस्तक्षेपांवर मर्यादा आल्या. अमेरिकेने भारतावर दबाब टाकण्यासाठी आपले सातवे आरमार बंगालच्या उपसागरात आणले त्याला प्रत्युत्तर म्हणून सोव्हिएत युनियनने आपले आरमार बंगालच्या उपसागराकडे रवाना केले. परिणामी, अमेरिकेच्या दबाव तंत्राला पायबंद घातला गेला. भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांकडून जमिनीवरील सैन्यदलांसोबतच वायू दल आणि नौदल यांचा देखील या युद्धात वापर करण्यात आला. भारताने पश्चिम सीमेवर आणि पूर्व सीमेवर जोरदार आघाडी घेऊन पश्चिम पाकिस्तानचा मोठा प्रदेश आणि संपूर्ण पूर्व पाकिस्तान आपल्या नियंत्रणात आणला. पश्चिम पाकिस्तानातील कराची बंदर आणि पूर्व पाकिस्तानची नाकेबंदी करण्यात भारतीय नौदलाला यश आले. परिणामी, पूर्व पाकिस्तानातील सैन्याला पश्चिम पाकिस्तानातून होणारा रसद पुरवठा थांबला. भारतीय सैन्यासमोर निभाव न लागल्याने पूर्व पाकिस्तानातील पाकिस्तानी सैन्याने शरणागती पत्करली. जवळपास ९० हजार पाकिस्तानी सैनिक भारताचे युद्ध कैदी झाले. पाकिस्तानने १६ डिसेंबर १९७१ मध्ये पाकिस्तानचे पूर्व पाकिस्तानमधील सैन्यप्रमुख लेफ्टनंट जनरल ए. ए. के. नियाझी यांनी पूर्व सीमेवरील भारतीय सैन्याचे नेतृत्व करणाऱ्या लेफ्टनंट जनरल जगजित सिंग अरोरा यांच्याकडे शरणागती पत्करल्यानंतर १७ डिसेंबर १९७१ रोजी अधिकृतपणे दोन्ही देशांमधील युद्ध थांबले.

**शिमला करार:** भारत - पाकिस्तान यांच्यातील १९७१ चे युद्ध थांबल्यानंतर ०२ जुलै १९७२ रोजी हिमाचल प्रदेश येथील शिमला येथे भारत व पाकिस्तान यांनी दोन्ही देशांदरम्यान शांतता राखण्यासाठी करार केला. १९७१ च्या युद्धानंतरची परिस्थिती आणि दोन्ही देशांच्या भविष्यातील परस्पर संबंधांना दिशा देण्याच्या उद्देशाने केलेला हा करार 'शिमला करार' म्हणून ओळखला जातो. भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी आणि पाकिस्तानचे राष्ट्रपती झुल्फिकार अली भुट्टो यांनी करारावर आपापल्या राष्ट्रांच्यावतीने स्वाक्षरी केली. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्ष आणि मतभेद समाप्त करून दोन्ही देशांतील परस्पर संबंध विकसित करणे हा या कराराचा मूळ हेतू होता. शिमला कराराद्वारे भविष्यात भारत आणि पाकिस्तान

यांच्यातील परस्पर संबंधासाठी व तडजोडींसाठी दिशादर्शक ठरतील अशी तत्त्वे स्वीकारण्यात आली. १९७१ युद्धानंतर भारताच्या ताब्यात आलेला पाकिस्तानचा भूप्रदेशाचे हस्तांतर, बांगलादेशाला पाकिस्तानने मान्यता देणे आणि भारताकडील पाकिस्तानी युद्धबंदींचे हस्तांतर या संदर्भातील उपाययोजना या कराराच्या माध्यमातून करण्यात आल्या.

शिमला कराराद्वारे दोन्ही देशांनी पुढील बाबी मान्य केल्या:-

१. संयुक्त राष्ट्र संघाच्या सनदेत दिलेली तत्त्वे ही भारत-पाकिस्तान परस्पर संबंधाची मार्गदर्शक तत्त्वे राहतील.

२. भारत-पाकिस्तान या दोन्ही देशांनी परस्परांमधील वादग्रस्त मुद्दे हे शांततेच्या व चर्चेच्या माध्यमातून सोडवावेत हे तत्त्व दोन्ही देशांनी या कराराच्या माध्यमातून मान्य केले.

३. दोन्ही देशांतील वादग्रस्त मुद्दे हे दोन्ही देशांदरम्यान द्विपक्षीय चर्चेतूनच सोडविण्यात येतील.

४. १९७१ युद्धानंतर भारत-पाकिस्तान मधील नियंत्रण रेषा [Line of Control (LOC)] 'जैसे थे' ठेवावी. तसेच दोन्ही देशांनी परस्पर सहमतीशिवाय, एकतर्फीपणे व बेकायदेशीरपणे त्यात कोणताही बदल करू नये.

५. दोन्ही देशांनी एकमेकांचे सार्वभौमत्त्व व प्रादेशिक अखंडता यांचा आदर करून एकमेकांच्या अंतर्गतबाबींमध्ये हस्तक्षेप करू नये.

६. दोन्ही देशांनी एकमेकांविरुद्ध सैन्य बळाचा वापर करू नये.

७. दोन्ही देशांतील परस्पर संपर्क सुधारण्यासाठी दळणवळण, तारायंत्रे, टपाल सेवा इत्यादी पूर्वी प्रमाणे चालू करण्यात याव्यात.

८. दोन्ही देशांतील नागरिकांना दोन्ही देशात प्रवास करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

९. दोन्ही राष्ट्रांमध्ये व्यापार आणि आर्थिक सहकार्य वाढीसाठी शक्य तितके प्रयत्न करणे.

१०. दोन्ही देशांतील विज्ञान, तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीस प्रोत्साहन देणे.

शिमला करार हा भारत आणि पाकिस्तान या दोन राष्ट्रातील संघर्षाची परिस्थिती संपवून शांतता व सहकार्याच्या दिशेने मार्गक्रमणाच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रयत्न होता. पाकिस्तानच्या कैदेत असलेल्या बांगलादेशाचे नेते शेख मुजीबुर रहमान यांची सुटका, जवळपास ९० हजार पाकिस्तानी युद्धकैद्यांचे हस्तांतरण आणि पाकिस्तान कडून बांगलादेशाला स्वतंत्र राष्ट्र म्हणून मान्यता मिळविण्याकामी शिमला करार महत्त्वाचा ठरला. दोन्ही देशातील शत्रुत्वाची भावना, पाकिस्तानमधील भारतविरोधी अपप्रचार, पाकिस्तानमध्ये झुल्फिकार अली भुट्टोंना पदच्युत करून जनरल झिया उल हक यांची लष्करशाही यांच्या परिणामस्वरूप शिमला करार खूप परिणामकारक ठरला नाही. पाकिस्तानने सातत्याने काश्मीरचा प्रश्न अंतरराष्ट्रीय पातळीवर मांडला. कोणत्यातरी शक्तिशाली देशाने विशेषत: अमेरिकेने यात मध्यस्थी अथवा हस्तक्षेप करावा अशा पद्धतीने प्रयत्न केले. पाकिस्तानचे अशाप्रकारचे प्रयत्न हे शिमला करारातील द्विपक्षीय चर्चेच्या कलमाचे

उल्लंघन होते. पाकिस्तानने नंतरच्या काळात काश्मीरमध्ये दहशतवादी कारवायाकरून अशांतता व अस्थिरता माजविण्याचा प्रयत्न केला. पाकिस्तानचा या कारवायादेखील शिमला कराराचे उल्लंघन होते. शिमला करार अशारितीने अपयशी दिसत असला तरी भारत-पाकिस्तान यांच्यातील वाद हे द्विपक्षीय चर्चेद्वारे सोडवले जातील ही शिमला करारातील भूमिका भारताने सातत्याने मांडली व अनेक प्रसंगांमध्ये ती अधिकृतपणे घेतली. द्विपक्षीय चर्चेतून वादग्रस्त प्रश्न सोडविण्याच्या शिमला करारातील कलमाला व त्याला अनुसरून असलेल्या भारताच्या भूमिकेला जागतिक पातळीवर मोठ्याप्रमाणात समर्थन मिळाले.

**शिमला करारानंतर भारत – पाकिस्तान संबंध :** शिमला करारानंतर काही काळानंतर मे १९७४ मध्ये भारताने राजस्थानच्या वाळवंटात पोखरण येथे अणुचाचणी केली. भारताने शांततापूर्णरित्या अणुशक्तीचा वापर करण्यासाठी ही अणुचाचणी केल्याचे स्पष्ट केले. भारताने अणुबॉम्बची चाचणी केलेली नव्हती तरीही ही अणुचाचणी भारताला अणुबॉम्ब तयार करता येऊ शकते हे दर्शविणारी घटना होती. परिणामी, भारताच्या या अणुचाचणीमुळे पाकिस्तानला मोठा हादरा बसला. झुल्फिकार अली भुट्टो यांनी अणुचाचणी केल्याबद्दल भारतावर टीका केली. अणुशक्तीचा शांततापूर्णरित्या वापर करणे हाच भारताचा अणुचाचणी मागील उद्देश असून अण्वस्त्रेधारी राष्ट्रांनी आपली अण्वस्त्रे नष्ट करावीत ही भारताची भूमिका असल्याचे मत भारताने आंतरराष्ट्रीय समुदायासमोर मांडले.

सन १९७७ मध्ये पाकिस्तानचे लष्करप्रमुख झिया उल हक यांनी लष्करी उठाव करून झुल्फिकार अली भुट्टो यांची सत्ता उलथून टाकली. झुल्फिकार अली भुट्टो आणि त्यांच्या मंत्रीमंडळाला अटक करण्यात आली. स्वत: पाकिस्तानचे सत्ताधीश बनून झिया उल हक यांनी पाकिस्तानात लष्करशाही स्थापन केली. काही महिन्यातच झुल्फिकार अली भुट्टो यांना वादग्रस्त ठरलेल्या एका खून खटल्यात दोषी ठरवून फाशी देण्यात आली. पाकिस्तानातील झिया उल हक यांची लष्करशाही ही १९८८ मध्ये त्यांचा अपघाती मृत्यू होईपर्यंत चालू राहिली. सन १९७७ मध्ये मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली जनता पक्षाचे सरकार भारतात सत्तेवर आले होते. मोरारजी देसाई सरकारने भारताच्या शेजारी राष्ट्रांशी विशेषत: पाकिस्तानशी संबंध सुधारण्यासाठी प्रयत्न केले. दोन्ही देशांकडून संबंध सुधारण्याबाबत उत्सुकता दर्शवून सकारात्मक संकेत देण्यात आले. तत्कालीन परराष्ट्र मंत्री अटल बिहारी वाजपेयी यांनी १९७८ मध्ये पाकिस्तानला भेट देऊन संबंध सुधारण्याच्या दिशेने पाऊल टाकले. सन १९८० मध्ये इंदिरा गांधी भारतात पुन्हा पंतप्रधान बनल्या त्यांच्या व पंतप्रधान राजीव गांधी (कार्यकाळ १९८४-८९) यांच्या कार्यकाळात दोन्ही देशातील तणावपूर्ण संबंध सुधारण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. मात्र, जनरल झिया उल हक यांनी संबंध सुधारतील अशी विश्वासार्हता निर्माण होऊ दिली नाही. याउलट, पंजाबमधील अतिरेकी कारवायांना पाकिस्तानकडून खतपाणी घालून भारतामध्ये अस्थैर्य आणि अशांतता माजविण्याचा प्रयत्न करण्यात आला. पंजाबमधील दहशतवादी कारवायांमुळे हजारो लोकांचे प्राण गेले तसेच भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांची हत्या करण्यात आली. पाकिस्तानने नंतरच्या काळात काश्मीरमध्ये देखील अशा प्रकारे दहशतवादी कारवाया करत भारताविरुद्ध छुपेयुद्ध आरंभले.

सन १९६७ –१९८४ या काळातील भारत व पाकिस्तान यांच्यातील संबंध फक्त तणावाचे नसून शत्रुत्वाचे होते. भारताने पाकिस्तानबाबत धोरण आखताना आपल्या शेजारच्या राष्ट्राशी शांतता राखण्यावर भर दिला होता. मात्र, पाकिस्तानच्या कारवाया आणि तेथील जटील अंतर्गत परिस्थिती याचा भारतावर गंभीर परिणाम होत असल्याने भारताला पाकिस्तानबाबत कडक धोरण राबवावे लागले. शिमला करारात काही बाबींवर स्पष्टपणे ठरल्या असल्यातरी पाकिस्तानने काश्मीर प्रश्नी आपला हेका न सोडल्याने संबंध सुधारणे अशक्य बनले. पाकिस्तानात लोकशाही ऐवजी झिया उल हक यांची लष्करशाही आल्याने भारताने प्रयत्न करून देखील पाकिस्तानसोबत संबंध सुधारणे शक्य झाले नाही.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ४**

१. भारताकडून गंगा नदीवर बांधण्यात येणारा ............ बंधारा याला पाकिस्तानचा विरोध होता.

अ) फरक्का   ब) भाक्रा   क) दुर्गापूर   ड) पंचेत

२. ............ देशातून येणाऱ्या निर्वासितांचा मोठा बोजा भारतावर पडला.

अ) नेपाळ   ब) बांगलादेश   क) भूतान   ड) अफगाणिस्तान

३. मे १९७४ मध्ये भारताने राजस्थानच्या वाळवंटात येथे ............ अणुचाचणी केली.

अ) जोधपुर   ब) बिकानेर   क) कच्छ   ड) पोखरण

४. जोड्या जुळवून योग्य पर्याय निवडा.

| गट १ | गट २ |
|---|---|
| १. याह्या खान | अ. शिमला करार |
| २. झुल्फिकार अली भुट्टो | ब. पूर्व पाकिस्तानचे नेते |
| ३. मुजीबुर रहमान | क. पाकिस्तानी सैन्य अधिकारी |
| ४. ए. ए. के. नियाझी | ड. पाकिस्तानचे लष्करशाह |

अ) १–ड, २–अ, ३–ब, ४– क   ब) १–क, २–ड, ३–ब, ४– अ

क) १–ब, २– क, ३–अ, ४–ड   ड) १–अ, २–ड, ३–क, ४– ब

५. खालील विधानांच्या संदर्भात योग्य पर्याय निवडा.

विधान १ – पूर्व पाकिस्तानमधील नरसंहारात पाकिस्तानी सैन्याची कोणतीही भूमिका नव्हती.

विधान २ – झुल्फिकार अली भुट्टो यांना खून खटल्यात दोषी ठरवून फाशी देण्यात आली.

अ) विधान १ हे सत्य / योग्य आणि विधान २ हे असत्य / अयोग्य

ब) विधान २ हे सत्य / योग्य आणि विधान १ हे असत्य / अयोग्य

क) दोन्ही विधाने सत्य / योग्य

ड) दोन्ही विधाने असत्य / अयोग्य

## २.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

**वॉशिंग्टन-पेकिंग-पिंडी संबंध :** अमेरिका (वॉशिंग्टन), पाकिस्तान (रावलपिंडी) आणि चीन (बीजिंग) यांची भारत व सोव्हिएत युनियन विरुद्ध एकजूट.

**अण्वस्त्र प्रसारबंदी करार** Non-Proliferation Treaty (NPT) : अण्वस्त्रांचा प्रसार टाळणे व अणुशक्तीच्या शांततामय वापराबाबतचा आंतरराष्ट्रीय करार.

**ओपेक** The Organization of the Petroleum Exporting Countries (OPEC) : पेट्रोलियम पदार्थांचे उत्पादन व निर्यात करणाऱ्या देशांची जागतिक पातळीवरील संघटना

## २.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १

१. ब) रशिया　२. अ) आर्यभट्ट　३. क) मोरारजी देसाई

४. क) १-ब, २- क, ३-अ, ४-ड　५. क) दोन्ही विधाने सत्य / योग्य

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - २

१. ड) राष्ट्राध्यक्ष जॉन्सन　२. अ) अन्नधान्य　३. क) नौदल

४. ब) १-क, २-ड, ३-ब, ४- अ　५. ड) दोन्ही विधाने असत्य /अयोग्य

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ३

१. ड) पंचशील　२. क) पाकिस्तान　३. ब) काराकोरम

४. क) १-ब, २- क, ३-अ, ४-ड

५. अ) विधान १ हे सत्य / योग्य आणि विधान २ हे असत्य / अयोग्य

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ४

१. अ) फरक्का　२. ब) बांगलादेश　३. ड) पोखरण

४. अ) १-ड, २-अ, ३-ब, ४- क

५. ब) विधान २ हे सत्य / योग्य आणि विधान १ हे असत्य / अयोग्य

## २.५ सारांश:

सन १९६७ ते १९८४ या काळातील भारताचे परराष्ट्र धोरण हे शीतयुद्धाची जागतिक परिस्थिती आणि भारताच्या शेजारी राष्ट्रांशी भारताचे संबंध या दोन बाबींवर आधारित राहिले. अलिप्ततावादी भूमिका घेऊन देखील भारताने सोव्हिएत युनियनशी आपले मैत्री व सहकार्याचे संबंध विकसित करण्यासाठी सातत्याने प्रयत्न

केले. इंदिरा गांधी यांच्या कार्यकिर्दीत भारताने सोव्हिएत युनियनशी १९७१ मध्ये केलेला सहकार्य करार हा जागतिक राजकारणाच्या दृष्टीने देखील मैलाचा दगड ठरला.

संयुक्त राज्य अमेरिकेशी भारताचे संबंध घनिष्ठ ही नव्हते अथवा खूप शत्रूभावी नव्हते. भारत आणि अमेरिका यांच्यात समान हितसंबंध नव्हते इतकेच नव्हे तर काही हितसंबंध एकमेकांच्या आड येत असल्याने भारत- अमेरिका संबंधात याकाळात वारंवार तणावाची स्थिती निर्माण होत होती. १९६५ चे भारत-पाकिस्तान युद्धाप्रमाणेच १९७१ च्या बांगलादेश युद्धात देखील अमेरिकेने पाकिस्तानला मदत करण्याच्या हेतूने आंतरराष्ट्रीय पातळीवर राजनैतिक पातळीवर भारताला एकटे पडण्याचा प्रयत्न केला. इतकेच नव्हे तर भारतावर दबाव आणण्यासाठी अमेरिकेने आपले शक्तिशाली सातवे आरमार हे बंगालच्या उपसागरात पाठवून दिले. मात्र, भारत-सोव्हिएत युनियन मैत्री करारामुळे अमेरिकेला याहून अधिक हस्तक्षेप करता आला नाही.

चीन आणि भारत यांच्यात १९६२ च्या युद्धामुळे निर्माण झालेला तणाव आणि दोन्ही देशातील सीमावाद यांच्यामुळे चीन वभारत यांचे संबंध सुधारण्याची प्रक्रिया दीर्घकाळ संथ गतीने सुरु राहिली. चीनने सीमावादाचा मुद्दा वगळून चर्चा करण्याचा आग्रह धरला या उलट भारताने सीमाप्रश्नाला प्राथमिकता दिली. पाकिस्तानला चीन कडून सातत्याने दिला जाणारा पाठींबा हा देखील तणावाचे एक कारण होता. भारत-चीनमध्ये सातत्याने चर्चेच्या फेऱ्या घडून येऊन परस्पर संबंध पूर्वरत करण्यासाठी दोन्ही देशांकडून प्रयत्न करण्यात आले.

पाकिस्तानसोबत भारताचे याकाळातील संबंध हे तणावपूर्ण आणि शत्रुत्वाचे राहिले. भारताने पाकिस्तानच्या कारवायांना व त्याने पूर्व पाकिस्तान मध्ये आरंभलेल्या अत्याचारांना बांगलादेश युद्धात पाकिस्तानचा सपशेल पराभव करून चोख प्रत्युत्तर दिले. भारत-पाकिस्तान यांच्यातील शिमला करार हा याकाळातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा आहे. शिमला करारामुळे काश्मीरचा प्रश्न द्विपक्षीय चर्चेच्या माध्यमातूनच सोडवावा या भारताच्या मागणीला पाकिस्तानला मान्यता द्यावी लागली. याकाळातील पाकिस्तान सोबतचे भारताचे धोरण हे सर्व पातळीवर अत्यंत यशस्वी ठरल्याचे दिसून येते.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

प्रश्न १. टिपा लिहा.

१. भारत- सोव्हिएत युनियन मैत्री व सहकार्य करार १९७१

२. बांगलादेश युद्धासंदर्भात अमेरिकेची भूमिका

३. सीमाप्रश्नावर चीनची भूमिका

४. शिमला करार

प्रश्न २. थोडक्यात उत्तरे लिहा.

१. भारत आणि सोव्हियत युनियन यांच्यातील व्यापारी संबंधांचे स्वरूप स्पष्ट करा.

२. रिचर्डस निक्सन यांच्या कार्यकीर्दीतील भारत-अमेरिका संबंधांचे वर्णन करा.

३. अटलबिहारी वाजपेयी यांच्या चीन भेटीचे महत्त्व विशद करा.

४. इंदिरागांधी यांच्या काळातील भारताच्या पाकिस्तान धोरणाचे वर्णन करा.

प्रश्न ३. सविस्तर उत्तरे लिहा.

१. भारत व रशिया यांच्यातील मैत्री व सहकार्य स्पष्ट करा.

२. बांगलादेश युद्धाच्या विशेष संदर्भाने भारत – पाकिस्तान संबंधाचे विश्लेषण करा.

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

V. N. Khanna, Foreign Policy of India ,Vikas Publishing House Pvt.Limited, India, 2012

N. Jayapalan, Foreign Policy of India, Atlantic Publishers & Dist, 2001

Jayantanuja Bandyopadhyaya, The Making of India's Foreign Policy, Allied Publishers, 2003

हेमंत महाजन, भारताचे परराष्ट्र धोरण : काल, आज आणि उद्या, नचिकेत प्रकाशन, नागपूर

शैलेंद्र देवळाणकर, आंतरराष्ट्रीय संबंध, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१०

शैलेंद्र देवळाणकर, भारताचे परराष्ट्र धोरण: नवीन प्रवाह, सकाळ प्रकाशन, पुणे २०१८

❑❑❑

# घटक ३
# भारताचे परराष्ट्रीय धोरण : १९८४ ते २०१४

**अनुक्रमणिका**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.४ स्वयं- अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास

- १९८४ ते २०१४ याकाळातील भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या मर्यादा आणि जमेच्या बाजू लक्षात येतील.
- भारताचे पंतप्रधान राजीव गांधी ते पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या काळातील परराष्ट्र धोरण समजून घेता येईल.
- भारताच्या रशिया संबंधीच्या परराष्ट्र धोरणातील महत्त्वपूर्ण मुद्द्यांना स्पष्ट करता येईल.
- भारत आणि अमेरिका यांच्या एकमेकांकडून असलेल्या अपेक्षा आणि भूमिका लक्षात घेता येतील.
- भारताचे चीनसोबत असलेले परराष्ट्र धोरण समजून लक्षात येईल.
- भारत आणि पाकिस्तानमधील वाद-विवादाच्या मुद्यांना समजून घेता येईल.

## ३.१ प्रास्ताविक

भारताचे परराष्ट्र धोरण हे ब्रिटीश काळात भारताच्या बाबतीत संरक्षणात्मक पण इंग्लंडच्या बाबतीत मात्र कायमस्वरूपी लाभदायक कसे राहील हे बघण्यात आले. भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत पंडित नेहरू यांनी अनुकूल पाऊले ही ब्रिटीश काळातच १९३२ साली टाकली असल्याचे आपल्याला दिसून येते.

पंचशील तत्त्वे स्वीकारून त्यांनी जागतिक गटबाजीत सहभागी न होता मैत्रीपूर्ण संबंधांवर भर दिला. वासाहतिक राष्ट्रांच्या स्वातंत्र्यासाठी आपली बांधीलकी जाहीर केली. सुरवातीच्या काळात भारताच्या नेतृत्वाखाली सुरु झालेल्या अलिप्त राष्ट्र चळवळीने जागतिक पटलावर एकप्रकारचे समतोल राखण्याचे काम केले असले तरी चीनच्या १९६२ आणि पाकिस्तानच्या १९६४ या वर्षी झालेल्या भारतावरील आक्रमणाने भारताला आपली ध्येय-धोरणे आणि आंतराष्ट्रीय संबंधात मोठा बदल करण्याची गरज भासली. सीमा संरक्षणाकडे दुर्लक्ष करून अंतर्गत विकासाकडे असलेले भारताचे लक्ष आता जागतिक कुटनीती आणि संबंध यांच्यावर केंद्रित झालेले दिसते. भारताने घेतलेली पोखरणच्या वाळवंटातील अणुस्फोट चाचणी ही भारताला जागतिक राजकारणात एक सक्षम राष्ट्र म्हणून मान्यता देणारी ठरली.

१९८४ ते २०१४ याकाळात भारताचे रशिया, अमेरिका, चीन आणि पाकिस्तान यांच्यासोबत असलेले संबंध हे भारताकडून मैत्रीचा हात स्वत:हून पुढे करणारे असले तरी या सर्वच देशांशी भारताच्या संबंधात सदैव मैत्री वा शत्रुत्व कायमस्वरूपी आलेले दिसत नाही. रशियाची आणि भारताची मैत्री भारताच्या साम्यवादी आस्थेबरोबर आपल्याला उदयाला आलेली दिसून येते. भारताच्या सुरक्षाविषयक साधनात भारतातील रशियाची भागीदारी सर्वाधिक असलेली दिसते. पण सोव्हिएत रशियाच्या विघटनानंतर काही काळ भारताच्या आणि रशियाच्या संबंधात दुरावा निर्माण झाला होता अर्थात तो ब्लादिमीर पुतीन यांच्या काळात दूर होऊन अनेक क्षेत्रात भारताची आणि रशिया युती भारताच्या विकासात महत्त्वपूर्ण ठरलेली दिसते. अमेरिकेचे धोरण सुरवातीला पाकिस्तानला शस्त्र आणि आर्थिक पुरवठा करण्याचे राहिलेले आहे. यामुळे अमेरिकेचे धोरण हे भारताने सुरक्षाविषयक प्रश्नातच गुंतून राहून आशिया खंडात कधीही बलशाली होऊ न देण्याचे राहिलेले होते. पण याही अडचणींवर मात करून भारत आर्थिकदृष्ट्या सक्षम बनल्यावर चीनच्या आशिया खंडातील मगरमिठीला ढिले करण्यासाठी अमेरिकेने आपली भारताबद्दलची नीती बदलली आहे. याउलट भारत कशाप्रकारे सर्वच क्षेत्रात सक्षम बनेल याची काळजी अमेरिकेने एकविसाव्या शतकात घेतलेली दिसून येते. चीनचे पाकला शस्त्र आणि आर्थिक सुविधा देणे भारताच्या अडचणी वाढविणारे ठरले आहे. तर चीनचे तिबेट, तैवान आणि सीमावाद हे प्रश्न पुन्हा पुन्हा उकरून काढणे भारताच्या स्थिरतेला घातक ठरत आलेले आहे. पाकिस्तानचे दहशतवादाला कायम खतपाणी घालणे हे भारत-पाकिस्तानच्या मैत्रीसंबंधात वेळोवेळी कटुता निर्माण करणारे ठरले. यामुळे या दोन्ही राष्ट्रात अनेकवेळा वर्षानुवर्षे सुसंवाद खंडित झालेला दिसतो. भारताच्या जागतिक पटलावर शक्तीशाली राष्ट्र बनण्याच्या काळातील १९८४ ते २०१४ हा महत्त्वपूर्ण टप्पा राहिलेला आहे. म्हणून याकाळातील भारताचे रशिया, अमेरिका, चीन आणि पाकिस्तान यांच्यासोबत असलेले परराष्ट्र धोरण जाणून घेणे महत्त्वाचे ठरते.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ भारत-सोव्हिएत रशिया संबंध

आंतरराष्ट्रीय स्तरावर भारत ज्या ज्या वेळी अडचणीत आला आहे त्या त्या वेळी भारताच्या पाठीशी ठामपणे उभे राहणारे एकमेव राष्ट्र म्हणजे रशिया हे होय. भारताच्या अनेक विकासकामांना पाठींबा देणारा,

सहकार्य करणारा हा भारतासाठी महत्त्वपूर्ण देश आहे. माजी पंतप्रधान पंडीत नेहरू व इंदिरा गांधी यांनी या साम्यवादी राष्ट्राशी नेहमी मैत्रीपूर्ण संबंध कायम ठेवले. जरी भारताने अलिप्त राष्ट्रांचा गट निर्माण करण्यात पुढाकार घेतला असला तरी भारताचे झुकते माप हे नेहमी सोव्हिएत रशियाचे बाजूने राहिलेले आहे. अंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक प्रश्नांच्या बाबतीत भारत व रशियात एकमत झाल्याने दोन्ही राष्ट्रांचे संबंध हे अधिकच दृढ झालेले दिसून येतात.

**सर्वात मोठा भागीदार देश :**

१९८० च्या दशकात दोन्ही देशांचे सहकार्य आणि सामजस्य इतके व्यवस्थित सुरु होते की, आर्थिक व संरक्षण या दोन्ही बाबतीत रशिया हा देश भारताचा क्रमांक एकचा भागीदार देश ठरला. भारताची संरक्षण व्यवस्था सक्षम आणि मजबूत करण्यासाठी रशियाकडून भारताने युद्धसाहित्य, तंत्रज्ञान आणि सामुग्री यांचे मोठया प्रमाणात आयातीकरण सुरु केले. एकूण आकडेवारीत बघितले तर याक्षेत्रातील रशियाचा भारतातील वाटा ९० टक्क्यावर पोहचला होता. अर्थात अन्य क्षेत्रात देखील रशिया हळूहळू गुंतवणूक करीत होता. भारतातील अनेक मोठेमोठे प्रकल्प यामुळे पार पडले. येथल्या अवकाश संशोधनास गती प्राप्त झाली. भारतातील तंत्रज्ञानाने देखील उंची गाठण्याकडे पाऊले टाकली.

**भारत रशियातील करार :**

रशियाचे राष्ट्राध्यक्ष मिखाइल गोर्बाचेव्ह यांनी १९८६ मधील नोव्हेंबर महिन्यात भारतास भेट दिली यावेळी दोन्ही देशातील मैत्रीपूर्ण संबंध पुन्हा एकदा मजबूत करण्याबरोबर आर्थिक, व्यापारी आणि संरक्षण क्षेत्रात सहकार्य वाढविण्यासंबंधी विविध करार करण्यात आले. दोन्ही देशातील या कराराने जागतिक पटलावर भारताचा प्रभाव वाढला. या दौऱ्याचे महत्त्व मोठे होते कारण गोर्बाचेव्ह यांच्यासोबत १०० प्रतिनिधींची मोठी टीमच भारतात आली होती. त्यांचा त्यावेळी मुख्य उद्देश आशिया ते युरोप अण्वस्त्र निशस्त्रीकरण कार्यक्रम राबविणे हा होता. यावेळी त्यांनी भारतीय संसदेला देखील संबोधित केले. या भेटीला भारतात आणि रशियात मोठी प्रसिद्धी मिळाली. पत्रकारांशी वार्तालाप करताना राजीव गांधी यांनी गोर्बाचेव्ह आल्यामुळे आपल्या जुना मित्र भेटल्याचा आनंद व्यक्त केला होता. यावेळी दिल्ली घोषणापत्र जाहीर करण्यात आले. ज्यात दोन्ही देशांनी अण्वस्त्रमुक्त आणि अहिंसामय जग निर्माण करण्याची वचनबद्धता जाहीर केली होती. खरेतर राजीव गांधी पंतप्रधान बनण्याच्या अगोदर रशियाच्या दौऱ्यावर गेले होते. पुढे भारताचे पंतप्रधान राजीव गांधी यांनी १९८८ मध्ये अण्वस्त्रमुक्त जगासाठी जो कृती आराखडा तयार केला त्याला रशियाने आपला पूर्ण पाठींबा दिला. गोर्बाचेव्ह हे जेव्हा १९८८ मध्ये भारत दौऱ्यावर आले तेव्हा अंतराळ, इन्फ्रास्ट्रक्चर आणि अन्य क्षेत्रातील सहकार्याबद्दल आश्वस्त करण्यात आले.

गोर्बाचेव्ह यांच्या कार्यकाळातच रशियाने भारताला टी-७२ टँक आणि अन्य प्रमुख शस्त्रे ही भारतास उपलब्ध करून दिली. १९८० च्या दशकाच्या मध्यापासून, सोव्हिएत युनियनकडून भारताला पूर्वीपेक्षा अधिक आधुनिक आणि अत्याधुनिक शस्त्रे पुरवली जाऊ लागली होती. त्यावेळी राजीव गांधींच्या मंत्रिमंडळात

संरक्षण मंत्री असलेले पी.व्ही नरसिंहराव हे लष्करी शिष्टमंडळासह मॉस्कोला पोहोचले होते आणि अनेक करार त्यांनी यावेळी रशियासोबत केले होते.

**युएसएसआरचे विघटन :**

सोव्हिएत प्रजासत्ताक संघराज्याची स्थापना ही १९२२ साली करण्यात आली होती. हे संघराज्य म्हणजे सोव्हिएत युनियन हे १९९१ मध्ये संपुष्टात आले. दुसरी क्रांती ही मिखाईल गोब्राचेव्ह यांच्या नेतृत्वात पूर्ण करण्यात आली. ते केंद्रीय समितीत कृषी विभागाचे प्रमुख होते. १९७८ साली त्यांनी अहवाल दिला की, सामुदायिक शेती सोडून दिल्याशिवाय पर्याय नाही. मोठे प्रमाणात धान्य हे कोठारांच्या अभावी वाया जात असल्याचे त्यांनी दाखविले होते. ते १९८५ साली कम्युनिष्ट पक्षाचे सरचिटणीस झाले.

१९८० च्या दशकात दूरगामी परिणाम करणारी घटना घडत होती. कारण सोव्हिएत युनियन संघाचे समाजवादी आर्थिक मॉडेल हे झपाटयाने अस्थिर होऊ लागले होते. त्यांच्या आर्थिक संरचनेलाच तडा गेल्याने तेथील शेती व अन्य उत्पादनात मोठे गंभीर संकट निर्माण झाले होते यामुळे उपभोग्य व खाद्याच्या वस्तूंमध्ये मोठी घसरण झाली होती. १८८५ मध्ये मिखाईल गोर्बाचेव्ह हे सोव्हिएत संघाचे महासचिव बनल्यावर त्यांनी लोकांच्या मुलभूत गरजा पूर्ण करणे हे देशाच्या संरक्षणव्यवस्थेपेक्षा जास्त महत्त्वाचे मानले होते. त्यांच्या नेतृत्वात सोव्हिएत संघाने ग्लासनोस्ट(खुले धोरण) व पेरेस्त्रोइका धोरणाचे आवाहन केले होते. १९९१ या वर्षी सोविएत संघाचे विघटन झाले.

**सोव्हिएत युनियनच्या विघटनाचा परिणाम :**

विघटनानंतर रशिया हा एक स्वतंत्र देश बनला. अर्थात विघटनाचा मोठा फटका भारताला देखील बसला. यामुळे १९७१ साली भारत आणि युएसएसआर सोबत झालेला तह समाप्त होऊन रुपया-रुबल व्यापार देखील संपला. दोन आठवड्याच्यावर देखील पुरणार नाही एवढेच परकीय चलन भारताकडे शिल्लक राहिल्यावर भारताने आपले ४७ टन सोने हे बँक ऑफ इंग्लंडमध्ये गहाण ठेऊन ४०५ दशलक्ष अमेरिकी डॉलर परकीय कर्ज घेऊन या बिकट परिस्थितीतून स्वत:ला बाहेर काढले होते. हळू हळू परिस्थिती बदलताना १९९० च्या दशकात भारत आणि रशिया यांचे संबंध पूर्वीसारखे घनिष्ट मैत्रीचे राहिले नव्हते. भारताच्या बाबतीत त्यांचे धोरण आता पूर्णपणे व्यावहारिक बनले होते. याबाबतीत त्यांचे परराष्ट्र मंत्रालय जागरूक राहिलेले दिसते. दोन्ही देशांनी आता नवीन मैत्री आणि करारावर सह्या केल्या.

**विघटनानंतरची वाटचाल**

रशियाच्या विघटनानंतर दोन्ही देशात जानेवारी १९९३ मध्ये शांती, मैत्री आणि सहकार्यासाठी एक नवीन करार करण्यात आला. १९९४ मध्ये दोन्ही देशात द्विपक्षीय सैन्य तंत्रज्ञानाच्या सामंजस्य करारावर हस्ताक्षर करण्यात आले. तर सन २००० मध्ये दोन्ही देशात रणनीती संदर्भात सहकार्याची सुरुवात करण्यात आली. भारत आणि रशियाचे संबंधांचा मुख्य आधार हा सुरक्षासंबंधी सामंजस्य राहिला आहे. जगातील कोणत्याही देशाशी एवढे खोलवर सामंजस्य संरक्षण क्षेत्राच्या बाबतीत राहिलेले नाही. ब्राम्होस क्षेपणास्त्र

दोन्ही देशांच्या सहकार्यांतून तयार झालेले आहे. आर्थिक क्षेत्रातील सहकार्य वाढविण्याचे प्रत्यत्न सुरु आहेत. दोन्ही देशांमधील व्यापारवाढीची आशा पुढील काळात भारताला आहे. भारताला तेल आणि गॅसची निर्यात रशियाकडून होत आली आहे. अवकाश संशोधनाचे भारत रशियाचे सहकार्य ५० वर्षाच्या पुढे गेले आहे. भारतातील रॉकेट निर्माणाच्या बाबतीत रशियाकडून क्रोयोजेनिक तंत्रज्ञान भारताला पुरविण्यात आले आहे.

**नवीन करार :**

रशिया आणि भारतातील नवीन करारानुसार जुन्या नियमांना बदलून कर्ज व रुपया यांच्या विनिमय दरासंबंधी वादग्रस्त मुद्दे सोडविण्याचा प्रयत्न केला. सैन्य क्षेत्रात सहकार्य करण्याविषयी निश्चित करण्यात आले. रशियाकडून भारताला क्रायोजेनिक रॉकेट इंजिन पुरविण्याबद्दल पुष्टी केली.

**भारतीय पंतप्रधानांचे रशिया दौरे :**

भारताचे पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहराव यांनी रशियाचा दौरा केला. आक्रमक राष्ट्रवाद, धार्मिक कट्टरता या संकटाच्या बाबतीत बहुजातीय राज्यांच्या बाबतीत रक्षणाच्या सहकार्यावर सह्या करण्यात आल्या. भारताचे पंतप्रधान एच.डी. देवेगौडा यांनी रशियाचा १९९७ मध्ये दौरा केला. यावेळी सैन्य सहकार्याविषयीच्या करारावर सह्या करण्यात आल्या.

**येवेगनी यांची भारत भेट :**

रशियाचे प्रधानमंत्री येवेगनी प्रीमिकोव यांनी डिसेंबर १९९८ मध्ये भारताला भेट दिली तेव्हा दोन्ही देशाच्या विकासाबद्दलच्या सामंजस्य करारावर सह्या करण्यात आल्या. या अंतर्गत २०१० पर्यंत औद्योगिक विनिमय, वैज्ञानिक, तंत्रज्ञान, सैन्य क्षेत्रातील सहकार्याबद्दल प्रदीर्घ कार्यक्रम निश्चित करण्यात आला. खरेतर १९९८ हे वर्ष रशियाच्या बाबतीत भयानक अशा आर्थिक संकटाचे होते. ज्याला रुबल संकट किंवा रशियन फ्लू म्हणून देखील ओळख आहे.

**ब्लादिमीर पुतीन आणि भारत :**

पहिल्यांदा पुतीन यांनी २ ते ५ ऑक्टोबर २००० मध्ये भारताला भेट दिली तेव्हा या भेटीला फार उजाळा देण्यात आला नव्हता कारण भारत त्यावेळी अमेरिकेच्या बाजूला झुकलेला होता. पुतीन यांनी यावेळी भारत रशिया यांच्यात दहशतवाद, फुटीरतावाद, अंमली पदार्थ तस्करी याविरुद्ध एकत्र लढा देण्यावर जोर दिला होता. याबरोबर इंधन, उर्जा, माहिती तंत्रज्ञान, दळणवळण जलवाहतूक, हवाई वाहतूक, उद्योजकांचा सुलभ प्रवास आदी क्षेत्रातील सहकार्याबद्दल करार करण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि शांतता याबरोबर अण्वस्त्र यांचे संपूर्ण निशस्त्रीकरण यावर या मुद्यांवर दोन्ही देशांचे एकमत झाले. इतर अन्य देशांवर कारवाई केल्यास त्यात दुसरा देश सहभाग घेणार नाही हेही ठरले.

भारताच्या रशियाशी असलेल्या परराष्ट्रीय धोरणात एक नवीन अध्याय हा रशियाचे बलाढ्य असे नेते ब्लादिमीर पुतीन हे राष्ट्राध्यक्ष बनल्यावर सुरु झाला. सन २००१ मध्ये भारताचे तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी रशियाचा दौरा केला यावेळी अंतरराष्ट्रीय स्तरावरील आतंकवादावर असलेल्या

घोषणापत्रावर सह्या करण्यात आल्या. भारताचे पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी सन २००५ मध्ये रशियाच्या विजयाच्या ६० व्या वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने घेतलेल्या समारंभात सहभाग घेतला. तर रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन हे २००७ मध्ये भारताच्या स्वातंत्र्यदिनाच्या समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहिले होते. याबरोबर पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी ऑक्टोबर २०१३ मध्ये रशियाचा दौरा केला. यामागे त्यांची भूमिका ही आर्थिक व व्यापारी सहकार्य मिळविण्याबरोबर आशिया खंडातील भारताची भूमिका मजबूत करणे हे देखील आहे.

पश्चिमेकडील राष्ट्रांशी रशियाचे संबंध बिघडल्याने रशियाचे झुकते माप हे भारताचे बाजूने राहिले. भारताच्या आणि चीनच्या संबधात देखील हळूहळू सुधारणा होऊ लागली होती. ज्याप्रमाणे काश्मीरमध्ये भारत दहशतवादी कारवायांशी मुकाबला करीत होता. त्याचप्रमाणे रशियात चेचन्या यांचा उद्रेक झाला होता. दोन्ही बाजूला असंतोष माजविणाऱ्यांचे केंद्र हे पाकिस्तानात दिसते. यामुळे भारत व रशिया याबाबतीत एकमताने एकत्र आले. संरक्षण क्षेत्रात रशियाची भारताची बाबतीतली भूमिका महत्त्वपूर्ण ठरली.

रशियाचे अध्यक्ष ब्लादिमीर पुतीन यांनी सन २०१३ मध्ये जेव्हा भारताची भेट घेतली त्यावेळी संरक्षणाच्या बाबतीत महत्त्वाच्या करारावर दोन्ही देशांच्या सह्या झाल्या. ज्यात रशियाकडून ७१ लष्करी हेलिकॉप्टर पुरविणे व दुसरा करार हा एसयू-३० एमकेआय जातीच्या लढाऊ विमानांच्या तंत्रज्ञानाच्या हस्तांतरासंबंधी होता. याबरोबर विज्ञान व तंत्रज्ञानाबद्दल विशेष करार यावेळी अमलात आणण्यात आले होते. भारताने अणुचाचण्या घेतल्यावर अनेक देश हे जरी भारतावर आर्थिक बहिष्कार टाकत असले तरी रशिया हा मात्र भारताच्या बाजूने ठामपणे उभा राहिला होता. रशिया, भारत, चीन, ब्राझील, दक्षिण आफ्रिका यांच्यात आर्थिक व्यवहारांच्या बाबतीत ब्रिक्स ही संघटना निर्माण करण्यात आली. भारताच्या अणुउर्जा प्रकल्पांच्या विकासात रशियाचे सहकार्य फार मोठे आहे.

भारत आणि अमेरिकेच्या २१ व्या शतकातील वाढत्या जवळीकतेने दोन्ही देशांच्या संबंधात थोडीसी निष्क्रियता आली आहे. रशियाने देखील पाकिस्तानला शस्त्र विकण्यासंबंधी बंदीला २०१४ साली हटविले. रशियाचे चीनकडे झुकणे, दोन्ही देशात गॅसची पाईपलाईन टाकणे भारताची चिंता वाढविणारी गोष्ट आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न-१**

अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) पंचशील तत्वे स्वीकारून पंडित नेहरू यांनी जागतिक गटबाजीत सहभागी न होता कशावर भर दिला?

२) आर्थिक व संरक्षण या दोन्ही बाबतीत कोणता देश भारताचा क्रमांक एकचा भागीदार देश ठरला?

३) १९८५ साली कम्युनिष्ट पक्षाचे सरचिटणीस कोण झाले?

४) भारताने आपले ४७ टन सोने हे कोठे तारण ठेवले?

५) रशियाचे प्रधानमंत्री येवेगनी प्रीमिकोव यांनी कोणत्या वर्षी भारताला भेट दिली

ब) खालील वाक्यातील गाळलेले शब्द भरा.

१) भारतातील रॉकेट निर्माणाच्या बाबतीत रशियाकडून ........... तंत्रज्ञान भारताला पुरविण्यात आले आहे.

२) त्यांच्या नेतृत्वात सोव्हिएत संघाने ........... व पेरेस्त्रोइका धोरणाचे आवाहन केले होते.

३) सोविएत संघाचे विघटन ........... या वर्षी झाले.

४) भारताचे पंतप्रधान यांनी रशियाचा १९९७ मध्ये दौरा केला.

५) १९९८ हे वर्ष रशियाच्या बाबतीत भयानक अशा आर्थिक संकटाचे होते ज्याला ........... म्हणून देखील ओळख आहे.

### ३.२.२ भारत–अमेरिका संबंध

भारताच्या स्वातंत्र्यानंतर अमेरिकेच्या गटात सामील न होता भारताने घेतलेली अलिप्ततावादी भूमिका अमेरिकेला पटली नाही. यामुळे या महासत्तेने भारताचा शेजारी असलेला देश पाकिस्तानला अनेक दशके जवळ करून भरमसाठ पैसा व शस्त्रसाठा देखील पुरविला ज्याचा परिणाम पाकिस्तान हा भारतापेक्षा तुलनेने आणि क्षमतेने लहान असलेला देश नेहमी भारताविरुद्ध काश्मीर प्रश्नावरून कुरघोड्या करीत आला आहे. अर्थात भारताच्या आणि रशियाच्या मैत्रीमुळे देखील अमेरिका नेहमी सांशक राहिली आहे. याबरोबर पंडित नेहरू यांचे पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून समाजवादी अर्थव्यवस्थेकडे झुकणे चीनमधील कम्युनिस्ट पक्षाला मान्यता देणे, अमेरिकेकडून सयुंक्त राष्ट्राच्या सुरक्षा समितीत काश्मीरचा प्रश्न उचलून धरणे, भारताचे पोखरण मधील अणुस्फोट चाचणी घेणे ही देखील काही कारणे दोन्ही राष्ट्रांच्या दरम्यान तणावाची राहिलेली आहेत.

**राजीव गांधी यांचा काळ :**

जून १९८५ मध्ये राजीव गांधी यांनी अमेरिकेचा दौरा केला होता. भारताला यावेळी शस्त्र खरेदीची मदत अमेरिकेकडून हवी होती. अमेरिकेन काँग्रेस पुढे बोलताना राजीव गांधी यांनी ठामपणे अमेरिकेकडून शेजारील देशांना होत असलेल्या लष्करी मदतीबद्दल विरोध दाखविला. भारतातील दुष्काळी परिस्थितीच्या वेळी जागतिक बँकेकडून कर्ज मिळवून देण्यासाठी यावेळी अमेरिकेने भारताला सहकार्य केले, अन्नधान्याची मदत देखील केली. अमेरिका आणि भारत या दोन्ही देशात १९८४ ते १९८८ याकाळात तंत्रज्ञान हस्तांतरण करण्याबद्दल महत्त्वपूर्ण घडामोडी घडल्या. ज्यात लढाऊ विमाने, नौदलासाठी टर्बाईन इंजिन आणि अन्य बाबींचा पुरवठा अमेरिकेने भारतास केला.

**शीतयुद्धा नंतरचे संबंध :**

सोव्हिएत संघांच्या विघटनानंतर शीतयुद्धाचा अंत झाला. अमेरिकेला यामुळे जगात प्रतिस्पर्धी कोणी उरला नाही. या घटनेने व भारताने स्वीकारलेल्या आर्थिक उदारीकरणाच्या धोरणाने दोन्ही देशांच्या संबंधात

बदलाची आशा प्रज्वलित झाली. १९९२ ला भारत–अमेरिका यांच्या सयुंक्त नौदलांनी युद्धाअभ्यास केला. मे १९९४ मध्ये भारताचे पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहराव यांनी अमेरिकेचा दौरा केला. १९९५ मध्ये दोन्ही देशांच्या वाणिज्य सचिवांनी अनेक गोष्टींचा बाबींच्या सामंजस्य करारावर सह्या केल्या. अर्थात हे संबंध सुधारत असताना काही तणावपूर्ण बाबी देखील घडल्या जसे अमेरिकेने पाकला आधुनिक विमाने विकले तर भारतास सुपर कम्प्युटर विकण्यास नकार दिला. यामुळे भारताने स्वत:चा महासंगणक विजय भटकर यांच्या सहकार्याने निर्माण केला.

दोन्ही देशांच्या संबंधात पुन्हा एकदा कडवटपणा निर्माण झाला तो म्हणजे भारताने घेतलेल्या पाच अणुस्फोट चाचण्यांनी. यानंतर लगेचच अमेरिकेने भारतावर अनेक आर्थिक निर्बंध लादले. बिल क्लिंटन यांनी चीन यात्रेच्यावेळी भारताने घेतलेल्या चाचण्यांवर कडक शब्दात टीका केली. अणुबॉम्ब चाचणी पूर्णपणे त्यागण्यास भारताने नकार दिला तरी अमेरिकेला प्रतिदास देऊन भारताने अणुचाचण्यांच्या कार्यक्रमावर आंतरराष्ट्रीय पाहणीस परवानगी दिली. सन २००२ मध्ये एकूण १२३ सामंजस्य करारावर दोन्ही राष्ट्रात सह्या झाल्या. यामुळे भारतास शांततापूर्ण आण्विक कार्यक्रमास परवानगी मिळालेली दिसते. सन २००५ मध्ये भारत व सयुंक्त राज्य अमेरिका यांच्यात आण्विक सामंजस्य करार करण्यात आला. यामुळे दोन्ही राष्ट्रातील जुना तणाव कमी होण्यास मदत झाली. अणुसामुग्री आणि अन्य बाबी अमेरिकेकडून आणि त्यांच्या मित्रराष्ट्रांकडून खरेदी करण्यास सकारात्मक वातावरण तयार झाले.

सन २००९ मध्ये अमेरिकेकडून भारताला २.१ अब्ज अमेरिकी डॉलर्स किमतीचे P.8 पोसीडॉन सैनिकी विमान विकण्यात आले. सयुंक्त राष्ट्र परिषेदेत सदस्यत्व भारताला मिळावे म्हणून परराष्ट्र मंत्री हिलरी क्लिंटन व २०१० मध्ये राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी समर्थन केले.

१९९८ मध्ये अनेक प्रकारांच्या आर्थिक निर्बंधाना अमेरिकेकडून लादण्यात आले होते. हे सर्व २००१ मध्ये राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांच्या भारत यात्रेच्या वेळी हटविण्यात आले. नंतर भारताच्या वाढत्या शक्तीला अमेरिकेकडून स्वीकारले गेले. संबंध सुधारण्याचे धोरण लक्षपूर्वक राबविण्यात आले.

राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांच्याकडून अनेक प्रकारच्या बहुपक्षीय निर्यात नियंत्रण व्यवस्थांमध्ये भारताच्या सदस्यत्व बाबत समर्थन करण्यात आले.

**आर्थिक सहकार्य :**

याबाबतीत गती ही इ.स.२००० मध्ये मिळाली दोन्ही देशातील व्यापार हा ५.९ अब्ज डॉलरवरून २००० ने वाढून १४.३५ अरब डॉलर एवढा झाला. जो २००८ ला ४३.४ अरब डॉलरवर जाऊन पोहचला. आर्थिक धोरण व संरचनेत बदल व्हावा म्हणून एप्रिल २०१० मध्ये अर्थ खाते व अमेरिकेचे कोषागार यांच्यात नवीन आर्थिक भागीदारी सुरू झाली.

२००९ ला खाजगी व्यापार वाढविण्यासाठी दोन्ही देशात द्विपक्षीय सीईओ फोरम पुनर्जीवित करण्यात आला.

आर्थिक हितसंबंध दोन्ही देशांच्या संबंधांच्या सुधारणेत महत्त्पूर्ण ठरलेले दिसतात. दहशतवादाला आढा घालण्यासाठी व चीनी सामर्थ्याला रोखण्यासाठी अमेरिका व भारत या दोन्ही राष्ट्रांना एकमेकांची गरज आवश्यक बनली होती. शीतयुद्धाच्या नंतर दक्षिण आशियात अनेक समस्या ह्या झपाट्याने वाढत होत्या ज्या एक महासत्ता म्हणून अमेरिकेला रोखणे आवश्यक वाटत होते. अनेक देशांमधील दहशतवादाची समस्या भारत व पाकिस्तानचे अण्वस्त्रधारी राष्ट्रे म्हणून उदयाला येणे, चीनचा आर्थिक व लष्करी क्षेत्रातील एक मोठी शक्ती म्हणून झालेला उदय या सर्व बाबी अमेरिकेची डोकेदुखी वाढवीत होत्या. चीनला प्रतिशह देण्यासाठी भारताला मजबूत करणे अमेरिकेस महत्त्वपूर्ण वाटत होते. यादृष्टीने अमेरिकेने वाटचाल सुरु केली. भारताने युद्धासाठी नाहीतर एक उर्जास्त्रोत म्हणून अणुउर्जा महत्त्वाची असल्याचे महासत्तेला पटवून दिले. अणुउर्जा निर्माण करण्यासाठी लागणाऱ्या साधन सामुग्रीचा पुरवठा ज्या देशांच्याकडून होऊ शकतो त्यावर अमेरिकेचा प्रभाव आहे.

बराक ओबामा यांनी २०१० साली भारताची भेट घेतली त्यावेळी भारत-अमेरिकेत १२ अब्ज डॉलर्स किमतीचा करार करण्यात आला. यामुळे अमेरिकेत हजारो लोकांसाठी रोजगार निर्माण होणार आहे. सन २००१ नंतर अमेरिकेने जगातील दहशतवाद नेस्तनाबूत करण्यासाठी मोठे पाऊल उचलले ज्यात भारताशी सहकार्य करण्याचे धोरण ठेवले.

अमेरिकेचे उपाध्यक्ष जो बायडेन यांचा २०१२ मध्ये चार दिवसांचा भारत दौरा झाला ज्यात अमेरिकेच्या आशिया खंडाबाबत भारताच्या धोरणाबाबत परीक्षण करणे हा उद्देश होता. बराक ओबामा यांच्या दुसऱ्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात अफगाण भवितव्य व चीन सामर्थ्याचा विचार हा महत्त्वाचा ठरला. अफगाण मधून हळूहळू सैन्य काढून घेण्याचा अमेरिका विचार असताना आशिया खंडात सत्ता संतुलन बनविण्यासाठी भारताची भूमिका बायडेन यांना महत्त्वाची वाटते. अफगाण प्रश्नाबाबत त्यांना भारताच्या सहकार्याची मोठी अपेक्षा आहे.

१९१३ मध्ये सप्टेंबर महिन्यात अमेरिकेने काश्मीर प्रश्नाबाबत जी भूमिका जाहीर केली त्यानुसार अमेरिका शांतता टिकविण्यासाठी हस्तक्षेप करण्याची तयारी दर्शविते पण दोन्ही देशांची भूमिका येथे महत्त्पूर्ण ठरणार आहे. पाकिस्तान हे हस्तक्षेपाच्या बाजूने तर भारत मात्र नेहमी अमेरिकेच्या हस्तक्षेपाच्या विरुद्ध राहिलेला आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न-२**

अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) पंडित नेहरू यांचे पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून कशाकडे अधिक झुकले?

२) जून महिन्यात १९८५ मध्ये राजीव गांधी यांनी कोणत्या देशाचा दौरा केला?

३) भारतातील दुष्काळी परिस्थितीच्या वेळी कोणाकडून कर्ज घेण्यासाठी अमेरिकेने भारताला सहकार्य केले?

४) अमेरिकेने भारतास काय विकण्यास नकार दिला?

५) १९९४ मध्ये भारताचे पंतप्रधान यांनी अमेरिकेचा दौरा केला त्यांचे नाव काय?

ब) खालील वाक्यातील गाळलेले शब्द भरा.

१) भारताने स्वत:चा महासंगणक ............ यांच्या सहकार्याने निर्माण केला.

२) नौदलासाठी ............ आणि अन्य बाबींचा पुरवठा अमेरिकेने भारतास केला.

३) २००५ मध्ये भारत व सयुंक्त राज्य अमेरिका यांच्यात ............ करार करण्यात आला.

४) सन २००९ मध्ये अमेरिकेकडून भारताला २.१ अब्ज अमेरिकी डॉलर्स किमतीच्या P.8 पोसीडॉन ............विकण्यात आले.

५) २००१ मध्ये राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांच्या भारत यात्रेच्या वेळी ............ हटविण्यात आले.

६) ............यांनी २०१० साली भारताची भेट घेतली त्यावेळी भारत-अमेरिकेत १२ अब्ज डॉलर्स किमतीचा करार करण्यात आला.

### ३.२.३ भारत व चीन

भारताचा पारंपारिक शत्रू म्हणून जरी पाकिस्तान हा देश वागत असला तरी चीनने देखील या बाबतीत कोणती कसर बाकी ठेवली नाही. चीनची जागतिक पटलावर ओळख निर्माण करून देण्यात व चीनच्या साम्यवादी क्रांतीस मान्यता देण्यात भारताने पुढाकार घेतला असला तरी १९६२ युद्धात चीनने भारताचा मोठा भूभाग जिंकून भारताच्या मैत्रीपूर्ण संबंधावर पाणी फिरविले. यांनंतर चीनची भूमिका पाकिस्तानला नेहमी मजबूत करण्याची राहिली. ज्या धोरणाचा पाठपुरावा अमेरिकेसारखी महासत्ता आधीच करीत होती. दोन्ही देशातील सीमावाद हा १९६२ च्या युद्धानंतर खऱ्या अर्थाने ठळक होण्यास सुरवात झाली. चीनचे जागतिक शक्ती म्हणून उदय होताना त्याचा फटका मात्र भारताला मोठ्या प्रमाणात बसत होता.

**तिबेटचा प्रश्न :**

दलाई लामा यांचे भारतात शरण घेणे चीनला कधीच पटलेले नाही. भारताने चीकडून तिबेटवर मिळविलेल्या अनधिकृत अधिकाराचा विरोध केला नसला तरी चीनने मात्र हे उपकार विसरून भारतावर आक्रमण सत्र सुरू केले. दलाई लामा यांनी तरी याबाबतीत चर्चेचा प्रयत्न केला तरी चीन मात्र याबाबतीत दाद देत नाही. पंचसूत्री कार्यक्रमाच्या अंतर्गत दलाई लामा यांनी तिबेटचे केवळ अंतर्गत स्वातंत्र्य मागितले होते. तेही चीनने नाकारले व तिबेट हा अविभाज्य भाग असल्याचा दावा त्यांनी केला.

भारताचे पंतप्रधान राजीव गांधी हे चीन दौऱ्यावर गेले तेव्हाही त्यांनी चीनचा तिबेट हे अविभाज्य भाग असणे मान्य केले. तर १९९९ मध्ये चीनचे पंतप्रधान ला पींग यांनी भारताला भेट दिली होती. याकाळात तिबेटी लीकानी निदर्शने केली. सन २००० च्या मुलाखतीत दलाई लामा यांनी तिबेटच्या अंतर्गत स्वायत्ततेचा

पुनरुच्चार केला. त्यांना चीनी संस्कृतीचे आक्रमण नको होते. त्यांना बॉन ब्युन हा परंपरागत धर्म वाचवायचा होता. अर्थात चीनची भारताच्या सीमा भागावर असलेली वक्रदृष्टी दलाई लामा यांना नको आहे.

भारताचे पंतप्रधान वाजपेयी यांनी २००३ ला चीनच्या दौऱ्यात तिबेट चीनचा स्वायत्त देश असल्याचे मान्य केले. अर्थात चीनविरोधी निदर्शनाला भारताने बंदी घातली. भारताने तिबेटला सहानुभूती न दाखविता चीनच्या दबावापोटी वेळोवेळी सहानुभूती दर्शविली. जागतिक दबाव व भारताची ठाम भूमिका तिबेटला मिळाल्यास कदाचित हा प्रश्न कायमचा सुटूही शकतो.

**भारत–चीन सीमाप्रश्न :**

स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतर देखील भारत व चीन सीमाप्रश्न कळीचा मुद्दा दोन्ही देशात राहिलेला आहे. अरुणाचल प्रदेशात दोन्ही देशातील सीमारेषा ही मकॅमोहन रेषा म्हणून ओळखली जाते. १९७१ चे युध्द भारताने जिंकून आपली ताकद सिद्ध केली तरी चीनची कुरकुर कमी झालेली नाही. दोन्ही देशातला सीमाप्रश्न सोडविण्याच्या हेतूने भारताचे पंतप्रधान राजीव गांधी हे चीनला गेले होते. याविषयाला सोडविण्यासाठी १९८८ ला संयुक्त कार्यकारी गट स्थापन करण्यात आला. यांच्या दरवर्षी होणाऱ्या चर्चेतून हा प्रश्न मार्गी लागला नाही. कारण चीनचा यास असलेला विरोध १९९१ नंतर चीनचे भारताबद्दल असलेले धोरण थोडे बदलले. स्वत:च्या महासत्ता बनण्याच्या प्रयत्नात चीनला भारताची मदत हवी म्हणून चीनने या दिशेने स्वत: पाऊल पुढे टाकले. अध्यक्ष झियांग झोमीन भारत दौऱ्यावर आले. यावेळी दोन्ही देशात वाद सोडविण्यावर व संवाद साधण्यावर भर देण्यात आला.

सन १९९८ ला भारताने अणुचाचण्या घेतल्यावर चीनकडून सडकून टीका करण्यात आली. भारताने चीनवर पाकला व बंडखोरांना शस्त्रे पुरविले म्हणून भारताने चिंता व्यक्त केली. कारगिल युद्धात मात्र चीनने हस्तक्षेप टाळला. सन २००२ च्या पंतप्रधान वाजपेयींच्या चीन दौऱ्यात सिक्कीम भारताचा भाग असल्याचे चीनने मान्य केले.

भारत चीन सीमाप्रश्न चिघळू नये. म्हणून दोन्ही देशात अनेक चर्चेच्या फेऱ्या झाल्या आहेत. २०१२ पर्यंत ही संख्या १५ पर्यंत पोहचली होती. भारताची जागतिक पटलावर प्रतिमा उंचावल्याने व भारताची अर्थव्यवस्था ही स्वयंपूर्णतेकडे वाटचाल केल्याने भारत व चीन यांच्यातील संबंध सुधारण्यास वा चीनला भारताची दखल घेण्यास भाग पाडले. भारताच्या अणुस्फोट चाचण्यांनी खरेतर चीन गांगरला व नाराज झाला. पण भारताकडून यामागची भूमिका चीनला पटवून सांगितल्यावर चीनच्या भारताबद्दलच्या भूमिकेत बदल झाला. सन २००५ नंतर चीन सहकार्याच्या स्तरावर आले. २००६ मध्ये चीनी राष्ट्राध्यक्ष हू जिंताओ यांच्या भारतभेटीत अणुइंधन सहकार्याबद्दल बोलणी झाली.

**शेजारील राष्ट्रांशी चीनचे करार :**

चीनने पाकिस्तान, बांगलादेश, म्यानमार आणि श्रीलंका या देशांच्या बरोबर लष्करी करार केले. अंदमान आणि निकोबार जवळ कोको बेटावर आपले लक्ष वळविले आणि हा भाग टेहळणीखाली आणला.

या सर्व चीनच्या हालचालींनी एक गोष्ट दिसते ती म्हणजे त्यांना भारतावर लक्ष ठेऊन एक प्रकारचा दबाव आणायचा आहे. भारताच्या आजुबाजुकडील देशांत आपली ताकद वाढविण्याचा चीन प्रयत्न करू लागलेला आहे.

**चीनचे दळणवळणाचे जाळे :**

भारताच्या क्षेत्रात वेळोवेळी चीनने घुसखोरी करून भारताची डोकेदुखी वाढविली आहे. चीनने तवांग प्रदेशावर आपला दावा केला होता. पण अटल बिहारी वाजपेयी यांनी पंतप्रधान असताना जेव्हा तवांगला भेट दिली त्यावळी चीनने गळा काढला होता. अरूणाचल प्रदेश हा चीनचा भाग असल्याचा चीनने वेळोवेळी दावा केला आहे. या राज्याभोवती चीनने उभे केलेले रस्त्याचे जाळे दुर्लक्ष करण्यासारखे नाही. लडाखजवळ चीनने उभी केलेली रेल्वे व रस्त्यांची यंत्रणा भयंकर धोकादायक आहे. २०१० नंतर चीनने जागतिक महासत्ता म्हणून आपली महत्वाकांक्षा वेळोवेळी जाहीर केली आहे.

**भारत–चीन संबंध सुधारण्यासाठीचे प्रयत्न :**

डिसेंबर १९८८ ला राजीव गांधी यांनी चीनच्या यात्रेत पंचशील तत्वांच्या आधारे दोन्ही देशांच्या मैत्रीवर जोर दिला होता. विज्ञान, तंत्रज्ञान, विमान सुविधा, सांस्कृतिक आदान प्रदान करणे याविषयीच्या सामंजस्य करारावर सह्या करण्यात आल्या.

चीनचे प्रमुख ली पेंग यांनी डिसेंबर १९९१ मध्ये भारताचा प्रवास केला तर १९९२ मध्ये राष्ट्रपती वेंकटरामन यांनी चीनचा दौरा केला होता. २००५ मध्ये चीनला सार्कचा पर्यवेक्षक देश बनविण्यात आले होते. अन्य देश चीनला सार्कचा स्थायी सदस्य बनविण्याच्या बाजूने असले तरी भारताने मात्र यास विरोध केला होता. २००६ मध्ये दोन्ही देशांच्या नाथुला खिंडला व्यापारासाठी खुले करण्यात आले. ही खिंड १९६२ च्या युद्धानंतर पूर्णपणे वापरासाठी बंद करण्यात आली होती. २०१२ मध्ये दिल्लीत ब्रिक्स शिखर परिषद भरविण्यात आली. ज्यात हु जिंताओ यांनी पंतप्रधान मनमोहनसिंग सोबत भारत चीनच्या मैत्री संबंध व अन्य बाबींवर जोर दिला होता. भारत चीनच्या आर्थिक संबंधात देखील मोठी उलाढाल झाली. दोन्ही देशातील व्यापार हा सन २००० मध्ये ३ अब्ज अमेरिकी डॉलर एवढा होता. अमेरिकेला मागे टाकून २००८ मध्ये चीन भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार बनला. २०१२ मध्ये दोन्ही देशांचा व्यापार हा ७३.९ अब्ज अमेरिकी डॉलरवर गेला.

चीनचे २०१३ मध्ये राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडले गेलेले जिनपिंग यांनी मार्च २०१३ मध्ये भारतासोबत विविध क्षेत्रात सहकार्य वाढविण्यासाठी एक पंचसूत्री कार्यक्रम तयार केला होता. २०१३ मध्ये चीनचे पंतप्रधान ली कियांग यांनी पदभार घेतल्यानंतर पहिला विदेश दौरा हा भारतापासून सुरू केला. यातच भारताचे जागतिक पटलावर वाढलेले महत्त्व आपल्याला लक्षात येते. आशिया खंडातील घसरलेल्या चीनच्या प्रतिमेला सावरण्यासाठी भारताची गरज त्यांना आवश्यक वाटते यातच भारताचे यश लपले आहे.

२०१३ मध्ये चीनचे पंतप्रधान ली कियांग यांनी भारत दौरा केला तेव्हा काही महत्त्वाच्या बाबींवर करार आणि सामंजस्य करण्यात आले. दोन्ही देशांनी २०१३-१४ या वर्षाला सांस्कृतिक सद्‌भावना वर्ष म्हणून जाहीर केले. दोन्ही देशात नालंदा विद्यापीठाच्या विकासासाठी सामंजस्य करार करण्यात आला. दोन्ही देशांनी हात मिळविल्यावर संपूर्ण जग दखल घेत असल्याचे पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी २०१३ मध्ये भाष्य केले होते.

पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी ऑक्टोबर २०१३ मध्ये चीनचा दौरा केला. अर्थात पारंपारिक धोरणानुसार विविध क्षेत्रातील सहकार्य नीती स्वीकारण्याबरोबर आशिया खंडातील दोन्ही देशांची भूमिका यावरून दिसून येते. रशिया व चीनचे सदस्यत्व असलेल्या 'शांघाय सहकार्य संघटनेचे' निरीक्षकाचे पद भारताला देऊन एकप्रकारे तिन्ही देशांच्या वाढत्या शक्तीवर शिक्कामोर्तब करण्यात आले.

भारत आणि चीन यांचे १९८४ ते २०१४ पर्यंत असलेले संबंध पूर्वीसारखे एकतर्फी राहिले नाहीत. भारताने विविध क्षेत्रात केलेला विकास आणि आण्विक क्षेत्रातील दावेदारी यामुळे चीनला भारतास एक तुल्यबळ स्पर्धक आणि मित्र म्हणून स्वीकारावे लागले आहे. तिबेटचा प्रश्न, सीमावाद आणि शेजारील राष्ट्रांना चीनचा ताकद देण्याचा प्रश्न असला तरी आशियातील एक उगवती महासत्ता म्हणून भारताच्या अस्तित्वाला त्यांना नाकारता येणार नाही. अमेरिका आणि रशिया यांनी भारताच्या भूमिकेचे समर्थन करणे चीनला डोळेझाक करता येण्यासारखे नाही. यामुळे १९६२ च्या युद्धात चीनने भारताची केलेली गळचेपी आता त्यांना पुन्हा करता येणार नाही. यामुळे चीनला सहकार्य भावना ठेवूनच भारताशी परराष्ट्र धोरण आखावे लागणार आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न-३**

अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) कोणाचे भारतात शरण घेणे चीनला कधीच पटलेले नाही?

२) कोणत्या कार्यक्रमाच्या अंतर्गत दलाई लामा यांनी तिबेटचे केवळ अंतर्गत स्वातंत्र्य मागितले होते?

३) तिबेटला कोणता परंपरागत धर्म वाचवायचा आहे?

४) अरुणाचल प्रदेशात भारत-चीन या दोन्ही देशातील सीमारेषा ही कोणत्या नावाने ओळखली जाते?

५) दोन्ही देशातला सीमाप्रश्न सोडविण्याच्या हेतूने १९८८ मध्ये स्थापन केलेला गट कोणता?

ब) खालील वाक्यातील गाळलेले शब्द भरा.

१) २००२ च्या पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयींच्या चीन दौऱ्यात ........... भारताचा भाग असल्याचे चीनने मान्य केले.

२) १९९९ मध्ये चीनचे पंतप्रधान ............ यांनी भारताला भेट दिली होती.

३) २००६ मध्ये चीनी राष्ट्राध्यक्ष हू जिंताओ यांच्या भारतभेटीत ............च्या सहकार्याबद्दल बोलणी झाली.

४) अंदमान आणि निकोबार जवळ ............ आपले लक्ष वळविले आणि हा भाग टेहळणीखाली आणला.

५) ............हा चीनचा भाग असल्याचा चीनने वेळोवेळी दावा केला आहे.

६) २००६ मध्ये दोन्ही देशांच्या ............ व्यापारासाठी खुले करण्यात आले.

७) जिनपिंग यांनी मार्च २०१३ मध्ये भारतासोबत विविध क्षेत्रात सहकार्य वाढविण्यासाठी एक ............ तयार केला होता.

### ३.२.४ भारत आणि पाकिस्तान

कधी काळी भारत आणि पाकिस्तान हे अखंड होते का? असा प्रश्न दोन्ही देशातीलच नाहीतर जगातील कोणत्याही सर्वसामान्य माणसाला पडावा? इतके तणावपूर्ण संबंध दोन्ही देशात सतत राहिलेले दिसतात. दोन्ही देशाची समान राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, ऐतिहासिक पार्श्वभूमी असताना दोन्ही देशातील वैरभावना ही हा जुना गौरवशाली इतिहास धूसर करून टाकते. त्यातल्या त्यात भारत जरी वेळोवेळी मैत्रीपूर्ण भावना ठेवून आपला हात आधी पुढे करत आला तरी पाकिस्तान मात्र या मैत्रीत नेहमी काश्मीरच्या नावाने गळा काढून खंजीर खुपसत आला आहे. या दोन्ही देशातील चार युद्धांनी, पाकिस्तानच्या नेहमीच्या दहशतवादी कारवायांनी दोन्ही देशांचे संबंध कधीच कायमस्वरूपी मैत्रीपूर्ण राहिले नाहीत. यात पुन्हा अमेरिका आणि नंतरच्या काळात चीनचा अर्थ आणि शस्त्रपुरवठा पाकला चुका करण्यास प्रोत्साहित करतो हेही ऐतिहासिक सत्य आपल्याला नाकारता येत नाही.

**१९९० च्या दशकातील शांततेसाठी प्रयत्न :**

भारत आणि पाकिस्तान या दोन देशांच्यामधील समान धागे हे तणावापेक्षा लोकांमध्ये प्रेममय बाबींना जोडून ठेवण्याचे काम करतात. जे राजकारणाच्या व डावपेचांच्या पलीकडे आहे. या दशकात भारताच्या प्रत्येक पंतप्रधानांनी दोन्ही देशातील संबंध कसे सुधारतील हे बघितले याउलट पाकचा दृष्टीकोन हा राहिला. भारताकडून एकांगी का होईना इमानदार प्रयत्न करण्यात आला. पंतप्रधान इंद्रकुमार गुजराल यांनी दोन्ही देशातील लोकांनी एकमेकांच्या देशात प्रवास करण्यासाठी प्रोत्साहित केले. व्यापार वाढविण्यावर भर दिला.

**सियाचीन प्रश्न :**

भारत आणि पाकिस्तानमध्ये सियाचीन प्रश्नावरून अनेक बैठका याचर्चेसाठी झालेल्या आहेत. दोन्ही देशाचे ३ ते ४ हजारांचे सैन्य आणि तेवढाच मोठा खर्च या भागावर गस्तीसाठी होत असतो. १९७१ च्या युद्धांनंतर दोन्ही देशात नियंत्रण रेषेचे विभाजन हे झालेले असले तरी सियाचीन सीमा निश्चिती झालेली नाही.

येथून जवळच चीनचा प्रदेश देखील आहे. येथून नेब्रू नदी या प्रदेशातून वाहते. १९८४ मध्ये या प्रदेशावर पाकिस्तानने नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला. अर्थात १९८६ मध्ये ऑपरेशन मेघदूत राबवून भारताने हा प्रदेश पाकिस्तानी सैनिक आणि गिर्यारोहक यांच्याकडून खाली करून ताब्यात घेतला.

**पाकची ऑपरेशन टोपॅक योजना :**

१९७१ युद्धानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये शिमला करार करण्यात आला. अपेक्षा होती की एवढ्या मोठ्या प्रचंड पराभवानंतर पाकिस्तान हा शांततामय मार्ग निवडणार पण पाकची नीती नेहमी हा करार न पाळण्याची राहिली आहे. १९८८ मध्ये पाकिस्तानचे तत्कालीन अध्यक्ष जनरल झिया उल-हक्क यांनी ऑपरेशन टोपॅक ही योजना आखली होती. एकूण ३ टप्प्यात ही योजना अमलात आणण्यात येणार होती. ज्यानुसार पहिल्या टप्प्यात काश्मीरच्या नेत्यांना पाकला अनुकूल करून घेण्यात येऊन त्यांना भारताविरुद्ध भडकविणे, धार्मिक असंतोष तरुणांमध्ये निर्माण करणे,अतिरेकी तयार करणे, दंगली करणे, लडाख वेगळा करणे दुसऱ्या टप्प्यात भारताच्या महत्त्वाच्या ठिकाणांवर हल्ले करणे आणि शेवटच्या तिसऱ्या टप्प्यात काश्मीरची भारतापासून मुक्तता करणे हा उद्देश होता.

या योजनेनुसार प्रत्यक्ष कारवाई पाकने सुरू केली काश्मीर परिसरात भयंकर अशांतता निर्माण करणे सुरु केले येथील लष्कर-ए-तोयबा व अन्य स्थानिक दहशतवादी संघटना यांनी हाहाकार माजविला. पाकची गुप्तहेर संघटना आय.एस.आय यात मार्गदर्शन करीत होती. यासंबंधी अमेरिका व इंग्लंडला कळवून देखील पाकला दहशतवादी राष्ट्र म्हणुन घोषित करण्यात आले नाही. पुढे नवाझ शरीफ हे सत्तेवर आल्यानंतर देखील पाकने आपले हेच धोरण पुढे नेले. यामुळे भारताचा काश्मीर येथील देशी आणि विदेशी पर्यटन व्यवसाय पूर्णपणे टप्प झाला. काश्मीरच्या जनतेवर बेरोजगारीची वेळ आली. स्थानिक दहशतवादाचाच मोठा फटका बसल्याचे लक्षात आल्यानंतर जनसामन्यांचा यातला पाठींबा हा कमी कमी होत गेला. निवडणुका झाल्यानंतर काश्मीरमध्ये फारूक अब्दुल्ला यांचे सरकार स्थापन झाले. भारताच्या या लोकशाहीवादी भूमिकेला जगभर मोठा पाठींबा मिळाला.

**अणुस्फोट चाचण्या :**

सन १९९८ मध्ये भारताने आण्विक क्षेत्रातील आपली मजबुती आणि संरक्षण व्यवस्था बळकट करण्यासाठी पोखरण याठिकाणी अणुस्फोट चाचण्या घेतल्या. पाकिस्तान देखील यावेळी शांत बसले नाही याला प्रतिउत्तर म्हणून त्यांनीही तत्काळ प्रभावाने अणुचाचण्या घेऊन आपण कोणत्याही संघर्षाला तयार असल्याचे दाखविले. अर्थात दोन्ही देशात घेण्यात आलेल्या अणुस्फोट चाचण्यांचा परीणाम हा दोन्ही देशांना जागतिक स्तरावरील आर्थिक निर्बंध स्वरुपात भोगावा लागला. भारत सावरला तरी पाक मात्र यात ढासळला होता. अर्थात अमेरिकेने लवकरच सहकार्याचे धोरण पाकिस्तानच्या बाबतीत अवलंबले.

**वाजपेयी सरकार आणि पाक संबंध :**

अणुस्फोट चाचण्या घेतल्यानंतर दोन्ही देशातले ताणलेले संबंध पुन्हा व्यवस्थित करण्यासाठी भारताचे तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी पुढाकार घेतला. दिल्ली–लाहोर अशी बससेवा सुरू केली. स्वत: पंतप्रधान वाजपेयी हे लाहोर बसने २० जानेवारी १९९९ रोजी परराष्ट्र मंत्र्यांसह लाहोरला जाऊन पोहचले. सीमेवर त्यांचे पाकचे पंतप्रधान नवाझ शरीफ यांनी स्वागत केले. दोन्ही देशांनी मैत्रीपूर्ण संबंधासाठी लाहोर जाहीरनामा प्रसिद्ध केला. ज्यानुसार अण्वस्त्र वापरू नये, अणुचाचण्या घेऊ नये, जम्मू–काश्मीरचे प्रश्न सोडविण्याचे काम वेगाने करावे अशा अनेक बाबी स्वीकारण्यात आल्या. दोन्ही देशांचे संबंध कायमचे सुधारणार असे वाटत असताना पाकने पुन्हा डोके वर काढले.

**कारगिल युद्ध :**

पाकिस्तान एका बाजूला लाहोर जाहीरनाम्याचे डोंग करीत होता तर दुसऱ्या बाजूला भारताला अंधारात ठेऊन मोठ्या युद्धाची तयारी करीत होता. १९९८ पासूनच पाक लष्कराने काश्मीरची रॅडक्लिफ नियंत्रण रेषा ओलांडून १५ किलोमीटर आत भारतीय हद्दीत मजबूत अशी लष्करी ठाणी निर्माण करणे सुरु केले होते. संपूर्ण काश्मिरच त्यांना खरेतर ताब्यात घ्यायचा होता. भारत हा मात्र पूर्णपणे या गोष्टींपासून बेसावध आणि अनभिज्ञ असलेला दिसतो. अत्यंत उंचावरील कारगिल, बटालिक, द्रास, काकसर व मश्को सेक्टर या भारतीय हद्दीत पाकने बंकर बांधून ठाणी वसविली होती. सुरवातीच्या स्थानिकांनी याची स्पष्ट कल्पना देऊनही सरकारकडून मात्र याकडे दुर्लक्ष करण्यात आले.

प्रत्यक्ष युद्धाला सुरवात ही २६ मे १९९९ रोजी भारतीय लष्कराकडून करण्यात आली. जवळजवळ ५३ दिवसांच्या लांबलेल्या चिवट संघर्षानंतर लष्कराला घुसखोरांना भारतीय हद्दीतून हुसकावून लावण्यात यश आले. भारताला यात यश मिळताना देखील मोठी किंमत मोजावी लागली होती. ४५० पेक्षा जास्त भारतीय सैन्य दलातील जवान आणि अधिकारी यात शहीद झाले तर १००० पेक्षा जास्त जखमी झाले काही बेपत्ता देखील यात झाले. या मोहिमेसाठी त्याकाळात १५०० कोटीपेक्षा जास्त खर्च आला. यावेळी अनेक राष्ट्रांनी भारताच्या या मोहिमेला आपला पाठींबा जाहिर केला होता. अर्थात अन्य राष्ट्रांच्या मध्यस्थीला भारताने यावेळी नाकारले होते. कारगिलवरून पाक लष्करी घुसखोरांना हाकलून लावण्यासाठी जी मोहीम अमलात आणली तिला ऑपरेशन विजय असे संबोधण्यात आले. या संघर्षात पायदळ, हवाई दल आणि तोफखाना यांचा सयुंक्तरित्या वापर करण्यात आला होता. बोफोर्स तोफांनी बजावलेली कामगिरी ही डोळ्यात भरण्याजोगी राहिली. या युद्धानंतर भारताला हिमालयीन उंच भाग देखील सुरक्षित नसल्याचे लक्षात आले. यापुढे लष्कराने हा भाग डोळ्यात तेल घालून आपल्या सतत नजरेखाली ठेवला. अत्यंत अवघड अशा या प्रदेशाचे रक्षण करणे खरेतर मोठे जिकीरीचे व दळणवळणासाठी फार खर्चिक आहे.

दहशतवादाने तोंड काढण्याअगोदर काश्मीर प्रश्न हा होताच पण या जोडीला ६ नद्यांचा पाणी वाटपाचा प्रश्न देखील महत्त्वपूर्ण ठरला आहे.

**आगरा शिखर संमेलन :**

कारगिल युद्धानंतर दोन वर्षांनी भारताचे पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी दोन्ही देशातील बिघडलेले संबंध पुन्हा सुधारण्यासाठी पुन्हा पुढाकार घेतला. त्यांनी पंतप्रधान परवेज मुशरफ यांना दिल्ली बोलविण्यासाठी आमंत्रित केले. १५ आणि १६ जुलै २००१ रोजी दोन्ही देशांच्या प्रमुखांनी आगरा येथे चर्चा केली. ही चर्चा एकूण ५ तास चालली पण एकमत न झाल्याने ही चर्चा असफल झाली.

**भारतविरोधी पाकच्या हालचाली :**

आतंकवाद याने भारतात कहर केला जेव्हा १३ डिसेंबर २००१ मध्ये भारताच्या संसदेवर आतंकवाद्यांनी हल्ला केला. सतत होणाऱ्या साखळी दहशतवादी आक्रमणाविरुद्ध ऑपरेशन परिक्रमा सुरु केली व पाक सोबत होणाऱ्या चर्चेला पूर्ण ठप्प केले. आंतरराष्ट्रीय हस्तक्षेपामुळे दोन्ही देश जवळ येण्याची पुन्हा आशा पल्लवित झाली. १८ एप्रिल, २००३ मध्ये दोन्ही देशातील संबंध सुधारावेत म्हणून वाजपेयी यांनी पाककडे मैत्रीचा हात पुढे केला. पाकने सकारात्मक पाठींबा दर्शविल्याने पुन्हा संबंध सुधारू लागले. यानंतर पाकिस्तानच्या इस्लामाबाद याठिकाणी ६ जानेवारी २००४ मध्ये झालेल्या सार्क शिखर परिषेदेत स्वत: अटल बिहारी वाजपेयी यांनी भाग घेतला. तर मनमोहनसिंग हे पंतप्रधान असताना १६ ते १८ एप्रिल २००५ मध्ये मुशर्रफ यांनी नवी दिल्लीचा प्रवास केला. यावेळी दोन्ही देशात रस्ते, रेल्वे, हवाई वाहतूक, इराण ते भारत पाईपलाईन, अण्वस्त्र क्षेत्रातील विश्वास यावरील उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली.

**दळणवळण आणि व्यापार :**

जुलै २००६ पासून दोन्ही देशात श्रीनगर- मुजफ्फराबाद ट्रक सेवा सुरु करण्यात आली. उद्देश हा वस्तूंची आयात-निर्यात करणे सोपे व्हावे आणि व्यापारात वाढ व्हावी. याबरोबर दोन्ही देशातील वाणिज्य चेम्बर्सच्या सदस्यांना एकमेकांच्या देशात जाणे-येणे सुलभ व्हावे म्हणून पुंछ-रावळकोट बससेवा जून २००६ मध्ये सुरू करण्यात आली. या रस्त्याला आधी व्यवस्थित बनविण्यात आले आणि जवळजवळ ५० वर्षानंतर हा मार्ग मोकळा करण्यात आला.

ह्या सुधारलेल्या वाटणाऱ्या संबंधाना सुरुंग हा २००८ मधील मुंबईतील आतंकवादी घटनेने लागला. अर्थात यामागे पाकिस्तानचा पूर्णपणे हात असल्याचे नंतर निष्पन्न झाले होते.

**मुंबईवरील दहशतवादी हल्ला :**

भारताची आर्थिक राजधानी मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी संपूर्ण देशाला हादरवून सोडणारा दहशतवादी हल्ला करण्यात आला. ज्याची संपूर्ण पाळेमुळे आणि सूत्रे ही पाकीस्तानमधून हलविण्यात आली होती. मुंबईतील पंचतारांकीत हॉटेल्स, कामा हॉस्पिटल, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आदी ठिकाणांवर दहशतवाद्यांनी हल्ले चढवले होते. अजमल कसाब याच्यासह १० जणांचा या हल्ल्यात सहभाग होता. या हल्ल्यात सहभागी झालेल्या दहशतवाद्यांना पाकिस्तानातून पाठवण्यात आले होते याबरोबर त्यांना व्यवस्थित प्रशिक्षित करण्यात आले होते. हल्लेखोर प्रवेश करण्यासाठी सागरी मार्गाने आले होते. दहशतवादी

पाकिस्तानातून गुजरातमार्गे बोटीतून भारतात आले. दहशतवाद्यांनी मुंबईत प्रवेश करताच ताज हॉटेल, ओबेरॉय ट्रायडंट आणि नरिमन हाऊसवर हल्ला केला. ताज हॉटेलमध्ये सुमारे सहा स्फोट झाले, ज्यात अनेक लोक ठार झाले. दहशतवाद्यांनी लोकांना ४ दिवस ओलीसही ठेवले होते आणि अंदाधुंद गोळीबारात अनेकांना ठार केले.

मुंबईत वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या या दहशतवादी हल्ल्यात सुमारे १९७ जणांचा मृत्यू झाला होता, तर ६०० हून अधिक लोक जखमी झाले. भारताने राबविलेल्या विरोधी मोहिमेत एक सोडून सर्व दहशतवादी मारले गेले. मोहम्मद अजमल आमिर कसाब हा जिवंत पकडला गेला. ज्याला २१ नोव्हेंबर २०१२ रोजी येरवडा तुरुंगात फाशी देण्यात आली होती. यात ठार झालेल्यांमध्ये भारतीय आणि मोठ्या संख्येने परदेशी नागरिकांचा समावेश होता. ठार झालेले पोलीस अधिकारी म्हणजे एटीएसचे प्रमुख हेमंत करकरे, एसीपी अशोक कामटे, एनकाऊंटर स्पेशालिस्ट विजय साळसकर, मेजर उन्नीकृष्णन यांच्यासह १४ पोलिस अधिकारी-कर्मचारी शहीद झाले होते. तुकाराम ओंबळे आणि मुंबई पोलिसांचे सहाय्यक उपनिरीक्षक यांनी एकमेव जिवंत दहशतवादी अजमल कसाबला पकडण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली.

**२६/११ नंतरची वाटचाल :**

मुंबईच्या २००८ मधील आतंकवादी हल्ल्यानंतर २८ एप्रिल २०१० मध्ये दक्षेसची थीम्पू येथे बैठक आयोजीत करण्यात आली होती. भारताचे पंतप्रधान मनमोहनसिंग आणि पाकिस्तानी पंतप्रधान युसुफ रजा गिलानी यांच्यात सद्भावना भेट झाली. आंतकवाद नियंत्रणात आणण्यात पाकने यावेळी आश्वासन दिले. यामुळे चर्चेचा मार्ग यावेळी खुला झाला.

२०११ मध्ये पाकिस्तानी परराष्ट्र मंत्री हिना रब्बानी यांनी भारताचा प्रवास केला. त्यांनी दोन्ही देशांचे संबंध चांगले आणि मजबूत करण्यावर जोर दिला. अर्थात त्यांनी काश्मीरचा प्रश्न यावेळी उचलून धरला नाही हे खास.

२०१३ च्या सप्टेंबरमध्ये, भारत आणि पाकिस्तानच्या पंतप्रधानांची न्यूयॉर्कमध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेच्या वेळी भेट झाली. जम्मू आणि काश्मीरमधील वादग्रस्त प्रदेशातील दोन्ही बाजूंच्या सैन्यांमधील तणाव संपविण्यास त्यांनी सहमती दर्शविली.

१ मे २०१४ रोजी, पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल राहिल शरीफ यांनी काश्मीर ही पाकिस्तानची ''गुळाची रक्तवाहिनी'' संबोधून या प्रदेशातील चिरस्थायी शांततेसाठी हा वाद काश्मिरींच्या इच्छा आणि आकांक्षेनुसार आणि संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षेनुसार सोडवला गेला पाहिजे असे मत व्यक्त केले. २७ मे २०१४ रोजी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीत पाकिस्तानचे पंतप्रधान नवाझ शरीफ यांच्याशी चर्चा केली. दोन्ही बाजूंनी द्विपक्षीय संबंधांचे नवे पर्व सुरू करण्याची इच्छा व्यक्त केली.

**पाकिस्तानच्या उंबरठ्यावर आलेला दहशतवाद :**

१६ डिसेंबर २०१४ रोजी पाकिस्तानच्या पेशावरमधील आर्मी स्कूलमध्ये आतंकवादी हल्ला करण्यात आला.१३२ शाळेचे विद्यार्थी आणि अन्य असे एकूण १४१ जण यात मारले गेले. या हल्ल्याची जबाबदारी

तहरीक–ए–तालिबान या दहशतवादी संघटनेने घेतली होती. यावेळी भारताकडून पाकला संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. पाकिस्तानकडून आतंकवादींच्या विरुद्ध कडक कारवाई करण्यात आली. अनेक जणांना त्यांच्याकडून कडक शिक्षा देण्यात आल्या. याबरोबर आतंकवाद विरुद्ध व्यापक कार्यक्रम घेण्याचे पाकिस्तान कडून जाहीर करण्यात आले आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न–४**

अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) पाकिस्तानचे अध्यक्ष जनरल झिया उल–हक्क यांनी भारतविरोधी कोणती योजना हाती घेतली?

२) एकूण किती टप्प्यात ऑपरेशन टोपॅक ही योजना अमलात येणार होती?

३) दिल्ली–लाहोर अशी बससेवा सुरु झाली तेव्हा भारताचे पंतप्रधान कोण होते?

४) पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी २० जानेवारी १९९९ रोजी परराष्ट्र मंत्र्यांसह बसने पाकिस्तानच्या कोणत्या शहरात गेले.

५) मुंबईच्या दहशतवादी हल्ल्यात जिवंत पकडण्यात आलेला दहशतवादी हल्लेखोर कोण ?

ब) खालील वाक्यातील गाळलेले शब्द भरा.

१) १३ डिसेंबर २००१ मध्ये भारताच्या ............ आतंकवाद्यांनी हल्ला केला.

२) ६ जानेवारी २००४ मध्ये झालेल्या सार्क शिखर परिषेदेत स्वत: ............ यांनी भाग घेतला.

३) मनमोहनसिंग हे पंतप्रधान असताना १६ ते १८ एप्रिल २००५ मध्ये जनरल मुशर्रफ यांनी ............ प्रवास केला.

४) भारताची आर्थिक राजधानी मुंबईवर २६ नोव्हेंबर ............ रोजी संपूर्ण देशाला हादरवून सोडणारा दहशतवादी हल्ला करण्यात आला.

५) अजमल कसाब हा जिवंत पकडला गेला. ज्याला २१ नोव्हेंबर २०१२ रोजी ............ तुरुंगात फाशी देण्यात आली होती.

६) एटीएसचे प्रमुख ............ हे पोलीस अधिकारी मुंबईच्या हल्ल्यात शहीद झाले.

७) २०११ मध्ये पाकिस्तानी परराष्ट्र मंत्री ............यांनी भारताचा प्रवास केला.

## ३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

**१) इन्फ्रास्ट्रक्चर** : पायाभूत सुविधा

**२) पेरेस्त्रोइका :** हा एक रशियन शब्द आहे. ज्याचा अर्थ होतो. याचा शब्दश: अर्थ पुनर्रचना असा होतो.

३) **ऑपरेशन टोपॅक :** हा एका लष्कराकडून घेण्यात आलेल्या गुप्त मोहिमेचे सांकेतिक नाव आहे. जो १९८० च्या दशकात पाकिस्तानची मुख्य गुप्तचर संघटना आय.एस. आय कडून भारताविरुद्ध काश्मीरमध्ये चालविण्यात आला.

## ३.४ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं अध्ययन प्रश्न–१

अ) १) मैत्रीसंबंधांवर    २) रशिया

३) मिखाइल गोर्बाचेव्ह    ४) बँक ऑफ इंग्लंड

५) १९९८

ब) १) क्रोयोजेनिक    २) ग्लासनोस्ट(खुले धोरण)

३) १९९१    ४) एच.डी. देवेगौडा

५) रुबल संकट किंवा रशियन फ्लू

स्वयं अध्ययन प्रश्न–२

अ) १) समाजवादी अर्थव्यवस्थेकडे    २) अमेरिकेचा

३) जागतिक बँकेकडून    ४) सुपर कम्प्युटर/ महासंगणक

५) पी.व्ही. नरसिंहराव

ब) १) विजय भटकर    २) टर्बाईन इंजिन

३) आण्विक सामंजस्य    ४) सैनिकी विमान

५) आर्थिक निर्बंध    ६) बराक ओबामा

स्वयं अध्ययन प्रश्न–३

अ) १) दलाई लामा    २) पंचसूत्री

३) बॉन ब्युन    ४) मकॅमोहन रेषा

५) संयुक्त कार्यकारी गट

ब) १) सिक्कीम    २) ला पींग

३) अणुइंधन    ४) कोको बेटावर

५) अरूणाचल प्रदेश    ६) नथुला खिंडला

७) पंचसूत्री कार्यक्रम

स्वयं अध्ययन प्रश्न-४

अ) १) ऑपरेशन टोपॅक २) ३ टप्प्यात ३) पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी

४) लाहोरला ५) अजमल कसाब

ब) १) संसदेवर २) अटल बिहारी वाजपेयी ३) नवी दिल्लीचा

४) २००८ ५) येरवडा ६) हेमंत करकरे ७) हिना रब्बानी

## ३.५ सारांश

भारताचे परराष्ट्रीय धोरण चीन, पाकिस्तान, अमेरिका आणि रशिया या चारच राष्ट्रांपुरते मर्यादित नसले तरी या देशांशी आलेला संबंध हा सर्वात जास्त होता हेही अभ्यासांती लक्षात येते. भारताचे परराष्ट्रीय धोरण अलिप्ततेच्या आणि पंचशील सूत्राचा आधार घेऊन वाटचाल करीत होते. याला पाहिला धक्का चीनकडून १९६२ मध्ये बसला यामुळे भारताला आपल्या धोरणाबद्दल आणि अंतर्गत विकासाच्या बरोबर संरक्षण क्षेत्राकडे लक्ष देणे भाग पडले. यामुळे भारत पोखरण येथे अणुस्फोट चाचणी घेऊन ऐंशीच्या दशकात मजबूत राष्ट्र म्हणून पुढे येतो. सुरवातीपासून अमेरिका आणि नंतर चीन हे राष्ट्र भारतविरोधी पाकिस्तानचे पाठीराखे राहिले तरी भारताने उदारीकरणाचे धोरण स्वीकारल्यावर आणि भारताची अर्थव्यवस्था मजबूत झाल्यावर अमेरिका आणि चीनला भारताची दखल घेणे भाग पडले आहे. तरी तिबेटचा प्रश्न आणि सीमावाद हा भारत आणि चीनच्या मध्ये चिंतेचा विषय असतो. भारताच्या सर्व शेजारील देशांशी चीनने लष्करी करार करणे भारताची डोकेदुखी वाढविणारी बाब आहे. पाकव्याप्त काश्मीरमध्ये आणि अरुणाचल प्रदेशाजाच्या जवळ चीनचे दळणवळण दृष्ट्या मजबूत होणे खेदजनक आहे. पाकिस्तान केवळ काश्मीरप्रश्न समोर ठेऊन सुरवातीपासून पारंपारिक शत्रुत्व एवढे जीवापाढ जपत आला आहे की, खरोखरीच प्रश्न पडतो की, पाकिस्तानला स्वत: च्या देशाच्या सर्वांगीण विकासापेक्षा काश्मीरचीच चिंता का जास्त सतावते. तसे पाहिले तर भारताला हा प्रदेश सुरक्षित ठेवण्यासाठी झालेला आर्थिक खर्च आणि प्राणहानी ही मोजमाप करण्याच्या पलीकडे गेली आहे. जागतिक स्तरावर अमेरिका आणि चीनने या प्रश्नात हात घालून पाकिस्तानचेच नुकसान मोठे केले आहे. नव्वदच्या दशकात पाकने सुरु केलेला दहशतवाद त्यांच्याच अंगलट येऊ पाहत आहे. भारताने वेळोवेळी निकोप भावनेने तर पाकने कुत्सित भावनेने भारताशी मैत्री केलेली आहे. पाकिस्तानच्या लोकशाहीचे आस्तित्व हे केवळ आणि केवळ लष्करी हुकुमशाहीच्या मर्जीवर असल्याचे स्पष्ट आहे. आर्थिक दिवाळखोरीला लागलेला देश आणि कंटाळलेली जनता हे चित्र पाकिस्तानच्या बाबतीत आपल्याला १९८४ ते २०१४ याकाळात दिसून येईल. पाकिस्तानच्या घुसखोरी कारवाया आणि कपटनीती भारताविरुद्ध अनेकवेळा त्रासदायक ठरली याचे कारण बऱ्याचवेळा आपली राजकीय उदासीनता आणि असावधानता आहे.

रशिया हा सोव्हिएत युनियन असताना आणि विघटन झाल्यानंतर देखील भारतासाठी एक महत्त्वपूर्ण मित्र देश राहिला आहे. भारताची विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील झेप आणि एक मजबूत अशी सरंक्षणव्यवस्था रशियाच्या सहकार्याने झाली आहे. भारताच्या विकासात सहयोग करण्याबरोबर अणुस्फोट चाचण्या घेतल्यावर दिलेला पाठींबा भारताला जगात एकटे पडण्यापासून वाचवू शकला तो केवळ रशियामुळे हे विसरून चालणार नाही. राजकीय सत्ता बदल भारतात होत असताना रशियाच्या संबंधाना कधीच कमी लेखून वा दुर्लक्ष करून भारताला चलणार नाही. लोकशाही आणि भांडवलशाही राष्ट्रांच्या सोयीनुसार बदलणाऱ्या धोरणापेक्षा साम्यवादी असलेल्या रशियाचे भारताच्या बाबतीतले स्थिर धोरण महत्त्वपूर्ण आहे.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा

१) भारत- रशियाचे संबंध आपल्या शब्दात विशद करा

२) भारत- अमेरिकेच्या संबंधातील मुख्य मुद्दे स्पष्ट करा

३) भारत-चीमधील प्रमुख समस्या सविस्तर नमूद करा

४) पाकची ऑपरेशन टोपॅक योजना स्पष्ट करा

ब) टिपा

१) सोव्हिएत युनियनच्या विघटनाचा परिणाम

२) येवेगनी यांची भारत भेट

३) युएसएसआरचे विघटन

४) ब्लादिमीर पुतीन आणि भारत :

५) तिबेटचा प्रश्न

६) भारत-चीन सीमाप्रश्न

७) शेजारील राष्ट्रांशी चीनचे करार

८) सियाचीन प्रश्न

९) अणुस्फोट चाचण्या

१०) वाजपेयी सरकार आणि पाक संबंध

११) कारगिल युद्ध

१२) दळणवळण आणि व्यापार

१३) मुंबईवरील दहशतवादी हल्ला :

## ३.७ संदर्भ ग्रंथ

**मराठी**


१) अंजली रानडे, जागतिक राजकारण

२) डॉ. देवळाणकर शैलेन्द्र, समकालीन जागतिक राजकारण : भारताच्या परराष्ट्र आणि संरक्षण धोरणापुढील आव्हाने

३)   तळवळकर गोविंद, भारत आणि जग

४)   प्राचार्य कदम य.ना., समकालीन आधुनिक जग

५)   डॉ. तोडकर बी.डी., भारत आणि दक्षिण आशियायी राष्ट्रामधील संबंध

हिंदी

१)   डॉ. आर्य राकेश कुमार, भारत की विदेश नीती

२)   गांगुली सुमित, भारत की विदेश नीती पुनरावलोकन

३)   डॉ. जोहारी जे.सी., भारतीय विदेश नीती

४)   दिक्षित जे. एन., भारतीय विदेश नीती

इंग्रजी

१)   Ogden Chris, Indian Foreign Policy

२)   Khanna V.K., Foreign Policy of India

३)   Malone David, The Oxford Handbook of Indain Foreign Policy

❑❑❑

# घटक ४
# भारताचे परराष्ट्रीय धोरण (२०१४ ते २०२३)

**अनुक्रमणिका**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.४ स्वयं- अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ संदर्भ ग्रंथ

## ४.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास -

- २०१४ ते २०२३ याकाळातील भारताच्या परराष्ट्र धोरणातील विकास आणि बदल लक्षात येईल.
- भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळातील परराष्ट्र धोरणातील महत्त्वपूर्ण मुद्दे समजून घेता येतील.
- भारत आणि अमेरिका यांच्या एकमेकांकडून असलेल्या अपेक्षा आणि भूमिका लक्षात घेता येतील.
- भारताचे चीनसोबत असलेले परराष्ट्र धोरण  लक्षात येईल.
- भारत आणि पाकिस्तानमधील परराष्ट्र धोरणात आलेली कटूता समजून घेता येईल.

## ४.१. प्रास्ताविक

आपण तिसऱ्या घटकात १९८४ ते २०१४ याकाळातील भारताचे रशिया, अमेरिका, चीन आणि पाकिस्तानसोबत असणारे परराष्ट्रीय धोरण अभ्यासले. या घटकात आपण भारताच्या परराष्ट्र धोरणाचा २०१४ ते २०२३ पर्यंतचा कालावधी अभ्यासणार आहोत. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर जगात झपाट्याने प्रत्येक क्षेत्रात बदल होत होते. अमेरिका जरी एकमेव महासत्ता म्हणून उरली असली तरी जगातील बहुतांश देश हे दहशतवाद, नवआर्थिक आणि जीवघेण्या साम्राज्यवादी समस्येने ग्रस्त झालेत. विज्ञान आणि तंत्रज्ञान

क्षेत्रातील प्रगती डोळे दिपवणारी ठरली. संघणक आणि दूरध्वनी क्षेत्राच्या क्रांतीने जगालाच एक खेडे करून जोडून टाकले.

भारताचे परराष्ट्र संबंध २०१४ नंतर आर्थिक छाप सोडणारे राहिलेले दिसतात. भारताची वेगाने आर्थिक सक्षमतेने होणारी वाटचालीची दखल फक्त अमेरिकेनेच घेतली नाही तर भारताच्या शेजारी असलेल्या चीनला देखील घ्यावी लागलेली आहे. यामुळे याकाळात चीनने भारताशी व्यापारी संबंध वाढविण्याबरोबर विविध व्यासपीठांवर समतोल अशी वागणूक देखील दिलेली आहे. भारताची लोकसंख्या आज चीनशी बरोबरी साधत असल्याने येथील प्रचंड मोठा ग्राहक वर्ग हा विविध देशांच्या बाजारपेठेला तेवढाच आकर्षित करणारा राहिला आहे. जगातील अनेक देश ज्यात कोरिया, इराण सारखे लहान देश देखील आण्विक क्षमतेची ताकद ठेवत असल्याने आज जगात विस्फोटक क्षमतेपेक्षा आर्थिक ताकद हीच निर्णायक ठरताना दिसत आहे.

भारत अमेरिकेच्या संबंधात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अनुक्रमे बराक ओबामा आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्या अमेरिकी राष्ट्राध्यक्ष पदाच्या कार्यकाळात दाट मैत्री, द्विपक्षीय व्यापारात आणि आर्थिक संबंधात घेतलेली गती महत्त्वाची आहे. चीनसोबत २०१० नंतर भारताचा व्यापार हा प्रचंड प्रमाणात वाढलेला आहे. सीमाप्रश्न आणि अन्य प्रश्न हे अजूनही कायम असले तरी चीनने भारताला कमी लेखण्यापेक्षा महत्त्वपूर्ण आणि ताकदवर राष्ट्र म्हणून या काळात एकप्रकारे मान्यता दिलेली दिसते. परंतु चीनचे पाकिस्तान आणि अन्य भारतीय शेजारी राष्ट्रांना आर्थिक मदत करण्याचे धोरण हे निरपेक्ष दृष्टिकोनातून नक्कीच राबविलेले नाही.

भारत- पाकिस्तान संबंधात समान सांस्कृतिक आणि ऐतिहासिक परंपरेचा धागा आता उसवला गेला आहे. दोन्ही देशातील हाडवैर काश्मीर प्रश्नावरून कायम असले तरी पाकिस्तानने भारताला अडचणीत आणण्याची कोणतीही कसर वेळोवेळी सोडली नाही. दोन्ही देशात वेळोवेळी लहान मोठी युद्धे झालेली आहेत तर शेकडोवेळा पाकने भारताविरुद्ध दहशतवादी कारवाया केलेल्या आहेत. कारगिल युद्धानंतर व मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यानंतर दोन्ही देशातील संबंधात वितुष्ट येऊन वेळोवेळी चर्चा ही खंडित झाली आहे. तरी पाकिस्तानने काश्मीरचा मनसुबा सोडलेला नाही. दोन्ही देशात व्यापारी संबंध कायम असले तरी पूर्वीच्या संबंधातील खोली यात आता राहिलेली नाही.

## ४.२. विषय विवेचन

### ४.२.१ भारत–अमेरिका संबंध :

सन २०१४ साली भारत देशाच्या पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी विराजमान झाल्यानंतर त्यांनी पारंपरिक भारत–अमेरिका संबधात मोठा बदल केला. अमेरिकेचे पंतप्रधान बराक ओबामा यांनी तोपर्यंत आपल्या अध्यक्षपदाचा सहा वर्षाचा कार्यकाळ पूर्ण केला होता. ते जागतिक पटलावर अमेरिकेचे चित्र बदलण्याच्या कामात उत्साहाने लागले होते. जुने बिघडलेले संबंध पुन्हा दुरुस्त करणे त्यांनी महत्त्वपूर्ण मानले होते.

भारत अमेरिकेचे तुटलेले परराष्ट्रीय संबंध पुन्हा चांगले करण्यासाठी त्याचवेळी नरेंद्र मोदी यांनी पुढाकार घेतला. कारण आत्तापर्यंत दोन्ही देशांचे संबंध हे संस्थात्मक आणि कार्यालयीन चोकोरीतच पुढे सरकत होते. ज्यात वैयक्तिक संबंधाना फार महत्त्व दिलेले नव्हते. यात मोठा फेरबदल नरेंद्र मोदी यांनी केला. आशिया खंडातील चीनच्या वाढत्या शक्तीला सीमित करण्यासाठी जुन्या धोरणांना त्यागून पूर्णपणे नवीन पद्धत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आणली. देशाच्या परराष्ट्र धोरणाची जबाबदारी परराष्ट्र मंत्रालयावर न सोपविता हा भार त्यांनी स्वत:च्या शिरावर घेऊन त्यांनी हा मुद्दा तडीस नेला. राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा असो वा डोनाल्ड ट्रम्प त्यांनी त्यांच्याशी वैयक्तिक मैत्री वाढविण्यावर भर दिला. अर्थात यासाठी त्यांनी बाराचवेळा प्रोटोकॉल देखील बाजूला ठेवला. भारतीय परराष्ट्र धोरणाला जे जे नेते महत्त्वपूर्ण ठरतील त्या लोकांशी त्यांनी मैत्री वाढविली. त्यांनी वैयक्तिक संबंधातून भारताच्या परराष्ट्र धोरणाला अनुकूल असे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला. विशेषत: जलप्रदूषण या विषयावर त्यांनी दिलेला जोर महत्त्वपूर्ण ठरला. आंतरराष्ट्रीय स्तरावर याचे अनेकांनी महत्व स्वीकारले. भारताकडून याबाबतीत ठोस अशी पाऊले उचलली गेली.

प्रशांत महासागर व हिंदी महासागर क्षेत्रात भारत–अमेरिका यांच्या सयुंक्त कुटनीतीस आकार देण्यात नरेंद्र मोदी यांची भूमिका महत्त्वपूर्ण अशी राहिली.

**ओबामा यांचा काळ :**

बराक ओबामा हे पहिल्यांदा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून २००९ साली निवडले गेले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकाळात त्यांचा दुसरा कार्यकाल राष्ट्राध्यक्ष म्हणून सुरू होता. नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०१४ ला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ओबामा यांची भेट घेतली. त्यांच्या कॅबिनेटशी चर्चा केली. नरेंद्र मोदी यांनी तेथील लोकांशी विशेषत: प्रवासी भारतीय, वाणिज्य आणि उद्योगपती, अमेरिकन नेते यांची भेट घेतली. प्रवासादरम्यान देशाचे भवितव्य याबद्दल चर्चा करण्यात आली. यानंतर भारताचे आमंत्रण स्वीकारून २५ जानेवारी २०१५ ते २७ जानेवारी २०१५ ला भारताच्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा भारतात आले. मुख्य पाहुणे म्हणून त्यांनी दिल्लीची मैत्री, आशिया–पॅसिफिक व हिंदी महासागर क्षेत्रासाठी सयुंक्त राजनीती व कुटनीति या संदर्भात भविष्यकालीन योजना आखण्यात आली. व्यापार व वाणिज्य विषयी परराष्ट्र मंत्र्यात चर्चा करण्यात आली. सप्टेंबर २०१५ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा अमेरिकेचा दौरा केला होता. ज्यात दोन्ही देशांच्या प्रमुख यांच्यात द्विपक्षीय महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात आली. या प्रवासाच्या दरम्यान व्यवसाय, उद्योग, पत्रकारिता, शिक्षण व प्रांतीय क्षेत्र यांच्याकडून त्यांना उत्साहपूर्ण असा प्रतिसाद देण्यात आला. सिलिकॉन शहराचा प्रवास देखील त्यांनी यावेळी केला. २०१६ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका प्रवासात बहुद्विपक्षीय अण्वस्त्र (परमाणु) शिखर परिषद ओबामा यांनी आयोजित केली होती, ज्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाग घेतला यावेळी त्यांनी अमेरिकन कॉंग्रेसच्या सयुंक्त सत्रास मार्गदर्शन केले. यावेळी अमेरिकेकडून महत्त्वाचा सुरक्षा सहकारी (डिफेन्स पार्टनर) म्हणून भारताची ओळख करून देण्यात आली. यावेळी नवीन तंत्रज्ञान भारताला देण्याविषयी अमेरिका कटिबद्द दिसली. याबरोबर उद्योगधंद्यात दोन्ही देशांची एकमेकांच्याकडून अपेक्षा देखील वाढली.

**ट्रम्पकालीन संबंध :**

२० जानेवारी २०१७ रोजी ४५ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून डोनाल्ड ट्रम्प यांनी शपथ घेतली. सन २०१७ मध्ये डोनाल्ड ट्रम्प यांची अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून झालेली निवड ही प्रारंभी भारताची चिंता वाढविणारी वाटली. पण लवकरच हा मळभ दूर करण्यात आला. दोन्ही देशाच्या प्रमुखांची २०१७ साली झालेली भेट पुढील सकारात्मक बाजूंची नांदी ठरली.

चीनच्या प्रभावावर मात करण्यासाठी अमेरिका व भारत या दोन्ही देशांच्या सैन्याने सयुंक्तरित्या सैन्याभ्यास केला. भारताने मोठ्या प्रमाणात म्हणजे जवळजवळ १३ अब्ज अमेरिकी डॉलर्स किमतीची सुरक्षा उपकरणे भारतात अमेरिकेकडून आयात केली.

भारत व सयुंक्त राज्य अमेरिकेच्या सशस्त्र दलाच्या दरम्यान रसद व अन्य सेवा देण्यासंदर्भात सामंजस्य करार केला गेला ज्याला एल.ई.एम.ए म्हणून ओळखले जाते.

उच्चस्तरावर तंत्रज्ञानानाची विक्री व हस्तांतरण सुविधा देण्याविषयी २०१८ मध्ये पुढचे पाऊल उचलण्यात आले. २०१४ मध्ये दोन्ही देशातील आर्थिक उलाढाल ही १०४ अब्ज डॉलर्सची होती जी २०१६ मध्ये ११४ अब्जावर गेली.

**कोरोनाकाळातील संबंध :**

सन २०२० मध्ये आलेल्या कोरोना महामारीच्या काळात देखील भारत-अमेरिका या दोन्ही देशांचे वाढलेले दाट मैत्रीचे संबंध विशेष महत्त्वाचे ठरलेले दिसतात. कोरोनाचे सावट जगावर असतानाच डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताची यात्रा केली होती. सन २०२० मध्ये राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी २४ आणि २५ फेब्रुवारी रोजी भारताच्या अहमदाबाद, आग्रा आणि दिल्ली आदी ठिकाणांचा प्रवास केला. यावेळी त्यांच्या कुटुंबातील अनेक सदस्य हे उपस्थित होते. त्यांच्या या दौऱ्याला भारताकडून न भूतो न भविष्यती असा अभूतपूर्व प्रतिसाद देण्यात आला. त्यांच्या विविध कार्यक्रमांना हजारो आणि लाखोंच्या संख्येने लोक हजर राहिले.

यावेळी दोन्ही देशात काही करार देखील करण्यात आले. ऊर्जा क्षेत्राशी संबंधीत आहे. ट्रम्प यांनी स्पष्ट केलं की, भारत आणि अमेरिकेमधील सुरक्षा करार आणखी व्यापक करणार आहे. ३ अब्ज डॉलर किंमतीच्या या सुरक्षा कराराला अंतिम स्वरूप देण्यात आलं आहे. या करारनुसार, अपाचे आणि एमएच ६० रोमियो हेलिकॉप्टर सह आत्यधुनिक सैन्य हत्यार दिले जाणार आहे. पंतप्रधान मोदी यांच्यासोबत व्यापार, उद्योग, ऊर्जा आणि दहशतवाद्यांशी एकत्र लढण्याच्या मुद्द्यावर चर्चा झाली. दोन्ही देश हे इस्लामी दहशतवाद्यांच्या विरोधात आहे. त्यासाठी दोन्ही देश सुरक्षेसाठी एकत्र आहे, अशी ग्वाही दोन्ही नेत्यांनी दिली. तसेच राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचं भारतातील स्वागत हे ऐतिहासिक होतं आणि ते कायम स्मरणात राहिल, असं मोदी म्हणाले. अमेरिकेसोबत मैत्रीपूर्ण नाते हे दोन राष्ट्रांमध्ये नसून दोन्ही देशाच्या नागरिकांमध्ये आहे, अशी भावनाही मोदींनी व्यक्त केली.

**भारतीयांचे अमेरिकेच्या विकासात योगदान :**

अमेरिकेच्या अनेक क्षेत्रात भारतीयांची भागीदारी व योगदान महत्त्वपूर्ण राहिले. विविध क्षेत्र ज्यात मायक्रोसॉफ्ट, वैज्ञानिक, नासा, आय.बी.एम., इंटेल, वैद्यकीय सुविधा यात भारतीयांनी अमेरिकेत दिलेले योगदान महत्त्वपूर्ण आहे. इंद्रा नुयी, विनोद धाम, विनोद खोसला, सुंदर पिचाई, शांतनू नारायण व अन्य भारतीय हे अमेरिकेत अतिशय उच्च आणि प्रतिष्ठित पदांवर विराजमान आहेत.

**भारत वासेनार व्यवस्थेत** (Wassenaar Arrangement) **सहभागी :**

यात भारताला सहभागी करून घेण्याचा निर्णय हा डिसेंबर २०१७ मध्ये घेण्यात आला. भारत आता या समूहाचा ४२ वा सदस्य होणार आहे. भारताच्या ध्येयधोरणांना याबाबतीत मोठे यश हे आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळालेले आहे. व्हियन्ना येथे हा निर्णय घेण्यात आला. वासेनार गटात सहभागी करून घेण्यासाठी भारताला अमेरिका, रशिया आणि फ्रान्स यांचे सहकार्य लाभले. याचा फायदा भारताला तंत्रज्ञान क्षेत्रात होणार आहे.

**जेरुसलेम वाद आणि भारताची भूमिका :**

जेरुसलेमचा वाद उकरून काढताना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतलेली भूमिका जागतिक पातळींवर मोठी वादग्रस्त ठरली. मध्याशियाचे आपले पारंपरिक धोरण सोडून ट्रम्प प्रशासनाने जेरुसलेमला इस्रायलची राजधानी म्हणून मान्यता ५ डिसेंबर २०१७ ला देऊन टाकली. याबरोबर अवीव मधील दूतावासाला या शहरात हलविण्याची प्रक्रिया सुरू केली. यामुळे मध्याशियामधील वातावरण गरम झालेले दिसते. अर्थात अमेरिकेने डोळे वटारून देखील भारताने अमेरिकेच्या या निर्णयास १२८ देशांच्या बरोबर कठोर विरोध केला.

**जो बायडेन यांचा कार्यकाळ :**

जानेवारी २०२१ मध्ये ४६ वे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून जोसेफ आर. बायडेन (ज्युनियर) यांनी कार्यभार हाती घेतला. जो बायडेन यांनी ८ सप्टेंबर २०२३ रोजी भारताची केलेली यात्रा ही अनेक दृष्टिने महत्त्वपूर्ण ठरली आहे. दोन्ही देशांच्या घनिष्ठ मैत्रीबद्दल दोन्ही नेत्यांनी याप्रसंगी उजळणी केली. याआधी जून २०२३ मध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेची भेट घेतली होती. यावेळी दोन्ही देशांनी लोकशाही मुल्यांवर आपली श्रद्धा जाहीर केली. भारताने जी २० परिषेदेत निभावलेले अध्यक्षपद बायडेन यांना कौतुकास्पद वाटले. या परिषदेमुळे भारताच्या शास्वत विकासाला चालना मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

दोन्ही नेत्यांनी मुक्त, खुल्या, सर्वसमावेशक आणि लवचिक हिंद-प्रशांत क्षेत्राच्या समर्थनासाठी क्वाडच्या महत्त्वाची पुष्टी केली. राष्ट्राध्यक्ष बायडेन यांनी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत सुधारणा होण्यासाठी आणि त्यात भारताला स्थायी सदस्यत्व मिळावे यासाठी पुन्हा आपला ठाम पाठिंबा व्यक्त केला. यावेळी भारताची धोरणात्मक भागीदारी, तंत्रज्ञान क्षेत्रातील विकास, अवकाश संशोधनात भारताने घेतलेली गती याबद्दल जो बायडेन यांनी स्तुती केलीच त्याबरोबर भारतातील संशोधन आणि विकास वाढवण्यासाठी

दशलक्ष अमेरिकी डॉलर्सची गुंतवणूक करण्याची घोषणा यावेळी करण्यात आली. पंतप्रधान मोदी आणि अध्यक्ष बायडेन यांनी आपले सरकार, उद्योग आणि शैक्षणिक संस्था यांच्यातील उच्चस्तरीय सहकार्य कायम ठेवण्याचा आणि उज्ज्वल आणि समृद्ध भविष्यासाठी आपल्या लोकांच्या आकांक्षा पूर्ण करण्याचा, जागतिक कल्याणासाठी कार्य करण्याचा आणि मुक्त, खुल्या, सर्वसमावेशक आणि लवचिक हिंद-प्रशांत क्षेत्रात योगदान देणाऱ्या चिरस्थायी भारत-अमेरिका भागीदारीचे महत्त्वाकांक्षी स्वप्न साकारण्याचा संकल्प केला.

भारत अमेरिका यांचे संबंध अलीकडच्या काळात व्यापारी घनिष्ठतेचे आणि समतोल प्रमाणात विकसित झालेले दिसतात. पाकिस्तानच्या बाबतीत अमेरिकेच्या मनात निर्माण झालेला संशय हा भारताच्या दाट मैत्रीत वाढ करणारा ठरला आहे.

- **स्वयं अध्ययन प्रश्न १**

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा

१) सन २००९ ते २०१७ पर्यंत जागतिक पटलावर अमेरिकेचे चित्र बदलण्याच्या कामात ......... हे उत्साहाने लागले होते.

अ) बराक ओबामा ब) डोनाल्ड ट्रम्प क) जो बायडेन ड) जॉर्ज बुश

२) राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा असो वा डोनाल्ड ट्रम्प......... यांनी त्यांच्याशी वैयक्तिक मैत्री वाढविण्यावर भर दिला.

अ) पी.व्ही.नरसिंहराव ब) अटल बिहारी वाजपेयी

क) मनमोहन सिंग ड) नरेंद्र मोदी

३) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ............. या विषयावर दिलेला जोर महत्त्वपूर्ण ठरला

अ) जलप्रदूषण ब) दहशतवाद क) व्यापार ड) तंत्रज्ञान

४) २०१७ ला भारताच्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून राष्ट्राध्यक्ष ......... हे भारतात आले.

अ) बिल क्लिंटन ब) डोनाल्ड ट्रम्प क) बराक ओबामा ड) जो बायडेन

ब) जोड्या जुळवून योग्य पर्याय निवडा.

| गट १ | गट २ |
|---|---|
| १) राष्ट्राध्यक्ष म्हणून बराक ओबामा | अ) २०१७ |
| २) पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी | ब) २०१४ |
| ३) राष्ट्राध्यक्ष म्हणून डोनाल्ड ट्रम्प | क) २०२१ |
| ४) राष्ट्राध्यक्ष म्हणून जो बायडेन | ड) २००९ |

अ) १- ड, २-ब, ३-अ, ४-क ब) १- क, २- ब, ३- ड, ४-अ

क) १- ब, २-क, ३-अ, ४-ड क) १- अ, २-ड, ३-क, ४-ब

### ४.२.२ भारत–चीन संबंध :

२०१४ ते २०२३ याकाळातील भारत–चीन संबंध हे पूर्वीपेक्षा कितीतरी पटीने बदलले लक्षात येतात. दोन्ही देशातील काही वाद हे कायम असले तरी दोघांच्या सामंजस्यात त्याचा मोठा अडसर आता ठरत नाही. आशियातील दोन प्रमुख आर्थिक शक्ती म्हणून पाश्चिमात्य आर्थिक साम्राज्यवादाचा सामना करण्यासाठी एकत्र येऊन याचा विचार करणे आवश्यक ठरत आहे.

**भारत–चीन अनौपचारिक शिखर संमेलन :**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग यांनी द्विपक्षीय चर्चा व आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या विषयांवर विचारांचे आदानप्रदान व वर्तमान स्तरावरील संदर्भात आपापल्या देशांच्या राष्ट्रीय विकासासाठी प्राथमिकता देऊन विस्ताराने चर्चा करण्यासाठी २७–२८ एप्रिल २०१८ मध्ये वूहान येथे प्रथमच अनौपचारिक शिखर संमेलनात भाग घेतला.

दोन्ही देशांची प्रचंड अर्थव्यवस्था व महत्त्वपूर्ण शक्ती म्हणून महत्त्व यामुळे दोन्ही देशातील स्थिर व मैत्रीपूर्ण संबंध हे अस्थिर असलेल्या पार्श्वभूमीवर महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

सीमाप्रश्नी काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या प्रती दोन्ही देशांच्या प्रमुखांनी यावेळी आपले समर्थन व्यक्त केले. दोन्ही देशांकडून याबाबतीत शांतता ठेवणे गरजेचे मानले गेले. वैश्विक विकास व सुरक्षेसंबंधी मुद्द्यांवर जोर देण्यात आला. याबरोबर आतंकवादाच्या समस्येवर देखील चर्चा करण्यात आली.

**दोन्ही देशातला व्यापार :**

भारताच्या बाबतीत चीनची व्यापारी भागीदारी मोठी राहिली आहे. कधी कधी ती अमेरिकेला देखील याबाबतीत मागे टाकते. २०१६ मध्ये चीनी वस्तूंसाठी ७ वा सर्वात मोठा आयातीसाठीचा देश भारत हा होता. तर यावर्षी चीनसाठी निर्यात करणाऱ्या देशांमध्ये भारताचा क्रमांक हा २७ वा होता.

सन २०१७ मध्ये भारत–चीन व्यापार हा ५५.११ अरब अमेरिकी डॉलर्स एवढा होता. भारत सॉफ्टवेअर व औषधी क्षेत्र याबरोबर सूचना तंत्रज्ञान क्षेत्रात विशेष तज्ञता प्राप्त करीत आहे. चीन हा इलेक्ट्रॉनिक हार्डवेअर क्षेत्रात विशेष प्रगत आहे.

भारताचा सर्वात मोठा सहकारी देश हा चीन आहे. दोन्ही देशांचा द्वीपक्षीय व्यापार हा २००७–०८ मध्ये ३८ अरब डॉलर होता जो २०१६–१७ मध्ये ७२ अरब डॉलरवर गेला. एप्रिल २०१७ ते जानेवारी २०१८ या कालावधीत द्वीपक्षीय व्यापार हा ७३ अरब डॉलरवर गेला.

**बेल्ट एंड रोड इनिशिएटिव :**

वन बेल्ट वन रोड या योजनेची सुरवात २०१३ मध्ये चीनकडून झाली. यात आशिया, आफ्रिका व युरोप येथील अनेक देश सहभागी झाले आहेत.

सन २०१६ पासून वन बेल्ट वन रोड ह्या योजनेला बेल्ट एंड रोड इनिशिएटिव योजना (BRI) या नांवाने ओळखले जाऊ लागले. या योजनेच्या अंतर्गत चीन हा देश प्राचीन काळातील रेशमी मार्गाचे पुनर्जीवन करीत आहे. यानुसार चीन रस्ते, रेल्वे, बंदरे, पाईपलाईन्स व अन्य महत्त्वपूर्ण सेवा या माध्यमातून आशिया ते युरोप व आफ्रिका खंड यांच्यात एक जमिनी व सामुर्द्रिक मार्ग तयार करीत आहे. या योजनेत दक्षिण पूर्व आशिया, मध्याशिया, गल्फ देश, आफ्रिका व युरोपातील विविध देश यांना जमिनी व सामुद्रिक मार्गांनी जोडणे हा मुख्य उद्देश आहे. यामुळे चीनला असे वाटते की, वेगवेगळे देश जवळ येतील, आपआपसातील सहकार्य व आर्थिक मदतीची देवाण-घेवाण करता येईल. चीनला ही योजना आर्थिक हेतूने प्रेरित वाटते खरेतर यामुळे वैश्विक चित्र बदलण्याची आशा त्यांना आहे.

भारताच्या शेजारचे देश या योजनेत सहभागी झाले असले तरी भारत मात्र यात सहभागी झाला नाही. या योजनेवर प्रतिबंध येणे हे भारताच्याच फायद्याचे आहे. पाकव्याप्त काश्मीरमध्ये या योजनेच्या अंतर्गत रस्ता जाणार आहे. यामुळे भारताला याचा मोठा त्रासच होणार आहे. या योजनेच्या परिपूर्तीनंतर भारताला चीनचा मोठा वेढा पडणार आहे. कदाचित श्रीलंका, पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ हे देश कर्ज चुकविण्यात जर विफल ठरले तर सहज चीनच्या वसाहती बनतील. या योजनेच्या कारवाईत चीनने कोट्यावधींचे कर्ज पाकला उपलब्ध करून दिले आहे. अशा देशांना चीनने कर्जपुरवठा आत्तापर्यंत केला आहे. अमेरिकेसारख्या महासत्तेने या योजनेवर कठोर शब्दात टीका केली आहे.

**डोकलाम वाद :**

डोकलाम या ठिकाणाचे विशेष हे की, याठिकाणी भारत-चीन आणि भूतान यांची सीमा एकत्र येते. सन २०१७ च्या जून महिन्यात येथे चीनने रस्ता बांधण्यास घेतला. चीनच्या या कृतीस भारताने १६ जून २०१७ रोजी आक्षेप घेतला. भूतान व चीन हे दोन्ही खरेतर डोकलाम या ठिकाणावर दावा करतात. ज्यात भारत भूतान या देशाचे नेहमी समर्थन करीत आला आहे. या प्रदेशाला चीनमध्ये डोंगलोंग असे म्हणतात. येथून सैन्य हटविण्यास दोन्ही देशांनी २८ ऑगस्ट २०१७ ला सहमती दाखवली. याआधी ठरलेल्या करारानुसार वाटाघाटी झाल्या तरी उलट चीनने भारताने घुसखोरी केली म्हणून माघार घेतली असे म्हटले. यामुळे दोन्ही देशांच्या संबंधात तणाव निर्माण झाला.

भारताने सैन्य हस्तक्षेप करून बांधकाम थांबवले. भारताच्या सिक्कीम जवळ डोकलाम हे पठार आहे. येथूनच भूतान सीमा सुरु होते. भूतान या देशाचे भारतासोबत जुने आणि घनिष्ठ संबंध आहेत. २७ जुलै २०१७ ला या विषयावर भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी ब्रिक्स सुरक्षा संमेलनात चीनच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागाराशी या विषयावर बोलणी केली. चीन हा या प्रदेशावर आपला कायदेशीर अधिकार असल्याचे मानतो. भारताचा हस्तक्षेप अमान्य करतो. उलट याठिकाणी बांधकाम रोखण्यास भारत गेल्यावर याला चीन घुसखोरी मानतो.

भविष्यात चीन या प्रश्नाला उकरून काढणार नाही याची काही शाश्वती देता येणार नाही.

**भारत व तैवान मैत्री आणि वाद :**

चीन हा देश आपल्या शेजारील राष्ट्रांशी आपलाच प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अधिकार असल्याचे मानतो. या देशांशी जेव्हा जेव्हा भारताने मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्याचा वा करारमदार करण्याचा प्रयत्न केला आहे तेव्हा तेव्हा चीनच्या पोटात दुखले आहे.

तैवान हा संशोधन क्षेत्रात ख्यातीप्राप्त देश आहे. ज्याची मोठी आवश्यकता ही भारताला आहे. सेमिकंडकटरच्या बाबतीत भारत तैवानचा मोठा ग्राहक देश आहे. या दोन्ही देशांचे अलीकडच्या काळात वाढलेले संबंध व मैत्री ही चीन व भारताच्या संबंधांवर मोठा परिणाम करणारी ठरली आहे.

**ब्रिक्स व चीनची महत्त्वाकांक्षा :**

ब्रिक्स हा जगातील महत्त्वाच्या पाच झपाट्याने उदयाला येणाऱ्या अर्थव्यवस्थांचा समूहगट आहे. ज्यात ब्राझील, रशिया, भारत, चीन व दक्षिण आफ्रिका यांचा समावेश होतो. सर्व सदस्य राष्ट्रांवरून याचे नाव ब्रिक्स असे पडले आहे. जीडीपीच्या बाबतीत हा गट जी-७ या पाश्च्यात्य देशांच्या गटाच्या पुढे आहे. या संघटनेची स्थापना २००१ मध्ये Bric म्हणून झाली होती. अर्थात यात नंतर दक्षिण आफ्रिकेचा समावेश होऊन याचे नाव Brics असे झाले. याचा वाढता प्रभाव हा अमेरिकेचा देखील तणाव वाढविणारा आहे. २०१९ नंतर ऑगस्ट २०२३ मध्ये होणारी परिषद ही ब्रिक्सची १५ वी शिखर परिषद होती. जी दक्षिण आफ्रिकेत झाली. या संघटनेला रशिया व चीनकेंद्री मानले जाते.

१५ व्या शिखर परिषेदेचा विस्तार करावा असे चीनला मनोमन वाटते. शैलेन्द्र देवळाणकर या भारताच्या परराष्ट्र संबंधांवर लिहिणाऱ्या विद्वानाच्या मते, चीनला संघटनेच्या विस्तारातून अँटी वेस्टर्न सिस्टीम वा पश्चिमी जगाच्या विरुद्ध एक मजबूत फळी विकसित करायची आहे. यामुळे या समूहात चीनला अमेरिका विरोधी देशांना ब्रिक्स सदस्य करून घ्यावयाचे आहे. परंतु नेमकी ही चीनची भूमिका लक्षात घेऊन भारत या विस्ताराला विरोध करत आला आहे. भारताचे म्हणने आहे की, याबाबतीत स्पष्ट नियमावली बनविणे आवश्यक आहे. १५ व्या शिखर परिषेदेत मात्र भारताने याबाबतीत सौम्य भूमिका घेतांना सौदी अरेबिया, इजिप्त, इराण, अर्जेन्टिना सारख्या देशांना समाविष्ट करण्याची तयारी दाखवली.

ब्रिक्सच्या काही बाबी या आपल्याला युरोपियन संघाच्या बरोबरी साधण्यासाठी पुढचे पाऊल टाकणाऱ्या वाटतात. जसे ब्रिक्सने डॉलरला पर्याय म्हणून स्वत:चे चलन (कॉमन करन्सी) विकसित करण्याचा मुद्दा मांडला. पण भारताचा विशेष व्यापार हा युरोपियन व अमेरिकेच्या सोबत असल्याने भारताने यास विरोध केला. अर्थात चीनचा करन्सी विकसित करण्यामागे उद्देश हा शुद्ध युआन मजबूत करण्याचा आहे जो भारताला लक्षात आला आहे. या गटातील भारत-चीन संघर्ष हा ब्रिक्सला पाश्चिमात्य देशांच्या विरुद्ध भक्कम पर्याय बनू देत नाही.

**आर्थिक संबंध :**

२१ व्या शतकाच्या सुरवातीला भारत व चीनमधील व्यापार हा ३ अब्ज डॉलर होता तो अलीकडच्या काळात ३२ पटीने वाढून १०० अब्ज डॉलर एवढा झाला आहे. भारतामध्ये उद्योग पार्क, ई-कॉमर्स आणि अन्य क्षेत्रात १००० पेक्षा जास्त चीनी कंपन्यांनी गुंतवणूक केली आहे. याबरोबर विज्ञान, तंत्रज्ञान, आतंकवादविरोधी विचार, कला, क्रीडा, सिनेमा आणि अन्य क्षेत्रातील भारत-चीन या दोन्ही राष्ट्रांची आपापसातील देवाण-घेवाण प्रचंड वाढली आहे.

- **स्वयं अध्ययन प्रश्न-२**

**अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा**

१) २०१६ चीनसाठी निर्यात करणाऱ्या देशांमध्ये भारताचा क्रमांक हा ......... वा होता.

अ) २० ब) २३ क) २७ ड) ३१

२) भारताच्या बाबतीत चीनची व्यापारी भागीदारी मोठी राहिली आहे. कधी कधी ती ......... देखील याबाबतीत मागे टाकते.

अ) रशिया ब) इंग्लंड क) पाकिस्तान ड) अमेरिकेला

३) भारत-चीन आणि भूतान यांची सीमा ......... एकत्र येते.

अ) डोकलाम ब) सियाचीन क) आसाम ड) मानसरोवर

४) सेमिकंडकटरच्या बाबतीत भारत ......... देशाचा मोठा ग्राहक देश आहे.

अ) जपान ब) कोरिया क) इंडोनेशिया ड) तैवान

५) ......... समावेश होऊन Bric चे नाव Brics असे झाले.

अ) दक्षिण आफ्रिकेचा ब) ब्राझीलचा क) सुदानचा ड) चीनचा

ब) जोड्या जुळवून योग्य पर्याय निवडा.

| गट १ | गट २ |
|---|---|
| १) चीनच्या वस्तू आयात करण्यात भारत ७ वा क्रमांक | अ) २०१३ |
| २) वूहान अनौपचारिक शिखर संमेलन | ब) २०१६ |
| ३) वन बेल्ट वन रोड | क) २०१७ |
| ४) चीनकडून डोकलाम येथे रस्ता बांधणी | ड) २०१८ |

अ) १- ड, २-ब, ३-अ, ४-क ब) १- क, २- ब, ३- ड, ४-अ

क) १- ब, २-ड, ३-अ, ४-क क) १- अ, २-ड, ३-क, ४-ब

### ४.२.३ भारत पाकिस्तान संबंध

पाकिस्तान या देशाने जुन्या समान ऐतिहासिक परंपरा ठेवणाऱ्या राष्ट्राशी मैत्रीपूर्ण संबंध ठेऊन स्वत:च्या देशाचा सर्व क्षेत्रात विकास करून घेण्याऐवजी जुन्याच प्रश्नांना आणि शत्रूभावनेला चिकटून राहून वेळोवेळी भारताविरुद्ध कुरघोड्या केल्या आहेत. चीनसारख्या देशाच्या मगरमिठीला आणि आर्थिक साम्राज्यवादाचा हा देश बळी पडून त्यांना आपली जमीनदेखील वापरू देण्याची चूक वेळोवेळी करीत आहे.

**भारताचे पाकिस्तानसोबत आर्थिक संबंध :**

भारत व पाकिस्तानमध्ये २०१८-१९ मध्ये एकूण व्यापार हा २.५ अब्ज अमेरिकी डॉलर्स एवढा होता. सध्या भारत पाकिस्तानला भाजीपाला, कापूस, प्लास्टिक, लोखंड आणि पोलाद यासारख्या वस्तूंची निर्यात करतो तर पाकिस्तानमधून भारताला विविध मसाले, फळे व सिमेंट यांची आयात होते.

**भारताने परत घेतला एमएफएन (MFN) चा दर्जा :**

भारताने नेहमी पाकसोबत मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला आहे पण या देशाने मात्र भारताच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे धोरण ठेवले आहे. पाकने आतंकवाद कमी न केल्याने भारताने Most Favoured Nation चा दर्जा पाककडून काढून घेतला. खरेतर यामुळे दोन्ही देशातील व्यापार व उद्योगधंदे यात यामुळे वाढ झाली असती. वरील दर्जामुळे आयात-निर्यात शुल्कात व अन्य बाबतीत सवलत मिळते जी यामुळे बंद होणार आहे.

**FATE च्या ग्रे लिस्टमध्ये पाकचा समावेश :**

नेहमी नेहमी आतंकवादाला प्रोत्साहन देण्याच्या धोरणामुळे आंतरराष्ट्रीय संस्था फायनान्शियल एक्शन टास्क फोर्स (FATE) या संस्थेने पाकला ग्रे लिस्टमध्ये टाकले आहे. त्यांच्यामते पाक हा देश जैश-ए-मोहम्मद, लष्कर-ए-तोयबा, जमात-उद-दावा या आतंकवादी संघटनांना होणारा आर्थिक पाठींबा थांबविण्यात अपयशी ठरला आहे. त्यांनी याबरोबर पाकला सूचित केले की, जर ऑक्टोबर २०१९ पर्यंत पाकने त्यांच्या एकूण २७ मागण्यांवर काम नाही केले तर त्यांना ग्रे मधून ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्यात येईल.

**अणुबॉम्ब व क्षेपणास्त्रे निर्मितीत चीनची मदत :**

भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशात अणुबॉम्ब वापराविरोधी सामंजस्य करार झाला असला तरी पाकिस्तानच्या हालचाली नेमक्या याविरोधी राहिलेल्या आहेत. याबाबतीत चीनने वेळोवेळी अणुबॉम्ब व क्षेपणास्त्रे निर्मितीच्या बाबतीत पाकिस्तानला मदत केली आहे. जी भारताची डोकेदुखी वाढविणारी ठरली आहे.

**पाकच्या भूमिकेने सार्कचे कामकाज ठप्प :**

अनेक चांगल्या योजना या पाकने फोल केल्या आहेत. आतंकवादी कारवायांना पाकने नेहमी सहकार्य केल्याने भारत, बांगलादेश, अफगाण व नेपाल सारखे देश सार्कच्या शिखर संमेलनात भाग घेण्यास तयार नाहीत. यामुळे सार्क सदस्य देशातील दरी ही वाढत चालली आहे.

**पाकिस्तानच्या घातक कारवाया :**

सन २०१४ नंतर सुरवातीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेजारील राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध वाढविण्याच्या उद्देशाने पाकिस्तानशी मैत्रीचा हात पुढे केला. तरी लवकरच पुलवामा व अन्य घटनांनी भारताच्या कपाळावर चिंता आणण्याचे काम केले आहे. भारताविरुद्ध अमेरिका नंतर चीन या देशांचे डावपेच हे स्पष्ट असले तरी पाकची भूमिका शेजारी राष्ट्रांशी प्रेम आणि सद्भावनेची नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या शपथ समारंभाच्या वेळी सर्व सार्क राष्ट्रांना निमंत्रित केले होते. दोन्ही देशात नवीन सरकारे आल्यानंतर संक्षिप्त वार्ता झाली.

**पठाणकोठ व उरीवरील आतंकवादी हल्ला :**

२ जानेवारी, २०१६ रोजी पठाणकोट हवाई स्थानावरील आतंकवादी हल्ल्यानंतर द्विपक्षीय चर्चा ही बंद पडली. यानंतर १८ सप्टेंबर २०१६ रोजी काश्मीरच्या उरी येथील भारताच्या सैन्य शिबिरावर आतंकवादी हल्ला करण्यात आला ज्यात १९ भारतीय सैनिक हे शहीद झाले. यामुळे भारताने नोव्हेंबर २०१६ मध्ये लामावाद येथे होणाऱ्या सार्क संमेलनात भाग घेण्यास नकार दिला. यावेळी भारतीय सैन्याने एलओसी पार करून सर्जिकल स्ट्राईक केला. ज्यात एकूण १५० च्यावर आतंकवादी मारले गेले. अशा घटनांनी दोन्ही देशांच्या संबंधात मोठे वितुष्ट आले.

**केरी सेक्टर घटना :**

पाकिस्तानी लष्कराने २३ डिसेंबर २०१७ रोजी काश्मीरच्या केरी सेक्टरमध्ये संघर्ष विरामाचे उल्लंघन करून हल्ला केला होता. ज्यात एक मेजर व तीन सैनिक शहीद झाले. ज्याचा बदला भारताच्या लष्कराने घेतला. भारतीय लष्कराच्या पाच कमांडोनी पाकव्याप्त काश्मीरमध्ये आत घुसून पाकच्या एक मेजर व चार पाकिस्तानी सैनिकांना ठार मारले. याबरोबर त्यांची चौकी देखील उध्वस्त केली.

**पुलवामा आतंकवादी हल्ला :**

जैश-ए-मोहम्मदच्या दहशतवाद्यांनी १४ फेब्रुवारी २०१९ रोजी दुपारी श्रीनगर-जम्मू राष्ट्रीय महामार्गावरील पुलवामा येथील लेथपोरा गावात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (CRPF) ताफ्यावर स्फोटकांनी भरलेली गाडीसह आत्मघातकी हल्ला केला. या हल्ल्यात भारतीय जवानांच्या दोन गाडयांना लक्ष्य करण्यात आले, परिणामी ४० जवान शहीद झाले.

या हल्ल्याची जबाबदारी जैश-ए-मोहम्मद या दहशदवादी संघटनेने स्वीकारली. घटनेने भारत आणि पाकिस्तान यांच्या संबंधांना नव्याने तडा गेला. याचीच परिणती म्हणून २८ फेब्रुवारी २०१९ रोजी, भारतीय हवाई दलाने पाकिस्तानी हवाई हद्दीत प्रवेश करून बालाकोटमधील जबाबदार जैश-ए-मोहम्मदच्या प्रशिक्षण केंद्रावर बॉम्बहल्ला केला. अर्थात प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तान हवाई दलाने राजौरी-नौशेरा सेक्टरमधील लष्करी तळांवर हल्ला केला. भारतीय वायूसेनेने याला प्रत्युत्तर देताना आपले मिग २१ बायसन पाकिस्तानच्या हद्दीत घुसले, ते लढाऊ विमान पाडल्यानंतर विंग कमांडर अभिनंदन वर्धमान यांना पाकिस्तानी लष्कराने पकडले,

मात्र दोन दिवसांनी त्यांची सुटका करण्यात आली. त्यांना भारत सरकारने वीर चक्र प्रदान केले होते. या घटनेला जबाबदार आरोपींच्या यादीत नऊ स्थानिक संशयितांचा समावेश होता, त्यापैकी सात पुलवामा येथील रहिवासी होते. या हल्ल्याचा सूत्रधार उमर फारूखसह चार पाकिस्तानी दहशतवाद्यांना ठार करण्यात आले. भारतीय राष्ट्रीय तपास संस्था एन.आय.ए. ने या प्रकरणाचा छडा लावला होता.

**कर्तारपूर कॉरिडॉर :**

कर्तापूर कॉरिडॉर सुमारे साडेचार किलोमीटर लांबीचा आहे. या कॉरिडॉरच्या निर्मितीमुळे भारतातील डेरा बाबा नानक आणि पाकिस्तानमधील गुरुद्वारा दरबार साहिब थेट जोडले गेले आहेत. ०९ नोव्हेंबर २०१९ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या कॉरिडॉरचे उद्घाटन करण्यात आले. तर पाकिस्तानकडून पंतप्रधान इमरान खान याचदिवशी गुरु नानक देव यांच्या ५५० व्या जयंती निमित्त कर्तारपूर कॉरिडॉरचे उद्घाटन केले होते. विशेष म्हणजे याठीकाणाहून पाकिस्तानात जाण्यासाठी व्हिसाची गरज नाही.

**काय आहे इतिहास :**

कर्तापूर साहिब हे पाकिस्तानच्या नारोवाल जिल्ह्यात रावी नदीजवळ आहे. त्याचा इतिहास ५०० वर्षांहून अधिक जुना आहे. याची स्थापना शिखांचे गुरु नानक देव यांनी १५२२ मध्ये केली असे मानले जाते. गुरु नानक देव यांनी त्यांच्या आयुष्याची शेवटची वर्षे या ठिकाणी व्यतीत केली. रावी नदीचा प्रवाह सीमा म्हणून ग्राह्य धरल्याने हे क्षेत्र पाकिस्तानात गेले. लाहोर ते कर्तापूर साहिब हे अंतर १२० किलोमीटर आहे. त्याच वेळी, ते पंजाबमधील गुरुदासपूर भागात भारतीय सीमेपासून सुमारे०७ किलोमीटर अंतरावर आहे.

कोरोना महामारीच्या काळात हा रस्ता काहीकाळ बंद करण्यात आला तर नंतर काही नियम घालून पुन्हा सुरु करण्यात आला.

इमरान खानने दोन्ही देशांच्या विकासाचा मुद्दा यावेळी रडारवर घेतला असला तरी भारताने मात्र त्यात रस न दाखवता हा विषय केवळ कर्तारपूरपुरता मर्यादित ठेवला. कारण हा विषय सुरु असताना पुलवामा घटना आणि भारताने दिलेले प्रतिउत्तर यामुळे नंतर दोन्ही देशातील तणावात अधिकच वाढ झाली होती.

या दोन्ही देशातील संवादाचा व वादाचादेखील प्रमुख मुद्दा हा आतंकवाद राहिलेला आहे. पाकिस्तानला अन्य देश म्हणजे अमेरिका व चीन यांचा आर्थिक व लष्करी साहित्याचा आलेला फुगवटा हा भारताला नेहमी सोसावा लागला आहे.

- **स्वयं अध्ययन प्रश्न–३**

**अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा**

१) आंतरराष्ट्रीय संस्था फायनान्शियल एक्शन टास्क फोर्स (FATE) या संस्थेने पाकला ग्रे लिस्टमध्ये टाकले आहे.

अ) ग्रीन ब) रेड क) व्हाईट ड) ग्रे

२) ०९ नोव्हेंबर २०१९ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ......... या कॉरिडॉरचे उद्घाटन करण्यात आले.

अ) बालाकोट ब) उरी क) शिखारपूर ड) कर्तापूर

३) २ जानेवारी, २०१६ रोजीच्या हवाई स्थानावरील आतंकवादी हल्ल्यानंतर द्विपक्षीय चर्चा ही बंद करण्यात आली.

अ) पठाणकोट ब) उरी क) केरी ड) कारगिल

४) यानंतर १८ सप्टेंबर २०१६ रोजी काश्मीरच्या ......... येथील भारताच्या सैन्य शिबिरावर आतंकवादी हल्ला करण्यात आला.

अ) पठाणकोट ब) उरी क) केरी ड) कारगिल

ब) जोड्या जुळवून योग्य पर्याय निवडा.

| गट १ | गट २ |
|---|---|
| १) कर्तापूर कॉरिडॉर उद्घाटन | अ) २०१६ |
| २) पठाणकोट आतंकवादी हल्ला | ब) २०१७ |
| ३) केरी सेक्टरमध्ये संघर्ष विराम उल्लंघन व हल्ला | क) २०१९ |

अ) १- अ, २-ब, ३-क ब) १- क, २- अ), ३- ब)

क) १- ब, २-क, ३-अ ड) १- अ, २-क, ३- ब)

## ४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१) **एल.ई.एम.ए** - लॉजिस्टिक एक्सचेंज मेमोरेंडम एग्रिमेंट

२) **सेमिकंडकटर** - रेडिओ, संगणक, दूरध्वनी इत्यादी उपकरणांमध्ये व एकंदरीतच आधुनिक इलेक्ट्रॉनिकमध्ये अर्धवाहक (सेमिकंडकटर) पायाभूत घटक आहेत. हा इलेक्ट्रॉन-प्रवाहामुळे विद्युतवाहकता संभवणारा असा पदार्थ असतो,

## ४.४. स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

- स्वयं अध्ययन प्रश्न-१

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा

१) अ) बराक ओबामा २) ड) नरेंद्र मोदी ३) अ) जलप्रदूषण ४) क) बराक ओबामा

ब) जोड्या जुळवून योग्य पर्याय निवडा.

अ) १- ड, २-ब, ३-अ, ४-क

● स्वयं अध्ययन प्रश्न-२

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा

१) क) २७ २) ड) अमेरिकेला ३) अ)डोकलाम ४) ड) तैवान

५) अ) दक्षिण आफ्रिकेचा

ब) जोड्या जुळवून योग्य पर्याय निवडा.

क) १- ब, २-ड, ३-अ, ४-क

● स्वयं अध्ययन प्रश्न-३

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा

१) ड) ग्रे २) अ) पठाणकोट ३) ब) उरी ४) ड) कर्तापूर

ब) जोड्या जुळवून योग्य पर्याय निवडा.

ब) १- क, २- अ), ३- ब)

## ४.५ सारांश

सन २०१४ नंतर भारताच्या परराष्ट्र धोरणावर भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाची छाप न पडता स्पष्टपणे खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची छाप आपल्याला पडलेली दिसते. माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत दाखवलेली गतिमानता ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील दाखवली. भारताच्या परराष्ट्र धोरणाचे याकाळातील वैशिष्टे म्हणजे एक पाऊल आधीच टाकून राबविलेली या क्षेत्रातील सकारात्मक धोरणे होय. अमेरिकेचा व्यापारात आणि भारतातील भागेदारीत याकाळात लक्षणीय वाढ दिसते. या महासत्तेकडून शस्त्र खरेदीत भारताने पहिला क्रमांक पटकाविला. अमेरिकेच्या सहकार्याने अनेक महत्त्वाच्या संस्था आणि संघटना यांच्यात भारताची सदस्य राष्ट्र म्हणून वर्णी लागली. काही वादग्रस्त निर्णय अमेरिकेने घेतले तेव्हा भारताने दाखविलेला स्पष्ट विरोध भारताच्या शांततामय सहजीवनातदेखील एक मजबुती दाखवतो. ओसामा बिन लादेन सारख्या दहशतवादीचे पाकिस्तानमध्ये सापडणे, भारताची आर्थिक, वैद्यकीय, सोफ्टवेअर क्षेत्रातील उंची, चीनची आशिया खंडात वाढलेली मगरमिठी या बाबी अमेरिकेला भारताची दखल घेण्यास भाग पाडताना दिसतात.

चीन हा देश नेहमी भारताला पाण्यात बघत आला आहे. आज जागतिक बाजारपेठ अमेरिकेच्या खालोखाल आणि बरोबरीने चीनने काबीज केली असली तरी चीन भारताची दखल घेण्याबरोबरच याकाळातही कुरघोडी करण्याची कुठलीही कसर सोडलेली नाही. तैवान-भारत मैत्री, भारत- भूतान जवळीक, तिबेटच्या धर्मगुरू यांना भारतात आश्रय देणे, याबरोबर आशिया खंडातील शेजारील देशांशी भारताने वाढविलेली जवळीक चीनला खपलेली नाही. भारताच्या राज्यांच्या जवळ आणि पाकिस्तानमध्ये सियाचीन जवळून चीनने बनविलेले रस्त्यांचे जाळे भारताची डोकेदुखी वाढविणारे आहेत. आफ्रिका आणि

आशिया खंडाला रस्ते, रेल्वे आणि सागरी मार्गाने चीनने जोडण्याचा प्रयत्न करणे भारताला नक्कीच त्रासदायक ठरणारे आहे. यामार्गाने चीन आपले आर्थिक साम्राज्य निर्माण करू पाहत आहे.

पाकिस्तान आणि भारताचे संबंध आता पूर्वीसारखे मैत्रीपूर्ण नक्कीच राहिलेले नाहीत. भारताचा सर्वच क्षेत्रातील विकास हा आता पाकिस्तान आणि भारत यांना समान पातळीवर मैत्री संबंधात सुमधुर ठरणारा नाही. यामागे पाकिस्तानचाच हेकेखोरपणा, दहशतवादी यांना खतपाणी घालण्याचे न सोडणे, चीनच्या आर्थिक साम्राज्यवादाला स्वदेशात जागा देणे, काश्मीर प्रश्नाला न सोडणे, भारताची आर्थिक क्षेत्रातील भरारी याकडे डोळेझाक करणे या गोष्टी जबाबदार मानाव्या लागतील. उरी, पुलवामा आणि अन्य दहशतवादी कारवाया यांनी पाकिस्तान सुधारणार नाही हे लक्षात येते. भारताने पाकिस्तानच्या चुकीच्या वागणुकीला तेवढ्याच ताकदीने वेळोवेळी उत्तर दिल्याने पाकिस्तानची लष्करी सत्ता या हादरलेली दिसते. जागतिक पातळीवर पाकिस्तानची दहशतवादी संघटनाना प्रोत्साहन दिल्याने वेळोवेळी होणारी नाचक्की त्यांची पत कमी करणारी आहे. फुकट होणाऱ्या मदतीने पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेला आतून पोखरून काढले आहे. लष्करी ताकदीने वेळोवेळी हस्तक्षेप करून पाकिस्तानमधील लोकशाहीचा जीव घेतला आहे. स्वत:च्या निष्पाप नागरिकांवर होणारे दहशतवादी हल्ले पाहण्याची नामुष्की या देशावर आता यायला लागली आहे. व्यापारी संबंध भारताचे पाकिस्तानसोबत अजूनही सुरु असले अरी त्यात पूर्वीसारखा भावनेचा ओलावा आता राहिलेला नाही.

भारत पाकिस्तानमध्ये अलीकडच्या काळात पूर्वीसारखे मैत्रीपूर्ण संबंध राहिलेले नाहीत. व्यापाराच्या बाबतीत देखील भारताने पाकिस्तानमधून आयात होणाऱ्या सर्व वस्तूंवरील सीमा शुल्क अनेकपटीने वाढवले आहे. भारत पाकिस्तानमधील समान भाषिक आणि सांस्कृतिक परंपरा राहिली आहे. पाकिस्तानमधील अनेक लोकांची भारतात तर भारतातील अनेकांची कर्मभूमी व मालमत्ता ही फाळणीअगोदर एकमेकांच्या देशात होती. अनेकवर्ष ते आपल्या मूळ भूमीला बघण्यास व्यथित झालेले दिसतात. अलीकडच्या काळात गायक, संगीतकार, विनोदी कलाकार आणि अभिनेत्यांसह पाकिस्तानी मनोरंजन करणाऱ्यांनी भारतात, विशेषत: बॉलीवूडमध्ये लोकप्रियता मिळवली आहे, तर भारतीय संगीत आणि चित्रपटांना पाकिस्तानमध्ये चांगला प्रतिसाद मिळत आहे. दोन्ही देशांच्या खाद्यपदार्थ देखील साम्यता दाखवितात. दोन्ही देशात होणाऱ्या क्रिकेट सामन्यांना कोट्यावधी लोकांकडून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या बघितले जाते. तरी पाकिस्तानमधील आडमुठे लष्करशहा या दोन्ही देशांच्या भातृभाव आणि प्रेमाच्या विरोधी आहेत जे विविध हल्ल्यांमधून दिसून येते.

आज पाकिस्तानची अर्थव्यवस्था इतकी खालावलेली आहे की तिला केवळ अमेरिका आणि चीनच्या पाठींब्याने सतत सावरण्याची गरज भासत आहे. कर्ज इतके आहे की पाकिस्तान याला फेडण्याचा स्वप्नात देखील विचार करून शकत नाही. इतके असताना देखील ''रस्सी जल गई पर बल नहीं गया'' या म्हणीप्रमाणे पाकच्या मदतीने दहशतवादी आणि लष्कराने भारताविरुद्ध कारवाया करणे सोडले नाही.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय :

प्रश्न १ टीपा लिहा

१. भारतीयांचे अमेरिकेच्या विकासात योगदान

२. भारत वासेनार व्यवस्थेत

३. जेरुसलेम वाद आणि भारताची भूमिका

४. कोरोनाकाळातील अमेरिकेशी संबंध

५. भारत–चीन अनौपचारिक शिखर संमेलन

६. डोकलाम वाद

७. पठाणकोठ व उरीवरील आतंकवादी हल्ला

प्रश्न २ थोडक्यात उत्तरे लिहा

१) जो बायडेन यांच्या काळातील भारताच्या संबंधात झालेला बदल सविस्तर विशद करा

२) भारत आणि चीनमधी आर्थिक संबंध थोडक्यात स्पष्ट करा.

३) भारत व तैवान मैत्री आणि वाद हा मुद्दा स्पष्ट करा

४) भारताचे पाकिस्तानमधील आर्थिक संबंध नमूद करा

प्रश्न ३ सविस्तर उत्तरे लिहा

१) ओबामा यांच्या काळातील भारताचे संबंध सष्ट करा

२) राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याकाळात भारताचे अमेरिकेशी असलेले संबंध सविस्तर नमूद करा.

३) बेल्ट एंड रोड इनिशिएटिव ही योजना स्पष्ट करा

४) ब्रिक्स व चीनची महत्त्वाकांक्षा सविस्तर स्पष्ट करा

५) पुलवामा आतंकवादी हल्ला आपल्या भाषेत सविस्तर स्पष्ट करा

## ४.७ संदर्भ ग्रंथ

मराठी


१) अंजली रानडे, जागतिक राजकारण

२) डॉ. देवळाणकर शैलेन्द्र, समकालीन जागतिक राजकारण : भारताच्या परराष्ट्र आणि संरक्षण धोरणापुढील आव्हाने

३) तळवळकर गोविंद, भारत आणि जग

४) प्राचार्य कदम य.ना., समकालीन आधुनिक जग

५) डॉ. तोडकर बी.डी., भारत आणि दक्षिण आशियायी राष्ट्रामधील संबंध

हिंदी

१) डॉ. आर्य राकेश कुमार, भारत की विदेश नीती

२) गांगुली सुमित, भारत की विदेश नीती पुनरावलोकन

३) डॉ. जोहारी जे.सी., भारतीय विदेश नीती

४) दिक्षित जे. एन., भारतीय विदेश नीती

इंग्रजी

1) Ogden Chris, Indian Foreign Policy
2) Khanna V.K., Foreign Policy of India
3) Malone David, The Oxford Handbook of Indain Foreign Policy

❑❑❑